अकोला । बुधवार
दि. ११ जून २०२५
वर्ष : १९ अंक : १०१
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये



वेस्ट इंडिजचा फलंदाज निकोलस पूरनने जाहीर केली निवत्ती (पान ७ वर..)

## थोडक्यात

### सोनमची मेघालय पोलीस करणार चौकशी



**मेघालय :** मेघालयात हनिमूनसाठी गेलेल्या इंदूरमधील नवविवाहित राजा रघुवंशी हत्या प्रकरणी त्याची सोनम रघुवंशीला पोलिसांनी मंगळवारी अटक केली. आज मेघालय पोलिसांना सोनम रघुवंशीची तीन दिवसांची ट्रान्झिट रिमांड मिळाली आहे. राजा रघुवंशी हत्या प्रकरणी पत्नी सोनम रघुवंशीसह अन्य तिघांना अटक करण्यात आली. हे संपूर्ण प्रकरण पूर्वनियोजित कट असल्याची प्राथमिक माहितीही पोलीस तपासात समोर येत आहे. आता मेघालय पोलिसांना सोनम रघुवंशीची तीन दिवसांची ट्रान्झिट रिमांड (आरोपीला एका राज्यातून दुसऱ्या राज्यातील पोलीस किंवा तपास यंत्रणा त्यांच्या ताब्यात घेण्यासाठी न्यायालयाकडून मिळवलेली परवानगी) मिळाली आहे.

### ऑस्ट्रियातील शाळेत गोळीबार, पाच ठार



**ग्राझ :** ऑस्ट्रियातील ग्राझ येथील एका शाळेत झालेल्या गोळीबारात पाच जण ठार झाले असून, अनेक जण जखमी झाले आहेत, असे वृत्त रॉयटर्स या वृत्तसंस्थेने स्थानिक माध्यमांचा हवाला देऊन दिले आहे. हल्लेखोर विद्यार्थ्याने अंदाधूंद गोळीबार केल्यानंतर जीवन संपवले असावे, असे ब्रिटनस्थित इंडिपेंडेंटने ऑस्ट्रियन राज्य माध्यम ओआरएफचा हवाला देत म्हटलं आहे. या घटनेबाबत ऑस्ट्रिया सरकारने अद्याप अधिकृत माहिती दिलेली नाही. ग्राझ येथील एका शाळेत आज सकाळी दहा वाजता गोळीबाराचा आवाज आला. स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. गोळीबारात गंभीर जखमींमध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांचाही समावेश आहे. या घटनेचा सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये गोळीबारानंतर पोलिसांच्या गाड्या घटनास्थळी जाताना दिसत आहेत. दुसऱ्या एका व्हिडिओमध्ये लोक आणि पोलिसांची वाहने घटनास्थळी असल्याचे दिसून आले आहे.

# पित्याने दोन मुलांसह सातव्या मजल्यावरून मारली उडी!

## दिल्लीत भीषण आग: तिघांचाही जागीच मृत्यू

**नवी दिल्ली, दि. १०** वृत्तसंस्था



द्वारका सेक्टर तेरा मधील सबद अपार्टमेंट या निवासी इमारतीतील सातव्या मजल्यावर असलेल्या एका घराला आग लागली. आगीची झळ जाणवू लागताच घरात अडकलेल्या तीन जणांनी जीव वाचण्यासाठी थेट सातव्या मजल्यावरुन खाली उड्या मारल्या. हा निर्णय प्राणघातक ठरला. उड्या मारणाऱ्या तिघांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका पुरुष आणि त्याची दोन मुले अशा तीन जणांचा समावेश आहे.

दिल्लीतील एका अपार्टमेंटमध्ये भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. द्वारका सेक्टर-१३ मधील 'सबाद अपार्टमेंट' या बहुमजली इमारतीतील एका फ्लॅटला आग लागली. आगीची बातमी आल्यानंतर एकच खळबळ उडाली. इमारतीच्या वरच्या मजल्यावरील एका फ्लॅटमध्ये आग लागली. यादरम्यान, एका पित्याने आपल्या दोन मुलांसह इमारतीवरून उडी मारून जीव वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र यामध्ये या तिघांचाही मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, अग्निशमन विभागाला सकाळी आगीबद्दल फोन आला, त्यानंतर तातडीने मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये अपार्टमेंट इमारतीच्या वरच्या मजल्यावर भीषण आग जळताना दिसत आहे. अग्निशमन विभागाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. आठ अग्निशमन गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या. (पान २ वर)

# मद्यप्रेमींना झटका; राज्यात वाढणार मद्याचे दर!

**मुंबई, दि. १०** वृत्तसंस्था



राज्य सरकाने मद्यावरील उत्पादन शुल्क वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील तिजोरीत या निर्णयामुळे १४ हजार कोटीच्या महसूलाची वाढ होणार आहे. पण त्याचवेळी मद्यप्रेमींच्या खिशाला मात्र कात्री लागणार आहे. आज झालेल्या राज्यमंत्रीमंडळाच्या बैठकीत झालेल्या प्रमूख निर्णयामध्ये शासनाचा महसूल वाढवण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाने मद्यावरील शुल्क वाढविले आहे. यामध्ये भारतीय बनावटीच्या विदेशी मद्यावर दीड टक्याने वाढ करण्यात आली आहे. मद्याच्या किंमतीबरोबर उत्पादन वाढवण्यासाठी सीलबंद विदेशी मध्य विक्री हॉटेल आणि रेस्टॉरंट कराराद्वारे भाडेतत्त्वावरती चालविण्यास मान्यता देण्यात आली आहे. यावर दहा ते पंधरा टक्के अतिरिक्त शुल्क आकारण्यात येणार आहे. तसेच विभागाला बळकटी देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागात १२२३ पद नव्याने भरण्याचा निर्णय मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. यासह राज्य उत्पादन शुल्क विभाग अंतर्गत मुंबई शहर आणि उपनगर यासाठी नव्याने विभागीय कार्यालय सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे आता मद्यप्रेमींनी मद्य विकत घेताना अधिकचे पैसे मोजण्याची तयारी ठेवावी लागणार आहे.

» आता यापुढे १८० मिली मद्य किरकोळ विक्रीची किंमतीत प्रत्येक ब्रँडनुसार वेगळी होणार आहे. यामध्ये देशी मद्य- ८० रुपये होणार आहे तर महाराष्ट्रात तयार होणारे लिकर - १४८ रुपये, तसेच भारतीय बनावटीचे विदेशी मद्य - २०५ रुपये, विदेशी मद्याचे प्रमीयम ब्रॅण्ड- ३६० रुपये अशी किमान विक्री किंमत राहणार आहे. यामध्ये प्रत्येक ब्रँडनुसार किंमतीमध्ये फरक पडणार आहे.

## नदीत स्नान करताना ११ तरुण बुडाले; आठ जणांचा मृत्यू

**जयपूर, दि. १०** वृत्तसंस्था



मंगळवारी राजस्थानमधील टोंक येथे एक दुःखद घटना घडली. जयपूरमधील ११ तरुण बनास नदीत स्नानासाठी गेले होते आणि जोरदार प्रवाहात ते सर्व जण वाहून गेले. सर्व तरुण दुपारी १२ वाजताच्या सुमारास पिकनिकसाठी नदीच्या जुन्या पुलाजवळ पोहोचले होते. त्यावेळी ही दुर्घटना घडली. यामध्ये आठ जणांना जलसमाधी मिळाली असून तीन जणांचा शोध सुरू आहे. स्थानिक लोकांच्या मते, सर्व तरुण एकत्र नदीत आंघोळ करण्यासाठी उतरले, परंतु काही वेळाने जोरदार प्रवाहामुळे एक-एक करून खोलवर गेले आणि बुडू लागले. स्थानिक ग्रामस्थांनी धोक्याची घंटा वाजवली आणि ताबडतोब पोलिसांना कळवले. माहिती मिळताच टोंक पोलिस, (पान २ वर)

# मोदी सरकारला ११ वर्षे पूर्ण!

## मोदी सरकारची ११ वर्षे हा सुवर्णकाळ - अमित शहा

**नवी दिल्ली, दि. १०** वृत्तसंस्था



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्ता स्विकारून आता ११ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त मोदींनी ट्विटमधून विविध गोष्टींची माहिती दिली आहे. त्यांनी शेअर केलेल्या लिंकमधून त्यांनी सध्याच्या केंद्रीय मंत्रीमंडळातील ६० टक्के मंत्री हे , , प्रवर्गातून आल्याचे म्हटले आहे. हे देशाच्या इतिहासात मंत्रिमंडळात या वंचित गटांचे सर्वाधिक प्रतिनिधित्व असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. काँग्रेससारख्या विरोधी पक्षांकडून सरकारवर या घटकांच्या हिताविरुद्ध काम करत असल्याचा आरोपावर मोदींनी ही माहिती दिली आहे. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी देखील ट्विटमध्ये मोदी सरकारची ११ वर्षे हा सुवर्णकाळ असल्याचे म्हटले आहे. देशाला प्रत्येक क्षेत्रात नंबर वन करण्याचे लक्ष्य असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

एक्स वरील पोस्टमध्ये पंतप्रधान मोदी म्हणाले की, ११ वर्षांच्या कार्यकाळात भारताने केवळ जगातील सर्वात वेगाने विकसित होणारी प्रमुख अर्थव्यवस्था (पान २ वर)

## महाराष्ट्रात ८ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई, दि. १०** वृत्तसंस्था

राज्य प्रशासनात खांदेपालट सुरूच असून, महाराष्ट्र सरकारने ८ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. यामध्ये वरिष्ठ आयएएस अधिकारी नितीन पाटील यांची महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी, तर आप्पासाहेब धुळाज यांची ओबीसी बहुजन कल्याण विभागाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

**बदली झालेल्या अधिकाऱ्यांची यादी :** नितीन पाटील : आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता, नवी मुंबई येथून महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघ, मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक.

ए.बी. धुळाज: व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघ येथून सचिव, ओबीसी बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.

लहू माळी: व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ येथून आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता, नवी मुंबई. बाबासाहेब बेलदार : (पान २ वर)

# वडिलांना पाणी पाजण्यासाठी गेलेल्या दोन मुलांचा मृत्यू!

## जालना हळहळले : शेतातील विजेच्या तारेने घेतले ३ बळी

**जालना, दि. १०** वृत्तसंस्था



तालुक्यातील नाव्हा गावाजवळील वरुड येथे मल्चिंग पांगविण्यासाठी शेतात गेलेल्या वडिलांसह दोन मुलांचा विजेचा जोरदार धक्का लागून मृत्यू झाला. विनोद तुकाराम म्हस्के (वय ३०), श्रध्दा (वय १२) व समर्थ (वय ८) अशी दुर्दैवी मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. ही घटना आज (दि.१०) सकाळी घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की, वरुड येथे आज सकाळी विनोद म्हस्के हे शेतात मल्चिंग पांगविण्यासाठी गेले होते. यावेळी शेतात पडलेल्या विजेच्या तारेला ते चिटकले. यावेळी जवळच खेळत असलेल्या श्रध्दा व समर्थ या त्यांच्या दोन मुलांना वडिलांना विजेचा धक्का लागल्याचे लक्षात आले. ते दोघे वडिलांना पाणी पाजण्यासाठी गेले असता त्यांनाही विजेचा धक्का लागला. यात तिघांचाही मृत्यू झाला.

यावेळी विनोद म्हस्के यांची पत्नी मनिषा हिने आरडा ओरड केल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत वीज पुरवठा खंडित केला. तिघांना रुग्णालयात नेले. तेथे त्यांना मृत घोषित करण्यात आले. विनोद म्हस्के यांचे साडू कैलास देवीदास जाधव यांनी पोलिसांना माहिती दिली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




# देशभरात आता एअर कंडिशनरचे तापमान राहणार २०-२८ अंश सेल्सिअस !

**नवी दिल्ली, दि. १०** वृत्तसंस्था



**ऑफिस असो, घर असो किंवा गाडी असो, आता तुम्हाला एअर कंडिशनरमधून एका विशिष्ट तापमानातच थंड हवा मिळेल. हे तापमान २० अंश सेल्सिअस ते २८ अंश सेल्सिअस दरम्यान असेल. एअर कंडिशनर बनवणाऱ्या कंपन्या आता असे एसी बनवतील. यासाठी केंद्र सरकार कंपन्यांशी तसेच उद्योग आणि ऑटोमोबाईल क्षेत्रात स्थापन झालेल्या प्लांटशी बोलत आहे. तो दिवस दूर नाही जेव्हा एसीचे किमान तापमान २० अंश सेल्सिअसपेक्षा कमी आणि कमाल तापमान २८ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त नसेल.**

केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल खट्टर म्हणाले की, एसीचे तापमान निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सर्व संबंधित उद्योगांशी चर्चा सुरू आहे. ते म्हणाले की, जपानमध्ये एसीचे निश्चित तापमान २६-२७ अंश सेल्सिअस आहे. केंद्रीय मंत्री म्हणाले की, तापमान एक अंश सेल्सिअसने वाढवल्याने ६ टक्के ऊर्जा वाचते. अशा परिस्थितीत जर किमान तापमान ४ अंश सेल्सिअसने वाढवले तर २४ टक्के ऊर्जा वाचेल. सध्या एसीचे किमान तापमान १६ अंश सेल्सिअसपर्यंत आहे. देशात १० कोटींहून अधिक एसी वापरले जातात असेही त्यांनी सांगितले. वीज वापरणाऱ्या सर्व उद्योगांना किंवा घरांना स्मार्ट मीटर बसवावे लागतील. सरकार स्मार्ट मीटर बसवण्याची प्रक्रिया वेगवान करत आहे. दररोज एक लाखाहून अधिक स्मार्ट मीटर बसवले जात आहेत. केंद्रीय ऊर्जामंत्र्यांनी सांगितले की, देशात ४ कोटींहून अधिक स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत. १९ कोटी स्मार्ट मीटर अजून बसवायचे आहेत. यासाठी सर्व राज्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. मनोहर लाल खट्टर म्हणाले की, देश केवळ वीज निर्मितीत स्वयंपूर्ण झाला नाही तर निर्यातही करू लागला आहे. देशाच्या मागणीनुसार वीज पुरवठा केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. आकडेवारीचा हवाला देत ते म्हणाले की, मे २०२४ मध्ये देशाने २५० गिगावॅट विजेची आतापर्यंतची सर्वाधिक मागणी पूर्ण करण्याचा विक्रम केला. त्याच वेळी, जून २०२५ मध्ये देखील २४१ गिगावॅटची मागणी पूर्ण झाली. यामुळे, विजेची सर्वाधिक मागणी असतानाही वीज कपात करण्याची गरज नाही. ते म्हणाले की, सरकार २७० गिगावॅटचे लक्ष्य साध्य करण्यासाठी काम करत आहे. ते म्हणाले की, २०१३-१४ मध्ये ऊर्जेची कमतरता ४.२% होती, तर एप्रिल २०२५ मध्ये ती फक्त ०.१% पर्यंत कमी झाली. एकूण वीज निर्मितीमध्येही ५.२% वाढ झाली आहे, जी २०२४-२५ मध्ये १८२९ अब्ज युनिट्सवर पोहोचली आहे. गावांमध्ये सरासरी वीजपुरवठा १२.५ तासांवरून २२.६ तास आणि शहरी भागात २३.४ तासांपर्यंत वाढला आहे.

# पान 1 वरून...

## पित्याने दोन मुलांसह सातव्या ...

अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहोचून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू केले. आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू असून घटनास्थळावर सतत लक्ष ठेवले जात असल्याचे अग्निशमन विभागाने सांगितले. कोणत्याही प्रकारच्या अफवा टाळण्याचे आवाहन अग्निशमन विभागाने केले आहे. उर्वरित तपशील आणि आगीचे कारण यासाठी अग्निशमन विभागाकडून अधिकृत निवेदनाची वाट पाहिली जात आहे. घटनास्थळी मदत आणि बचाव कार्य प्राधान्याने सुरू आहे.

संपूर्ण प्रकरणात निष्काळजीपणा

द्वारका येथील 'सबाद अपार्टमेंट' मध्ये आग लागली, जी एमआरव्ही शाळेजवळ आहे. या प्रकारामुळे स्थानिक लोकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले. ज्या इमारतीत आग लागली त्या इमारतीत राहणाऱ्या सर्व लोकांनी आरोप केला आहे की अपार्टमेंट समितीच्या सदस्यांना आगीची माहिती देण्यात आली तेव्हा त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. या संपूर्ण प्रकरणात निष्काळजीपणा दिसून आला. अग्निशमन दलाने दिलेल्या माहितीनुसार आग प्रकरणी नियमानुसार चौकशी होईल आणि दोषींवर कारवाईची शिफारस केली जाईल.

## नदीत स्नान करताना ११ तरुण....

प्रशासन आणि एसडीआरएफ पथक घटनास्थळी पोहोचले आणि बचाव कार्य सुरू केले. आतापर्यंत ८ तरुणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत, तर उर्वरित ३ जणांचा शोध सुरू आहे. सर्वांना सआदत रुग्णालयात आणण्यात आले. तिथे डॉक्टरांनी आठही तरुणांना मृत घोषित केले. स्थानिक लोकांनी सांगितले की, नदीचा हा भाग खोल आहे आणि येथे कोणताही इशारा फलक किंवा सुरक्षा व्यवस्था नाही. हा जुना पूल परिसर आहे. तिथे लोक अनेकदा माहितीशिवाय आंघोळीसाठी जातात. घटनेची माहिती मिळताच, सआदत रुग्णालयात नातेवाईक आणि स्थानिक लोकांची गर्दी जमली. आरडाओरड आणि शोकाकुल वातावरणात मृतांची ओळख पटवली गेली. सर्व तरुण जयपूरचे रहिवासी होते. पोलिसांनी सांगितले की, अतिरिक्त गोताखोरांना बोलावण्यात आले आहे. या अपघातानंतर संपूर्ण टोंक जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. प्रशासनाने हे प्रकरण गांभीर्याने घेतले आहे आणि तपास आणि मदतकार्य तीव्र केले आहे.

## मोदी सरकारला ११ वर्षे पूर्ण...

म्हणून स्थान मिळवले नाही, तर हवामान बदल आणि डिजिटल नवोपक्रम यांसारख्या महत्त्वाच्या जागतिक मुद्द्यांवरही महत्वाची कामगिरी केल्याचे म्हटले आहे. गुड गव्हर्नन्स आणि परिवर्तन यावर स्पष्ट लक्ष केंद्रित केले आहे. १४० कोटी भारतीयांच्या आशीर्वादाने आणि सामूहिक सहभागाने भारताने विविध क्षेत्रांत वेगवान परिवर्तन अनुभवले आहे. ''सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास'' या तत्त्वावर मार्गक्रमण करत एनडीए सरकारने वेग, प्रमाण आणि संवेदनशीलतेसह क्रांतिकारी बदल केले असल्याचे त्यांनी सांगितले. आर्थिक प्रगतीपासून सामाजिक उत्थानापर्यंत, लोककेंद्रित आणि सर्वांगीण प्रगतीवर लक्ष केंद्रित केल्याचे ते म्हणाले.

**विविध योजनांची माहिती:**

८१ कोटी लोकांना मोफत अन्नधान्य, १५ कोटींहून अधिक कुटुंबांना नळाद्वारे पाणी जोडण्या, गरीबांसाठी ४ कोटी घरे बांधली, १२ कोटी शौचालये बांधली, ६८ लाख स्ट्रीट व्हेंडर्सना कर्ज, ५२.५ कोटी छोटे उद्योजकांना कर्जे , कोविड काळात २० कोटी महिलांना विविध योजनांतर्गत रोख मदत अशी सरकारची कामे त्यांनी सांगितली.

## महाराष्ट्रात ८ आयएएस ...

अतिरिक्त विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर येथून व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, मुंबई. मुरुगनंथम एम. : मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया येथून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड.

आदित्य जीवने : मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड येथून सहव्यवस्थापकीय संचालक, , छत्रपती संभाजी नगर.

मिन्नू पी.एम. : सहायक जिल्हाधिकारी, भातकुली-तिवसा उपविभाग, अमरावती येथून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया.

मानसी : सहाय्यक जिल्हाधिकारी, देसाईगंज उपविभाग, गडचिरोली येथून महापालिका आयुक्त, लातूर महानगरपालिका.

यापूर्वीही अनेक आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या असून, नवल किशोर राम (पुणे महापालिका आयुक्त), शीतल तेली-उगले (क्रीडा आणि युवा आयुक्त, पुणे), सौरभ कटियार (जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर) यांच्यासह इतरांची नवीन जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. या बदल्यांमुळे प्रशासकीय कामकाजात अधिक गतिमानता येण्याची अपेक्षा आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या सभेबाबत आ. रणधीर सावरकर यांनी साधला छावा संघटनेशी संवाद

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १० :** संकल्प ते सिद्धि या संकल्पनेस मूर्त रूप देऊन महाराष्ट्रास प्रगतीपथावर नेणारे महाराष्ट्राचे कर्तबगार मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांची एक भव्य सभा बुधवार दि. ११ जून २०२५ रोजी दुपारी १ वाजता स्थानिक क्रिकेट क्लब मैदानावर आयोजित करण्यात आली आहे. अकोल्याच्या राजेश्वर नगरीत होणारी ही ऐतिहासिक सभा यशस्वी करण्यासाठी खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, भाजपाचे जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, शहराध्यक्ष जयंत मसने, माजी महापौर विजय अग्रवाल आदी भाजपाचे नेते जीवाचे रान करीत आहेत. याच संदर्भात भाजप पक्षाच्या मुख्य कार्यालयात आमदार रणधीर सावरकर यांनी छावा संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची एक संवाद सभा आयोजित केली होती. या संवाद बैठकीत आमदार सावरकर यांनी छावा च्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून त्यांना मा. मुख्यमंत्र्यांच्या सभे बाबत मार्गदर्शन केले व हजारोंच्या संख्येत या सभेत उपस्थित राहण्याचे आणी विशेष करून युवा वर्गाने या सभे चा लाभ घेण्याचे आवाहन केले. छावा संघटनेच्या या युवा जोडो '' संकल्पनेतून आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत आदींच्या निवडणुकीत संघटनेस चांगला लाभ होऊ शकतो असेही याप्रसंगी आमदार सावरकर यांनी आवर्जून सांगितले . याप्रसंगी छावाचे जिल्हाप्रमुख शंकरराव वाकोडे, प्रसिद्धी प्रमुख प्रदीप खाडे, भाजपाचे शहर अध्यक्ष जयंत मसणे, भाजपाचे प्रसिद्धी प्रमुख गिरीश जोशी, मनिराम ताले यांनीही मार्गदर्शन केले. छावाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येत याप्रसंगी उपस्थित होते. मा. मुख्यमंत्र्यांचे सभेकरिता छावाचे हजारो कार्यकर्ते उपस्थित राहतील अशी ग्वाही याप्रसंगी शंकरराव वाकोडे यांनी दिली.

## सोलापुरात खरीप पिकांच्या पेरण्यांना सुरुवात

सोलापूर, दि. १० वृत्तसंस्था

मागील मे महिन्यात सोलापूर जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच प्रचंड प्रमाणात झालेल्या पावसामुळे हजारो हेक्टर शेती क्षेत्राचे नुकसान झाले होते. नुकसानग्रस्त शेतीपिकांचे प्रशासकीय पातळीवर पंचनामे सुरू असताना दुसरीकडे अधिक नुकसान नसलेल्या शेतशिवारात संकट विसरून आणि उद्याची आस बाळगून खरीप हंगामात विविध पिकांची पेरणी सुरू झाली आहे. यात सोयाबीन, उडीद, तूर, मका, कापूस आदी पिकांचा समावेश आहे.

दरम्यान, गेल्या मे महिन्यात, १७ दिवस संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात तब्बल २३३ मिलीमीटर इतका जोरदार पाऊस झाला होता. त्यानंतर ३१ मेपासून पाच-सहा दिवस पाऊस थांबला होता. त्यानंतर मृग नक्षत्र सुरू झाला असता पुन्हा दोन दिवस पावसाने विश्रांती घेतली होती. रविवारी दुसऱ्या दिवशी आणि सोमवारी तिसऱ्या दिवशी मात्र पहाटेपासून पावसाने हजेरी लावायला सुरुवात केली. मात्र, हा पाऊस दक्षिण सोलापूर (२७.३ मिमी), अक्कलकोट (१९), मंगळवेढा (१६.७), मोहोळ (११.६) अशा ठरावीक भागात पडला.

## पक्ष्यांमुळे पुण्यातील हवाई उड्डाणांना अडथळे

पुणे, दि. १० वृत्तसंस्था

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरून नियमित होणाऱ्या हवाई उड्डाणांना पक्ष्यांचा धोका कमी व्हावा, यासाठी हवाई दलाने पाच सदस्यांचे स्वतंत्र पथक स्थापन केले आहे. 'हाय डेसिबल झोन गन'ने पक्ष्यांना परिसरात येण्यास प्रतिबंधित केले जात आहे.

काही दिवसांपूर्वी विमानतळाच्या धावपट्टी परिसरात मोठ्या प्रमाणावर पक्षी असल्याने नियोजित उड्डाणांना तीन तास विलंब झाला. शुक्रवारी दिल्लीवरून पुणे विमानतळावर उतरणारे विमान पक्ष्यांच्या अडथळ्यामुळे दुसऱ्या मार्गावर वळवावे लागले. या घटनांच्या पार्श्वभूमीवर हवाई दलाने प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे.या विमानतळावर हवाई दलाचा नियमित सराव सुरू असतो. येथून नागरी उड्डाणेदेखील वाढविण्यात आली आहेत. विमानतळाच्या परिसरात स्वच्छता राखण्यासाठी हवाई दलाने स्थानिक स्वराज्य संस्थांसह, जिल्हा प्रशासनाबरोबर बैठक घेऊन तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र, अद्याप कुठलीच कार्यवाही झालेली नाही. अस्वच्छतेमुळे नागरिक मोठ्या प्रमाणावर कचरा टाकत आहेत. त्यामुळे पक्ष्यांचा अधिवास वाढला असून, त्याचा विपरित परिणाम विमानांच्या उड्डाणांवर होत आहे. हवाई दलाने उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र पथक स्थापन केले आहे.

## शासकीय आयटीआय अकोला येथे शिवराज्याभिषेक दिन जल्लोषात साजरा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास तसेच व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण विभागांतर्गत स्थानिक सम्राट चंद्रगुप्त मौर्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अकोला येथे शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याचे अत्यंत उत्साहपूर्वक आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याचे ऑनलाईन (आभाशी) पद्धतीने उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने संस्थेमध्ये विविध उपक्रम आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी झालेल्या मुख्य सोहळ्याला प्रमुख वक्ते म्हणून सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र देशपांडे हे उपस्थित होते. देशपांडे यांनी यावेळी केलेल्या मार्गदर्शनामध्ये सध्या समाजाला चांगला माणूस ही सर्वात महत्त्वाची गरज असल्याचे सांगितले. सध्या सर्वाधिक व्हेकन्सी चांगला माणूस या क्षेत्रातच उपलब्ध असल्याचे सुद्धा मिश्किलपणे त्यांनी सांगितले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या माणूस



द्या, मज माणूस द्या या सुप्रसिद्ध भजनाचा उल्लेख करीत देश प्रथम अशी भावना असलेल्या तरुण वर्गाची देशाला नितांत गरज असल्याचे प्रतिपादन केले.याकरिता छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर असावा असे नरेंद्र देशपांडे म्हणाले. तर श्रीकर सोमन यांनी पंचपरिवर्तन या संकल्पनेनुसार प्लास्टिक निर्मूलन आणि पर्यावरण या बद्दल मार्गदर्शन केले. संस्थेचे शिल्पनिदेशक तथा प्रसिद्धी समिती प्रमुख अरविंद पोहरकर यांनी दिलेल्या माहितीनुसार संस्थेत झालेल्या चित्रकला स्पर्धेमध्ये हेमलता कुशवाह,रिजवान शेख अजीम,पवन सिसोदे हे तर रांगोळी स्पर्धेमध्ये दामिनी काकड, गायत्री बुंदे, अक्षदा गावंडे हे अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले. सर्व विजेतांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पदक तथा प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य संतोष साळुंके,सूत्रसंचालन विनोद पायघन आणि आभार प्रदर्शन मंगेश पुंडकर यांनी केले. शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त संस्थेमध्ये वृक्षारोपण तसेच परिसर स्वच्छता अभियान राष्ट्रीय सेवा योजनेच्या मार्फत राबविण्यात आले. सर्व कार्यक्रमाच्या यशस्वी करिता संस्थेच्या सर्व कर्मचारी वृंद यांनी विविध समित्यांमध्ये कार्य करून परिश्रम घेतले.

## पावसाळी कवितांच्या सादरीकरणात रंगली सृजन साहित्य संघाची मासिक काव्य मैफल!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**मूर्तिजापूर , दि. १० :** येथील सुपरिचित लोटस् पब्लीक स्कुलच्या हॉलमध्ये सृजन साहित्य संघ व इतर संस्थांच्या सहकार्याने आयोजित काव्यमैफल पावसाळी कवितांमुळे छान रंगली.

मैफलसाठी अध्यक्ष म्हणून गझलकार संदीप वाकोडे व उच्चश्रेणी मुख्याध्यापिका लता सोळंके या प्रमुख आतिथी म्हणून लाभल्या होत्या.या मान्यवरांनी सरस्वती प्रतिमा व ग्रंथपुजन केल्यानंतर,त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उपस्थित कविंचे शब्दसुमनांनी स्वागत केल्या गेले.

याप्रसंगी केंद्रप्रमुख म्हणुन रवींद्र जवादे व विनोद महल्ले यांचीपदोन्नती झाल्यामुळे शिक्षण विभागाकडून गटसमन्वय कैलास सोळंके सर व साहित्य संस्थांकडून रामकृष्ण आसरे यांनी सत्कार केला. कवी मिलिंद इंगळे यांचा राज्यस्तरीय पुरस्कारासाठी सृजन साहित्य संघा व्दारा सन्मान करण्यात आला.तसेच सेवापुर्तीनिमित्त दिनकर ठाकरे यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर कविंनी सुंदर पावसाळी कविता सादर केल्यात,त्यामध्ये रवींद्र जवादे, प्रमोद पंत,संदीप वाकोडे, रामकृष्ण आसरे, ज्ञानदेव भड,कमलकिशोर जयस्वाल, लक्ष्मण कुऱ्हेकर,कैलास सोळंके, सुनिल डोंगरदिवे,विनोद महल्ले,लता सोळंके,विद्या गोसावी,वर्षा कावरे, देवयानी कावरे,तृप्ती उंबरकर,मीना जवादे,विलास वानखडे,निलेश उंबरकर,दिनकर ठाकरे,विष्णु लोडम,मिलिंद इंगळे,आमिर हुसेन,विजय इंगळे,कल्पक कांबळे, अरूण तायडे यांच्या रचनांनी मैफलिला रंगत आणली. गटसन्वयक कैलास सोळंके यांनी कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन केले. आभार विनोद महल्ले यांनी मानले. रसिक श्रोत्यांनी मैफलिचा छान आस्वाद घेतला. गझलदीप प्रतिष्ठान,कलाविष्कार बहुउद्देशिय संस्था,नेहरू युवा मंडळ, संस्कार भारती,ज्ञाननर्मदा बहु.संस्था या सहयोगी संस्थांनी आयोजनात सहकार्य केले.

## श्री शिवाजी महाविद्यालय वैतनिक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी डॉ.रामेश्वर भिसे



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि. १० :** श्री शिवाजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला येथील वैतनिक सहकारी पतसंस्थेची संचालक मंडळाची निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात निवडणूक बिनविरोध संपन्न. श्री शिवाजी महाविद्यालय वेतनिक पतसंस्थेची स्थापना १९६७ रोजी करण्यात आली आहे. महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांना अत्यंत सुलभ पध्दतीने आणि योग्य व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देणारी एकमेव पतसंस्था आहे.सोबतच पेन्शन धारकांच्या सर्वानगीन विकास करण्यासाठी कटिबद्ध असते.विविध सामाजिक उपक्रम या पतसंस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येत असतात.पतसंस्थेचा वार्षिक उलाढाल ही पाच कोटीच्या जवळपास आहे.श्री शिवाजी महाविद्यालय वेतनिक पतसंस्थेच्या सण २०२५-२६ ते २०२९-३० संचालक मंडळाची निवडणूक ही श्री शिवाजी महाविद्यालयात पार पडली ही निवडणूक बिनविरोध मध्ये एकमताने डॉ रामेश्वर भिसे यांची निवड अध्यक्ष म्हणून करण्यात आली तर उपाध्यक्ष डॉ संजय तिडके, सचिव राजेश गीते,सहसचिव विश्वास भाकरे यांची वर्णी लागली तर सदस्य म्हणून डॉ. नाना वानखडे, डॉ. संतोष बदने, प्रा नेत्रा मानकर,प्रा.संजय काळे, विजय इंगळे, वर्षा चांगोले, संजय काकड यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.निवडून आलेल्या संपूर्ण संचालक मंडळाचे अभिनंदन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व संपूर्ण कार्यकारिणी सदस्य यांनी केले.

## संशयास्पद मृतदेह आढळला

### चान्नी ठाणे हद्दीतील विवरा परिसरातील घटना

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बाळापूर , दि. १०**चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत विवरा चरणगाव रस्त्यावरील सोलर प्लांटच्या बाजूला संशयस्पद इसमाचा मृतदेह आढळल्याची घटना मंगळवार दि.१० जून रोजीच्या संध्याकाळी ५ वाजताच्या सुमारास उघडकीस आली, रमेश निंबोकार ४९ असे मृतक इसमाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मृतक दुपारी घरून कामानिमित्त बाहेर गेला होता. संध्याकाळी ५ वाजताच्या सुमारास विवरा परिसरात संशयस्पद मृतदेह आढळल्याचे वृत्त गावात पसरताच गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पोलिसांना माहिती दिली, ठाणेदार रवींद्र लांडे आपल्या ताफ्यासह त्वरित घटनास्थळी दाखल झाले, आणि मृतदेहाचा पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालय अकोला येथे पाठविण्यात आले आहे. मृतक रमेश निंबोकार याचा संशयस्पद मृत्यूप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, पुढील तपासाची प्रक्रिया चान्नी पोलिसांनी सुरू केली आहे.

विवरा परिसरात संशयस्पद इसमाचा मृत्यू झाल्याची माहिती मिळताच मृतदेहाचा पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे. उत्तरीय तपासणी अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

**रवींद्र लांडे**
ठाणेदार चान्नी

## पोलीस प्रशिक्षणार्थ्यांचा दीक्षांत संचलन समारंभ

**अकोला:** पोलीस प्रशिक्षण केंद्र येथील सत्र क्रमांक ६६ मधील ५३१ पैकी ५२० प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांचे दि. १९/०९/२०२४ पासून सुरु झालेले पोलीस शिपाई पदाचे मुलभूत प्रशिक्षण पूर्ण झाले त्यांचा दीक्षांत संचलन समारंभ ९ जून रोजी रोजी अमरावती विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. सत्र क्रमांक ६६ मधील पोलीस प्रशिक्षणार्थी यांनी दीक्षांत संचलन समारंभा दरम्यान परेड कमांडर, प्रशिक्षणार्थी रोल नंबर ४६१ सारगंधर गोविंद आकमार मुळ घटक जालना यांचे नेतृत्वात शिस्तबध्द व उत्कृष्ट कवायत संचलन सादर केले. अकोल्याच्या प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डॉ. निलेश पांडे यांनी आपल्या अहवाल वाचन केले तसेच प्रमुख अतिथींनी आपल्या भाषणात प्रशिक्षणार्थींचे अभिनंदन करुन प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण केंद्रामध्ये प्राप्त केलेल्या ज्ञानाचा पुर्णपणे वापर करुन जनतेस सेवा द्यावी, आदर्श माणुस व आदर्श पोलीस म्हणुन नावलौकीक मिळवावा.

## श्रीगोंदा तालुक्यात अतिवृष्टी; शेतकरी वाहून गेला

कर्जत, दि. १० प्रतिनिधी

श्रीगोंदा तालुक्यात उखलगाव परिसरात अतिवृष्टीने ओढ्याला आलेल्या पुरात भाऊसाहेब हरिभाऊ कोरेकर (वय ४२) हा शेतकरी वाहून गेला. नंतर त्याचा मृतदेह आढळला. आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी कोरेकर कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले. या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले तसेच पाझर तलावाचा भरावही खचला.श्रीगोंदा-पारनेर-नगर तालुक्याच्या सीमारेषेवरील उखलगाव येथे रविवारी दुपारी अवघ्या दोन तासांतच १०० मिमी पाऊस झाला. पीक व रस्ते पाण्याखाली गेले. पाझर तलाव क्रमांक एकच्या मातीचा भराव साडेगावाजवळ खचला. त्यामुळे वाळके मळ्याशी गावाचा संपर्क तुटला होता.

## रामापूर येथील तलाठी निवास कार्यालय सोयी-सुविधांअभावी धूळ खात

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. १० :** तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी व आदिवासीबहुल भाग असलेले गट ग्रामपंचायत रामापूर येथे शासनाने गेल्या २५ ते ३० वर्षा पासून लाखो रुपये खर्च करून तलाठी निवास कार्यालय बांधले आहे.मात्र तिथे कुठल्याही सोई सुविधा उपलब्ध करून दिल्या नसल्याने ते तलाठी निवास कार्यालय धूळख्यात पडलेले आहे.

तलाठी निवास कार्यालयाच्या आजूबाजूला गावातीलच काही लोकांनी इंधन,काडीकचरा,गुरेढोरे, बकऱ्या बांधण्यासाठी खुठे रोवून अतिक्रमण केले आहे.याबाबत रामापूरचे तलाठी व गावातूनच या अतिक्रमण बद्दल लेखी तक्रार सुध्दा करण्यात आली होती.याबाबत वेळोवेळी प्रसार माध्यमानी वृत्त प्रकाशित केले आहे. ग्राम पंचायत प्रशासनाने दखल घेऊन संबंधित अतिक्रमणधारक यांना ग्रामपंचायत मार्फत नोटीसेस बजावून आपआपले अतिक्रमण सात दिवसाच्या आत काढून मोकळे करावे अन्यथा आपल्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी असे कळविले होते.त्यावरून अतिक्रमणधारकांनी आपले अतिक्रमण स्वतःहून काढून मोकळे केले होते.मात्र या तलाठी निवास कार्यालयात लाईट,पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,टेबल,खुर्च्या,कोणत्याही सोई सुविधा उपलब्ध नसल्याने तलाठी यांना कार्यालय उघडून हजर राहणे साठी मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे.त्यामुळे तलाठी गावात हजर राहत नाहीत..

शासनाने दखल घेऊन रामापूर येथील तलाठी निवास कार्यालय समोरील अतिक्रमण ग्रामपंचायत यांना काढून मोकळे करण्याचे आदेश द्यावे.व तेथे तात्काळ सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्या. जेणे करून तेथे तलाठी हे कार्यालय उघडून तेथे रुजू होतील व शेतकऱ्यांना,शेतमुजरांना,शाळकरी विद्यार्थ्यांना लागणारे महत्वाचे कागदपत्र हे अकोटला न जाता गावातिलच तलाठी निवास कार्यालयात उपलब्ध करून देतील अशी मागणी होत आहे.रामापूर येथील तलाठी निवास कार्यालयकडे शासनाचे दुर्लक्ष,सोईसुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी.

## शिवसैनिकांवर अन्याय होणार नाही, संभ्रमात राहू नये : श्रीरंग पिंजरकर, अश्विन नवले यांचे आश्वासन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि. १० :** शिवसैनिकांनी कोणत्याही प्रकारच्या संभ्रमात राहू नये. अकोला महानगरपालिका क्षेत्रातील तसेच अकोला तालुक्यातील कुठल्याही शिवसैनिकावर अन्याय होणार नाही, असे स्पष्ट आश्वासन जिल्हाप्रमुख श्रीरंगदादा पिंजरकर आणि अश्विन नवले यांनी दिले.

अकोला जिल्ह्याचे शिवसेना संपर्कप्रमुख व केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला जिल्हा पूर्व व पश्चिम विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेची आढावा बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीस जिल्हाप्रमुख श्रीरंगदादा पिंजरकर, जिल्हाप्रमुख अश्विन नवले, महानगरप्रमुख योगेश अग्रवाल आदी प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.या बैठकीत शिवसैनिकांमध्ये संघटनात्मक बांधणी, येणाऱ्या महानगरपालिका,



जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतील युती व तिकीट वाटपाबाबत निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यात आला. कोणत्याही पदाधिकारी अथवा कार्यकर्त्यांवर अन्याय होणार नाही, तसेच सर्व निर्णय पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार घेतले जातील, असे दोन्ही जिल्हाप्रमुखांनी स्पष्ट केले. यावेळी अकोला महानगर व तालुक्यात मोठ्या प्रमाणावर प्रवेश व नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. अविनाश मोरे यांची निवासी उपजिल्हाप्रमुख, संजय रोहनकार यांची कामगार सेनेच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. कुटासा सर्कलप्रमुखपदी विरसिंग ठाकूर, एलआयसी सेल जिल्हाप्रमुखपदी प्रकाश भट्टी, प्रभाग ८ व ९ साठी विशाल धोटे व रितेश दुबे, प्रभाग ७ साठी गौरव राईकवार व अक्षय येरमेकर यांची उपशहरप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. तसेच विभागप्रमुख म्हणून आशीष काळे, विनोद अग्रवाल, शशिकांत कोटरवाल तर शाखा प्रमुखपदी अजित वर्मा यांची नियुक्ती झाली. यावेळी विविध पक्षांतील कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. यामध्ये संजय ठाकूर, शुभम विजयकर, पवन विजयकर, समीर गोपनारायण, आदित्य कदम, पियुष तवर, विकी गौसर आदींचा समावेश होता. या बैठकीस जिल्ह्यातील विविध पदाधिकारी व शेकडो शिवसैनिक उपस्थित होते.

## थोडक्यात

### नीट पीजी परीक्षा ३ ऑगस्ट रोजी

**मुंबई :** दोनऐवजी एका सत्रात परीक्षा घेण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढे ढकलण्यात आलेल्या पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या (नीट पीजी) परीक्षेची तारीख राष्ट्रीय वैद्यकीय शास्त्र परीक्षा मंडळाने (एनबीईएमएस) जाहीर केली आहे. त्यानुसार नीट पीजी परीक्षा ३ ऑगस्ट रोजी होणार आहे. यासाठी परीक्षा केंद्र पसंतीक्रम नोंदविण्यासाठी १३ ते १७ जूनपर्यंत मुदत देण्यात येणार आहे. पर्सेंटाईलमुळे होणारा गोंधळ लक्षात घेऊन वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी नीट पीजी परीक्षा देणाऱ्या दोनऐवजी एका सत्रात घेण्यासाठी न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार एनबीईएमएसने नीट पीजी परीक्षा एकाच सत्रामध्ये घेण्याचा निर्णय घेऊन ही परीक्षा ३ ऑगस्ट रोजी घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. परीक्षा एकाच सत्रामध्ये घेण्यासाठी एनबीईएमएसने परीक्षा केंद्र असलेल्या शहरांमध्ये वाढ केली आहे. तसेच सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचे परीक्षा केंद्र निवडण्यासाठी शहर निवडण्यासाठी पुन्हा अर्ज करावा लागणार आहे. हा अर्ज करण्यासाठी उमेदवारांना १३ जून रोजी दुपारी ३ नंतर संकेतस्थळावर पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना १७ जून रोजी रात्री ११ वाजून ५५ मिनिटांपर्यंत शहरांचा पसंतीक्रम भरता येणार आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी निवडलेल्या शहरातील परीक्षा केंद्राची एनबीईएमएसद्वारे वाटप करण्यात येणार आहे.

### द्वेषपूर्ण भाषण प्रकरणात न्यायमूर्ती यादव यांची होणार चौकशी

**मुंबई :** अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शेखर कुमार यादव यांच्यावर महाभियोग चालवण्यासाठी राज्यसभा चौकशी समिती स्थापन करण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड हे नोटीसवर कारवाई करणार असल्याचे म्हटले जात आहे. न्यायमूर्तींनी दिलेल्या कथित द्वेषपूर्ण भाषणाची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती स्थापन करू शकतात. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये विहिंपच्या एका कार्यक्रमात कथित द्वेषपूर्ण भाषण दिल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.
एका इंग्रजी वर्तमानपत्राने दिलेल्या वृत्तात दावा केला आहे की, न्यायमूर्तीविरुद्ध महाभियोग प्रस्ताव आणण्यासाठी विरोधी पक्षाच्या खासदारांनी धनखड यांना ५५ खासदारांच्या स्वाक्षऱ्या असलेले निवेदन सादर केल्यानंतर सहा महिन्यांनी, या स्वाक्षऱ्यांची पडताळणी करण्याची प्रक्रिया सुरू आहे. न्यायाधीश चौकशी कायद्यानुसार, न्यायाधीशांविरुद्ध महाभियोगाची कार्यवाही सुरू करण्यासाठी, राज्यसभेतील किमान ५० खासदारांनी किंवा लोकसभेतील किमान १०० खासदारांनी प्रस्तावावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.२१ मार्च रोजी धनखड यांनी राज्यसभेत सांगितले होते की खासदारांच्या स्वाक्षऱ्या पडताळण्यासाठी त्यांना दोन मेल पाठवण्यात आले आहेत. ते म्हणाले, ''या निवेदनावर स्वाक्षरी करणाऱ्या ५५ खासदारांपैकी एका सदस्याची स्वाक्षरी दोन वेळा दिसून येते आणि संबंधित सदस्याने ती त्यांची स्वाक्षरी म्हणून स्वीकारण्यासही नकार दिला आहे. आता मला या कामात सहभागी व्हायचे नाही, ज्यामुळे उच्च स्तरावर दोषी ठरवले जाऊ शकते. जर खासदारांची संख्या ५० पेक्षा जास्त असेल तर मी त्यानुसार कारवाई करेन. बहुतेक खासदारांनी सहकार्य केले आहे. परंतु ज्या सदस्यांनी अद्याप असे केले नाही त्यांनी त्यांना पाठवलेल्या दुसऱ्या मेलला उत्तर द्यावे.''

### आम्ही अमेरिकेत थांबायचे की भारतात परतायचे? हार्वर्डमधले विद्यार्थी बुचकळ्यात

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सरकार आणि हार्वर्ड विद्यापीठामध्ये सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, तेथे शिकत असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. याचबरोबर, नोकरीच्या संधीच्या कमतरतेमुळे करिअरविषयी अनिश्चितताही निर्माण झाल्याचे भारतीय विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. गेल्या काही दिवसांत ट्रम्प प्रशासन आणि हार्वर्ड विद्यापीठ यांच्यात घडलेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, नाव न सांगण्याच्या अटीवर, गेल्या महिन्यात हार्वर्ड केनेडी स्कूलमधून पदवीधर झालेला एक भारतीय विद्यार्थी म्हणाला की, ''आम्ही काय करावे, आम्ही घरी परतावे की येथेच काहीतरी करण्याचा प्रयत्न करावा, हे समजेनासे झाले आहे.''हार्वर्ड विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर पीटीआय वृत्तसंस्थेशी बोलताना गेल्या काही महिन्यांत ट्रम्प प्रशासन आणि विद्यापीठ यांच्यातील तणावामुळे त्यांच्यावर काय परिणाम झाला याचे अनुभव सांगितले आहेत. हार्वर्ड ग्रॅज्युएट स्कूल ऑफ डिझाईनमधून दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करून पदवीधर झालेल्या आणखी एका भारतीय विद्यार्थिनीने सांगितले की, ''विद्यार्थी अमेरिकन संस्थांमध्ये त्यांचे शिक्षण पूर्ण करण्याच्या आणि नंतर काही वर्षे अमेरिकेत नोकरी करण्याच्या हिशेबाने येतात.''

# ट्रम्प आणि मस्क कुटुंबाच्या वादात रशिया मध्यस्थ

**नवी दिल्ली, दि.१० वृत्तसंस्था**



अब्जाधीश उद्योगपती एलॉन मस्क यांचे वडील एरोल मस्क सध्या रशियामध्ये आहेत. ते भारतातून थेट रशियाची राजधानी मॉस्कोला पोहोचले आहेत. त्यांचा मुलगा मस्क आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील संबंध अतिशय वाईट टप्प्यातून जात असताना त्यांची ही भेट येत आहे. अशा परिस्थितीत, रशिया मध्यस्थी करण्याच्या तयारीत असल्याचे दिसते.
ट्रम्प आणि मस्क यांच्यातील या लढाईत रशिया मध्यस्थीची भूमिका बजावण्यास उत्सुक दिसत आहे. रशियाने प्रथम मस्क यांना राजकीय आश्रय दिला आणि आता एलॉन मस्क यांचे वडील एरॉल मस्क रशियामध्ये असताना त्यांचे भव्य आदरातिथ्य केले जात आहे. ट्रम्प आणि एलॉन यांच्यातील या युद्धादरम्यान, रशियाने एक धक्कादायक विधान केले होते. ''जर अरब एलॉन यांना रशियामध्ये आश्रय घ्यायचा असेल तर आम्ही त्यासाठी तयार आहोत,'' असे पुतिन म्हणाले होते. रशियन संसदेच्या आंतरराष्ट्रीय व्यवहार समितीचे उपाध्यक्ष दिमित्री नोविकोव्ह म्हणाले की, ''जर गरज पडली तर रशिया मस्कला आश्रय देऊ शकतो.'' मॉस्कोला पोहोचलेल्या एरॉल मस्क यांनी रशियाचे अध्यक्ष पुतिन यांचे कौतुक केले आहे. यावेळी त्यांनी,''पुतिन हे खूप प्रभावशाली व्यक्ती आहेत हे त्यांनी सिद्ध केले आहे.'' असेहि म्हटले आहे. फ्युचर २०५० फोरमच्या वेळी मस्क यांना विचारण्यात आले की जर ते रशियन राष्ट्राध्यक्षांना भेटले तर त्यांना कोणते प्रश्न विचारायचे आहेत. यावर एरॉल म्हणाले की, ''त्यांना वाटत नाही की ते पुतिन यांना प्रश्न विचारण्याच्या स्थितीत आहेत परंतु गेल्या काही वर्षांत रशियामधील जीवन खूप चांगले झाले आहे आणि हे चांगल्या नेतृत्वामुळे घडले आहे. म्हणून मी त्यांना (पुतिन) विचारू इच्छितो की ते मला चांगले नेतृत्व कसे द्यावे हे शिकवू शकतील का? तुम्ही मला त्याच्या युक्त्या शिकवू शकाल का?'' असे म्हटले.मस्क आणि ट्रम्प यांच्यातील बहुचर्चित भांडणावर एलॉनचे वडील म्हणाले की, ''काही काळ दोघांमध्ये खूप तणाव होता आणि या तणावामुळे परिस्थिती अशी बनली. त्यांनी दोघांमधील या भांडणाला पती-पत्नीमधील भांडण म्हटले आणि ते दोघेही लवकरच समेट करतील असे सांगितले. ट्रम्प यांना जाहीर आव्हान देऊन मस्कने चूक केली असेही त्यांनी म्हटले. दोघेही लवकरच समेट करतील कारण ट्रम्प हे राष्ट्राध्यक्ष असल्याने त्यांचे वर्चस्व आहे. अशा परिस्थितीत, एरॉलची मॉस्को भेट आणि त्यांची विधाने रशियाकडून एक संधी म्हणून पाहिली जात आहेत. काही विश्लेषकांचा असा विश्वास आहे की रशिया या परिस्थितीचा वापर ट्रम्प प्रशासनाला कमकुवत करण्यासाठी आणि मस्क यांना आपल्या बाजूने आणण्यासाठी करत आहे.

## रेल्वेमंत्र्यांनी मुंबई लोकल ट्रेन दुर्घटनेवर बोलणे टाळले

**नवी दिल्ली, दि.१० वृत्तसंस्था**

मुंब्रा आणि दिवा स्थानकादरम्यान दोन लोकल गाड्या एका वळणावर अगदी जवळून जात असताना, दरवाज्यांजवळ लटकलेल्या प्रवाशांची बॅग एकमेकांवर आदळल्याने मोठी दुर्घटना घडली. ट्रॅकवर पडलेल्या १३ जणांपैकी चौघांचा मृत्यू झाला असून इतर प्रवाशी जखमी आहेत.
सोमवारी (९ जून) सकाळी साडे नऊ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. मृतांमध्ये जीआरपी पोलिसाचाही समावेश आहे. या घटनेनंतर विविध राजकीय प्रतिक्रिया समोर येऊ लागल्या. मात्र केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल प्रसारमाध्यमांसमोर किंवा सोशल मीडियावर येऊन या घटनेबाबत कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.सोशल मीडियावर सक्रीय असणारे अश्विनी वैष्णव यांनी मुंबई अपघातात मृत्यू झालेल्यांबद्दल सांत्वन किंवा श्रद्धांजलीही सोशल मीडियावर वाहिलेली नाही. दिल्लीत सोमवारी मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित कार्यक्रमाला ते उपस्थित होते. त्यावेळी त्यांना मुंबईतील दुर्घटनेबद्दल विचारण्यात आले. मात्र यावर त्यांनी अधिक बोलणे टाळले. रेल्वे मंत्रालयाने मुंबईतील अपघाताबाबत पत्रक काढले आहे. त्यामुळे या मुद्द्यावर जास्त बोलण्याची गरज नाही, असे त्यांनी सांगितले.
९ जून २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास ही दुर्घटना घडली. दिवा आणि मुंब्रा स्थानकादरम्यान दोन लोकल गाड्या एक कसाराकडे जाणारी आणि दुसरी सीएसएमटीकडे जाणारी एकमेकांच्या अगदी शेजारील ट्रॅकवरून भरधाव वेगाने जात होत्या.

## नीतीश-भाजपने कायदा अन् सुव्यवस्था धुळीला मिळविली

### लालूंची सडकून टीका ; जेडीयूचेही प्रत्युत्तर

**नवी दिल्ली , दि.१० वृत्तसंस्था**



बिहारची राजधानी पाटणा याठिकाणी गुन्हेगार कोणत्याही भीतीशिवाय गुन्हे करत आहेत. गेल्या २४ तासांत याठिकाणी चार खुनाच्या घटना घडल्या आहेत. पहिली घटना सोमवारी पटनाच्या आलमगंज पोलीस ठाण्याच्या परिसरात घडली, जिथे एका महिलेची आणि तिच्या मुलीची गोळ्या घालून हत्या करण्यात आली, तर दुसरी घटना आज पटना लगतच्या बिक्रम पोलीस ठाण्याच्या परिसरातील मजौली सिंघारा रस्त्यावर घडली, जिथे दिवसाढवळ्या टवाळखोरांनी दुचाकीवरून जाणाऱ्या दोन तरुणांची गोळ्या घालून हत्या केली. या गुन्हेगारी घटनांनंतर बिहारचे राजकारण आता तापले आहे.
राजद प्रमुख लालू प्रसाद यादव यांनी नितीश कुमार आणि भाजपवर जोरदार हल्ला चढवला. त्यांनीसोशल मीडियावर लिहिले की नितीश यांनी सांगावे की संध्याकाळी ५ वाजण्यापूर्वी घरात घुसून किती खून होत आहेत? नितीश यांना माहिती आहे का आणि समजते का की अधिकृत आकडेवारीनुसार त्यांच्या कारकिर्दीत ६५,००० खून झाले आहेत? एवढेच नाही तर लालू म्हणाले की, नितीश-भाजपने केवळ कायदा आणि सुव्यवस्थाच नष्ट केली नाही तर ती जाळून टाकली आहे. बिहारमध्ये इतके भ्रष्ट, निष्काळजी आणि आळशी पोलिस कधीच नव्हते.'' असे म्हणत त्यांच्यावर सडकून टीका केली आहे.आरोप-प्रत्यारोपांचा हा सिलसिला इथेच थांबला नाही. जेडीयू नेते अभिषेक झा म्हणाले की, लालू यादव आणि राजद नितीश कुमार यांची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करत आहेत.

## लॉस एंजेलिसमध्ये आणखी २ हजार नॅशनल गार्ड्स तैनात

**लॉस इंजेलिस, दि.१० वृत्तसंस्था**



डोनाल्ड ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा अमेरिकेची सूत्रे हाती घेतल्यापासून बेकायदा स्थलांतरितांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. यापूर्वी लाखो बेकायदा स्थलांतरितांना अमेरिकेतून त्यांच्या मायदेशी पाठवण्यात आल्यानंतर, आता आणखी अशा स्थलांतरितांची अमेरिकेच्या विविध राज्यांमध्ये शोधमोहीम सुरू आहे. अमेरिकन प्रशासनाच्या या कारवाईच्या विरोधात लॉस एंजेलिसमध्ये लाखो लोक रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत.
लॉस एंजेलिसमधील या आंदोलकांना रोखण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी गव्हर्नरच्या संमतीशिवाय नॅशनल गार्ड्स तैनात केले होते. नॅशनल गार्ड्स तैनात झाल्यानंतर तेथील परिस्थिती आणखी चिघळली असून आंदोलकही आक्रमक झाले आहेत. काल या स्थलांतरविरोधी कारवाईच्या आंदोलकांनी मोठ्या प्रमाणात जाळपोळ केल्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते.
दरम्यान, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या आंदोलनाविरोधात आणखी कठोर पाऊल उचलत लॉस एंजेलिसमध्ये अतिरिक्त २००० नॅशनल गार्ड्स तैनात करण्यास मान्यता दिली. तत्पूर्वी स्थलांतरविरोधी कारवाईच्या विरोधात लॉस एंजेलिसमध्ये सुरू असलेल्या गोंधळामुळे अमेरिकेच्या संरक्षण विभागाने सोमवारी नॅशनल गार्डला मदत करण्यासाठी सुमारे ७०० मरीन (लष्कराचे जवान) तैनात केले होते.
कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी व केंद्रीय कर्मचारी आणि मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लॉस एंजेलिसमध्ये किमान ३०० नॅशनल गार्ड्स तैनात केले होते. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी राज्याच्या परवानगीशिवाय नॅशनल गार्ड्स तैनात करण्याची १९६५ नंतरची ही पहिलाच घटना आहे.कॅलिफोर्नियाचे गव्हर्नर गॅविन न्यूसम यांनी ट्रम्प प्रशासनाला नॅशनल गार्ड्सच्या तैनातीचा आदेश मागे घेण्याची विनंती केली आहे. न्यूसम यांनी यावेळी ट्रम्प यांच्यावर राज्याच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन करण्याचा आरोप केला आहे. ''ही एका हुकूमशहाची कृत्ये आहेत, राष्ट्राध्यक्षांची नाही'', असे त्यांनी एक्स वर लिहिले आहे.

## तेजस्वी यादव यांच्या अध्यक्षतेखाली १२ जूनला महायुतीची बैठक

**पटणा , दि.१० वृत्तसंस्था**

बिहारच्या विधानसभा निवडणुकीच्या तयारी संदर्भात महायुतीची पुन्हा एक बैठक आयोजित काण्यात आली आहे. ही बैठक येत्या १२ जून रोजी होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. तेजस्वी यादव यांच्या अध्यक्षतेखाली पाटणा याठिकाणी त्यांच्या अधिकृत निवासस्थानी ही बैठक पार पडणार आहे.विधानसभा निवडणुकीसंदर्भात महायुतीची ही चौथी बैठक आहे. त्यात आरजेडी, कॉँग्रेस, विकासशील इन्सान पार्टी, सीपीआय एमएल, सीपीआय आणि सीपीएमचे नेते उपस्थित राहतील. समन्वय समितीच्या सदस्यांसह, सर्व उपसमित्यांचे सदस्य देखील या बैठकीत उपस्थित राहतील. तेजस्वी प्रसाद यादव, अब्दुल बारी सिद्दीकी, संजय यादव, आरजेडीकडून आलोक मेहता रणविजय साहू, कॉँग्रेसकडून प्रदेशाध्यक्ष राजेश राम, प्रभारी कृष्णा अल्लावरू, विधिमंडळ पक्षाचे नेते शकील अहमद खान, डॉ. मदन मोहन झा, कुणाल, धीरेंद्र झा, सीपीआय एमएलकडून राजाराम सिंह, सीपीएमकडून लालन चौधरी, अजय कुमार, अवधेश कुमार इत्यादी बैठकीला उपस्थित राहतील. सीपीआयकडून रामनरेश पांडे, रामबाबू कुमार, अजय कुमार सिंह उपस्थित राहतील तर व्हीआयपीकडून मुकेश साहनी उपस्थित राहतील.

## मुंबईत स्वच्छता करणारे कामगार एल्गाराच्या तयारीत

**मुंबई, दि.१० वृत्तसंस्था**

मुंबई महानगरपालिका प्रशासनाने घन कचरा व्यवस्थापन खात्यात खाजगीकरण करण्याचा घाट घातला असून या खाजगीकरणाला कामगार, कर्मचाऱ्यांचा प्रचंड विरोध होत आहे. पालिकेच्या या निर्णयाविरोधात कामगार, कर्मचाऱ्यांनी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी ११ जून रोजी दुपारी २ वाजता दादर येथील शिवाजी मंदिरात 'प्रचंड मेळावा' आयोजित करण्यात आला आहे.
महानगरपालिकेतील घन कचरा व्यवस्थापन खात्यात काम करणारे मोटरलोडर कामगार आणि परिवहन खात्यातील कामगारांचे कायमस्वरूपी काम काढून ते कंत्राटदारामार्फत करण्याचा निर्णय महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे.
याबाबतची निविदा १४ मे रोजी काढण्यात आली आहे. कचरा व्यवस्थापन खात्यातील खाजगीकरणाला कामगार, कर्मचाऱ्यांकडून प्रचंड विरोध होत आहे. खाजगीकरणाचा निर्णय मागे घेण्याची मागणी कामगार वर्गातून होऊ लागली आहे. ही निविदा रद्द न झाल्यास सर्व कामगार, कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या संपुष्टात येतील, अशी भीती त्यांना सतावत आहे. तसेच वारसा हक्क (पी.टी. केस) नोकरी देखील धोक्यात येणार आहेत. घनकचरा व्यवस्थापन खात्यातील एरिया बेसच्या नावाखाली संपूर्ण मोटरलोडर आणि परिवहन पालिकेच्या कायमस्वरुपी कामगारांच्या नोकऱ्या हिरावून घेण्याचे धोरण पालिका प्रशासनाने अवलंबिल्याचा आरोप कामगारांकडून केला जात आहे.

## उत्तराखंडमध्ये राज्याबाहेरील वाहनांवर लागू झाला ग्रीन टॅक्स

**नवी दिल्ली, दि.१० वृत्तसंस्था**



उत्तराखंडच्या धामी सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे, आता उत्तराखंडात येणाऱ्या बाहेरील राज्यातील वाहनांकडून ग्रीन केस कर आकारला जाणार आहे. या संदर्भात मंत्रिमंडळात निर्णय घेण्यात आला आहे.
आता लवकरच काम सुरू केले जाईल. उत्तराखंडमध्ये येणारी वाहने यापुढे ग्रीन सेसपासून वाचू शकणार नाहीत. राज्याच्या सर्व सीमांवर एएनपीआर कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तूमची गाडी एका कॅमेराच्या नजरेपासून वाचली, तर दुसरा कॅमेरा ग्रीन सेस कापून घेईल.
राज्याच्या सिमेवर एकदा कर कट झाला तर तो २४ तास वैध होईल. आपण २४ तासांत किती वेळा राज्यात जाल किंवा आत याल हे महत्त्वाचे नाही, परंतु २४ तास आपला कर फक्त एकदाच कट केला जाईल. उत्तराखंड परिवहन विभाग या महिन्याच्या अखेरीस राज्यभरात कट ग्रीन सेस कटची प्रक्रिया सुरू करणार आहे. यासाठी नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने निवडलेल्या एजन्सीशी करार केला आहे.
आता हे वाहन पोर्टलशीही समन्वय साधत आहे. संयुक्त परिवहन आयुक्त सनात कुमार सिंह म्हणाले की, उत्तराखंडच्या सीमेवर बाह्य राज्यातील वाहन प्रवेश करताच त्याचा ग्रीन कॅमेऱ्याच्या मदती कर कापटा जाईल. सर्व सीमेवर स्वयंचलित नंबर प्लेट ओळख (एएनपीआर) कॅमेरे स्थापित केले गेले आहेत. परिवहन आयुक्त एसके सनाट यांनी सांगितले की, कॅमेरामध्ये वाहन येताच त्याचा हिरवा उपकर फास्टॅग खात्यातून कापला जाईल. जर काही कारणास्तव वाहन कॅमेऱ्यावर टिकून राहिले तर ग्रीन सेस पुढील कॅमेऱ्यावरून कापला जाईल.
अवजड वाहन -३ एक्सल ४५०, हेवी व्हेकल -४ ते ६ एक्सल ६००, ७ एक्सल किंवा त्याहून अधिक ७००, मध्यम व भारी मालवाहू वाहन (७.५-१८.५ टन) २५०, हलक्या वस्तूंचे वाहन (३-७.५ टन) १२० डिलिव्हरी व्हॅन (३ टन पर्यंत) ८०, जड बांधकाम उपकरणे वाहन २५०, बस (१२ जागा) १४०, मॅक्स कॅब, मॅक्स कॅबबीबीबी.
राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे, कारण आमच्याकडे राज्यात लाखाहून अधिक वाहन नोंदणी आहे, तर दरवर्षी राज्यात कोटी लोक पर्यटनासाठी इथे पोहोचतात.

## सोनमनेच पतीला दरीत ढकलले : शेवटच्या श्वासापर्यंत राजा लढला

**डुंगरपूर, दि.१० वृत्तसंस्था**

इंदौरचं कपल राजा रघुवंशी आणि सोनम हनीमूनला गेल्यानंतर बेपत्ता झालं होतं. राजा रघुवंशीचा मृतदेह सापडल्यानंतर आठवड्याभराने सोनमने गाझीपूरमध्ये पोलिसांसमोर आत्मसर्पण केल्यानंतर खळबळ उडाली. आतापर्यंत या घटनेत अनेक धक्कादायक खुलासे झाले आहेत. सोनमसह आणखी चौघांना या प्रकरणी अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सोनमने सुपारी देऊन पतीची हत्या करवून घेतली. पती राजाच्या हत्येचा कट तिने प्रियकरासोबत मिळून रचला.सोनमच्या वडिलांनी कॉँन्ट्रॅक्ट किलिंगचे आरोप निराधार असल्याचा दावा केलाय. मुलगी निर्दोष असून तिला अडकवण्याचा प्रयत्न होत असल्याचं ते म्हणालेत. तर राजाचा भाऊ विपिन रघुवंशी यांनी सांगितलं की, सोनमने सरेंडर केलं नाही तर कुटुंबियांनी फोन आल्यानंतर त्यांनी पोलिसांना सांगितलं. अचानक घडलेल्या या घडामोडींनी प्रकरणाला धक्कादायक वळण लागलं आहे.राजा रघुवंशीची हत्या पत्नी सोनमच्या समोरच झाल्याचं आता समोर येत आहे. मेघालय पोलिसांच्या हवाल्याने सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार राजा रघुवंशीच्या हत्येचा कट सोनम आणि प्रियकर राज कुशवाह यांनी मिळून रचला होता. कोणालाही याची कुणकुण लागू नये यासाठी दोघांनी मिळून राजाचा काटा काढण्याचा प्लॅन केला होता.




सोनम आणि राजा यांचं ११ मे रोजी लग्न झालं तेव्हा दोन्ही कुटुंबियं आनंदात होते. पण या आनंदावर १५ दिवसातच वीरजण पडेल असं कुणालाही वाटलं नव्हतं. सोनम राजाच्या कुटुंबियांशी असं वागत होती जसं ती गेल्या कित्येक वर्षांपासून त्यांना ओळखते. तिच्यावर जराशीही शंका राजाच्या कुटुंबियांना आली नाही.सोनमने आखलेल्या प्लॅननुसार राज कुशवाह इंदौरमध्येच राहिला. सोनम, विशाल, आकाश आणि आनंद हे शिलाँगला गेले. सोमनने सर्वांना वेगवेगळ्या ठिकाणी आणि आपल्या होम स्टेपासून दूर रहायला सांगितलं होतं. त्यामुळे आरोपी शिलाँगमधील सोमन आणि राजाच्या होम स्टेपासून १ किमी दूर अंतरावर होते. त्या सगळ्यांचे नंबर सोनमकडे होते. सोनम जिथे जायची तिथलं लोकेशन आरोपींना पाठवायची. यामुळे आरोपींना राजापर्यंत पोहोचण्यासाठी मदत मिळायची. २३ मे रोजी सोनम राजाला दुर्गम अशा कोरसा इथं घेऊन गेली. फोटो शूटचा बहाणा करून राजला नेलं. वाटेत आणखी तीन लोक त्यांना भेटले. सगळे मिळून वरती चालत गेले. त्यावेळी सोनम थकल्याचं नाटक करून हळू हळू मागेच थांबली.पर्वतावर जाताना आरोपीही थकले होते आणि त्यांनी राजाची हत्या करण्यास नकार दिला. सोनमला तिचा प्लॅन फेल होण्याची भीती वाटली. त्यावेळी तिने आरोपींना काहीही करा राजाला मारावंच लागेल. या बदल्यात २० लाख रुपये देईन असं सांगितलं. राजाच्या पाकिटातून काढलेले १५ हजार रुपयेसुद्धा दिले. राजा रघुवंशीच्या हत्या प्रकरणात चौघांचा सहभाग होता. यात विशाल चौहानने राजावर मागून हल्ला केला. त्यावेळी सोनमसुद्धा तिथं होती. तर दुसरा आरोपी आकाश राजपूत भाड्याने बाईक घेऊन आजूबाजूला नजर ठेवून होता. राजाने आरोपींना रोखण्याचा प्रयत्न केला पण तो जखमी झाला होता. दरीत फेकण्याच्या आधीपर्यंत त्याचा श्वास सुरू होता.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

# शिक्षण : संक्रमणातून सर्जनशीलतेकडे

भारतातील शैक्षणिक क्षेत्र गेल्या काही वर्षांपासून एका संक्रमण काळातून जात आहे. समाज, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, आणि जागतिक बदल या साऱ्यांचा परस्परसंबंध शिक्षणव्यवस्थेवर खोलवर परिणाम करतो आहे. विशेषतः कोविड-१९ नंतरच्या काळात शिक्षणाच्या पद्धती, माध्यमं, मूल्यं आणि अपेक्षा यामध्ये आमूलाग्र बदल झालेले आहेत.''शिक्षण हे केवळ शाळा, पुस्तके वा परीक्षा यापुरते मर्यादित नसून ते समाजाच्या समृद्धीचा पाया आहे. त्याचे स्वरूप बदलत असले तरी त्याची मूलभूत उद्दिष्टे - समता, समज, संवेदना आणि सर्जनशीलता - ही कायम राहिली पाहिजेत.''एकीकडे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा प्रभावी अंमलबजावणीचा प्रयत्न सुरू असताना दुसरीकडे अद्यापही ग्रामीण व उपनगरांतील शिक्षण संस्था मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. परिणामी, 'शिक्षणाचा अधिकार' हा केवळ कायद्यातील तत्त्व न राहता तो प्रत्यक्षात विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतो आहे का, असा प्रश्न सातत्याने उपस्थित होत आहे.

कोविडकाळात देशातील सुमारे ३२ कोटी विद्यार्थी शिक्षणप्रक्रियेतून प्रत्यक्षपणे वंचित राहिले. ऑनलाइन शिक्षणाचा पर्याय सहजरीत्या सर्वांना उपलब्ध नव्हता. विशेषतः ग्रामीण भागातील मुलांकडे स्मार्टफोन, इंटरनेट, सततची वीज यांचा अभाव होता. यामुळे शिक्षणात एक प्रकारचा सामाजिक आणि तांत्रिक दरी निर्माण झाला. सरकारने दीक्षा ॲप, स्वयं पोर्टल, किंवा टी.व्ही. आधारित शिक्षण कार्यक्रम राबवले, मात्र त्या माध्यमांमध्ये सहभाग घेणाऱ्यांची संख्या ही शहरांपुरतीच मर्यादित राहिली. शिक्षणसंस्थांच्या यंत्रणाही अशा तात्काळ बदलासाठी तयार नव्हत्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तर झालेच, पण अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण सोडले, ही वस्तुस्थितीही नाकारता येणार नाही. युनिसेफच्या अहवालानुसार, भारतात २०२१ मध्ये जवळपास २५% विद्यार्थ्यांनी नियमित ऑनलाइन वर्ग घेतले नव्हते.



शैक्षणिक

प्रा.सचिन सुरवाडे
मो. 9960867504

सध्याच्या शैक्षणिक स्थितीकडे पाहिल्यास, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात गुणात्मक सुधारणा आवश्यक असल्याचे लक्षात येते. सरकारने लागू केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत मातृभाषेतून शिक्षण, क्रियाशील अध्यापन, कौशल्याधारित शिक्षण, आणि शिक्षकांचे सशक्तीकरण यावर भर दिला आहे. हे धोरण परिवर्तनाचे दालन उघडणारे ठरू शकते, उदाहरणार्थ, केरळ व कर्नाटक या राज्यांमध्ये -२०२० च्या अंमलबजावणीत काही शाळांनी प्रकल्पाधारित शिक्षण, कौशल्याभिमुख उपक्रम व शिक्षक प्रशिक्षणाच्या माध्यमातून उल्लेखनीय बदल घडवले आहेत. यातून इतर राज्यांना शिकण्यासारखे आहे .महाराष्ट्रातही -२०२० अंतर्गत काही जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर बदल सुरू झाले आहेत,हे जरी खरे असले तरी देखील प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना अनेक अडचणी समोर येतात हे सुध्दा लक्षात घ्यावं लागेल.शिक्षकांचे प्रशिक्षण, अभ्यासक्रमाचे पुनर्रचना, मूल्यमापन पद्धतींचे फेरविचार हे अद्यापही प्राथमिक टप्प्यातच आहेत.

शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेचा आत्मा आहे, हे जरी खरे असले, तरी सध्याच्या व्यवस्थेत शिक्षकांवर प्रशासनिक कामांचा आणि कागदोपत्री जबाबदाऱ्यांचा ताण खूप वाढलेला आहे. शिक्षकांना डिजिटल कौशल्ये आत्मसात करावीत लागली, मात्र त्यासाठी आवश्यक वेळ, साधनं आणि प्रशिक्षण पुरेशा प्रमाणात दिलं गेलं नाही. अनेक शिक्षक आजही प्रोजेक्टर, ई-कन्टेन्ट, किंवा स्मार्ट क्लास यांचा प्रभावी वापर करण्यात अडखळत आहेत. शिक्षकांच्या कार्यशक्तीचा योग्य वापर झाला, तर शिक्षण अधिक अर्थपूर्ण ठरू शकते. दुसरीकडे विद्यार्थ्यांमध्ये वाढणारे मानसिक आरोग्याचे प्रश्न हेही चिंतेचा विषय बनत आहेत. सातत्याने स्क्रीनकडे पाहणं, घरात राहून शिकण्यामुळे सामाजिक संवादात घट, परीक्षेचा दबाव, पालकांची अपेक्षा, आणि स्पर्धात्मक वातावरण यामुळे अनेक विद्यार्थी नैराश्याच्या विळख्यात अडकताना दिसले. (२०२३) च्या आकडेवारीनुसार, देशात दररोज सरासरी ३० विद्यार्थी आत्महत्या करत आहेत. शिक्षण ही केवळ ज्ञानप्राप्ती नव्हे, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे मूळ उद्दिष्ट असले पाहिजे, याकडे आपण अधिक गांभीर्याने पाहायला हवे. एकीकडे खाजगी शिक्षण संस्थांचा शिरकाव वाढत असताना सरकारी शिक्षणसंस्था मात्र विश्वासाच्या संकटात सापडलेल्या दिसतात. उच्चशिक्षणाच्या क्षेत्रात तर परिस्थिती आणखी गंभीर आहे. देशभरातील अनेक विद्यापीठे आजही पायाभूत सुविधांच्या अभावाने ग्रासलेली आहेत. संशोधनाला पूरक वातावरण, प्रोत्साहन, आणि निधी यांची तूट असल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाविन्याची भावना कमी होत आहे. त्यातच 'डिग्री मिळवणे' हे शिक्षणाचे अंतिम ध्येय मानले जात असल्याने मूल्यशिक्षण, सामाजिक जाणीव, आणि उत्तरदायित्व या बाबी दुर्लक्षित होत आहेत.

शिक्षणाचा गाभा म्हणजे विचार, अनुभव, आणि सर्जनशीलता. मात्र, आजची शिक्षणपद्धती अजूनही पुस्तकाभिमुख आणि गुणांवर आधारित आहे. बहुपर्यायी चाचण्या, वस्तुनिष्ठ उत्तरं, आणि गुणांचे आकडे हे शिक्षणाचे निकष बनले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये मूल्यमापनाच्या भीतीने सर्जनशीलतेचा गळा दाटलेला आहे. च्या प्रस्तावानुसार विद्यार्थ्यांना कला, विज्ञान, वाणिज्य यामध्ये एकत्रित विषयांची निवड करता येईल, हे निश्चितच स्वागतार्ह आहे. परंतु, यासाठी शाळांची, महाविद्यालयांची आणि शिक्षकांची मानसिकता बदलणे अत्यंत आवश्यक आहे. सध्याच्या स्थितीतून बाहेर पडण्यासाठी शिक्षण क्षेत्रात ठोस पावले उचलली जावी लागतील. तंत्रज्ञान सर्वदूर पोहोचवण्याबरोबरच मानवी संबंध, संवाद, आणि संवेदना या घटकांनाही शिक्षणात स्थान दिले पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याला शिकण्याची समान संधी उपलब्ध व्हावी, शिक्षक सशक्त आणि सर्जनशील असावेत, आणि शैक्षणिक संस्था स्वतंत्र व जबाबदार असाव्यात, ही काळाची गरज आहे. शिक्षण म्हणजे बदल घडवण्याचे सामर्थ्य., हे सामर्थ्य जर योग्य प्रकारे वापरले, तर भारताचा सामाजिक व आर्थिक विकास अधिक वेगाने होऊ शकेल. जगातील अनेक राष्ट्रांनी शिक्षणाच्या माध्यमातून आपली सामाजिक आणि आर्थिक स्थिती सुधारली आहे. फिनलंड, दक्षिण कोरिया, जपान यांसारखी देश शिक्षणासाठी अधिक गुंतवणूक करून मानवसंसाधन विकसित करत आहेत. भारतालाही त्याच वाटेने जावे लागेल. शिक्षण हे खर्च नसून गुंतवणूक आहे हे शासन आणि समाजानेही समजून घ्यायला हवे. ''गांधीजींच्या नैतिक शिक्षण संकल्पनेपासून ते आजच्या ब्लेंडेड लर्निंग पद्धतीपर्यंत शिक्षणाने अनेक रूपं घेतली आहेत. आज काळाची गरज म्हणजे - + - + - यांचा समतोल साधणे.'' आजचं शिक्षण जर मूल्यांचं आणि विवेकाचं बीज पेरणारं असेल, तर उद्याचं समाज एक समतेचं आणि शाश्वततेचं फळ देणारा बनू शकेल. शिक्षण ही केवळ यंत्रणा नव्हे, तर समाज घडवण्याची चळवळ आहे आणि त्या चळवळीचा आपण सर्वांनी भाग होणं आवश्यक आहे. शेवटी एवढंच म्हणता येईल की आज आपण शिक्षणात जी बीजं रोवतोय ती उद्याच्या समाजाचं फळ देतील. ती फळं समतेची असतील की विषमतेची, ज्ञानाची असतील की अंधश्रद्धेची, शांतीची असतील की संघर्षाची हे आजच्या शिक्षणावर ठरेल. म्हणूनच आजचं शिक्षण अधिक सर्वसमावेशक, सर्जनशील आणि मूल्याधारित असावं ही काळाची गरज आहे.विचारशील, कल्पक, समजूतदार आणि संवेदनशील समाज घडवण्याचे दिशेने सध्या शिक्षणव्यवस्था वाटचाल करत आहे जुन्या चौकटी मोडून नवीन आकलन, नवीन कौशल्ये आणि नवे तंत्र आत्मसात करत आहे. या प्रवासात सर्जनशीलता ही केवळ पर्याय नसून, ती येणाऱ्या भविष्य काळाची एक गरज बनली आहे. आजच्या प्रत्येक विद्यार्थ्याला विचार करायला, प्रश्न विचारायला, आणि नव्याचा शोध घ्यायला शिकवणं हेच खऱ्या अर्थाने शिक्षण ठरेल. म्हणूनच शिक्षणाच्या या संक्रमणकाळात आपण सर्वांनीच सर्जनशीलतेच्या दिशेने, नवविचारांच्या प्रकाशात वाटचाल केली पाहिजे, तेव्हाच शिक्षणाचा खरा अर्थ साकार होईल.

# अस्तित्वाच्या मातीवर ठसा उमटवितांना...



सप्तरंग

डॉ. विनय व. दांदळे
९८२२२ ३१७६९

पानावर साचलं होतं काहीसं ओलसर, कदाचित प्रेमाचे हलकेसे कवडसे भरभर, ना ठसा उमटला, ना उमजली ती आठवण, फक्त स्पर्शाच्या साक्षीनं दरवळली साठवण... मनुष्यस्वभावाचं एक वैशिष्ट्य म्हणजे त्याला आपल्याला मिळालेलं प्रेम, आपुलकी आणि जवळीक दुसऱ्यालाही तितक्याच तीव्रतेनं वाटावी, अशी सहज, पण खोल अपेक्षा असते. आणि असायलाही हवी .... आपण कोणावर गरजेपेक्षा जास्त प्रेम करतो, मन मोकळं करतो किंवा विश्वास ठेवतो, तेव्हा हळूहळू त्या नात्याच्या पाण्यात आपली छाया उमटत जाते. सुरुवातीला ते पाणी शांत असतं, पण जसजशा भावना खोल जातात, तसतसा त्याचा तळ अधिक अस्पष्ट आणि धूसर होतो.

गरजेपेक्षा अधिक प्रेम करणं म्हणजे ओल्या मातीवर पाय ठेवणं असतं त्या क्षणी ती माती आपली वाटते, त्या उबदार ओलाव्यात आपले पाय लीन होतात, पण जसा वेळ जातो, तसा तो ठसा कोरडा पडतो आणि मागं काहीच उरत नाही, फक्त उरत ते भूतकाळाचं गूढ प्रतिबिंब.

मन मोकळं करणं म्हणजे खोल विहिरीत आरसा ठेवण्यासारखं असतं. आपण आपल्या सगळ्या भावना त्या खोलगट जागेत आरशासारख्या उमटवतो, पण त्या आरशाचं प्रतिबिंब समोरच्याला दिसेलच याची काही शाश्वती नसते. कधी कधी आपणच त्या भावनांमध्ये अडकतो आणि उत्तर न मिळालेल्या प्रश्नांचं ओझं आपल्याच खांद्यावर राहून जातं.

विश्वास ठेवणं म्हणजे हातात घेतलेली पतंग असते. आपण दोऱ्यांमध्ये आपलं आभाळ गुंफतो, स्वप्नं, स्नेह, सोबत यांची रंगीत गुंफण करतो; पण ती पतंग जर दुसऱ्याच्या मनाच्या वाऱ्याशी झुलत नसेल, तर ती आपल्याच हातात फडफडत राहते, आणि शेवटी दोर तुटतो , आणि ....



भावनांची ही एकतर्फी गुंतवणूक फक्त आपल्यालाच ज्ञात असते. समोरच्याला ती दिसतंही असेल, पण समजून घेण्याची तळमळ नसेल, तर त्या भावना गळून जातात. आणि हेच ते क्षण असतात जेव्हा एकतर्फी भावना असताना त्रास मात्र दुहेरी होतो एका बाजूला अपेक्षांचं तुटणं, आणि दुसऱ्या बाजूला स्वत्त्वाचं विस्कटणं.

गरजेपेक्षा अधिक गुंतणं म्हणजे सूर्यावर डोळे लावून त्याचं उबदारपणं समजण्याचा प्रयत्न करणे. सुरुवातीला तो प्रकाश हृदयात उबदारपणा देतो, पण लवकरच त्याची तीव्रता डोळ्यांना झणझणीत अंधाराची छायेचा अनुभव देते. तसंच, प्रेमाची अतीव अभिव्यक्ती सुरुवातीला सुंदर वाटते, पण उत्तर नसलेल्या गूढतेतून ती वेदनेच्या सावल्यांत बदलते.

नातं हे दोन मनांचं गुंफण असतं. पण जर फक्त एकच मन त्यात गुंतलेलं असेल, तर ते एखाद्या मूक नाटकात एकट्याने संवाद साधल्यासारखं असतं दुसरं पात्र केवळ पडद्यामागे उभं राहतं, कधीच प्रतिसाद देत नाही. ही असंतुलित भावना जेव्हा जाणीव होऊन जाते, तेव्हा मन अजूनच आत गुंडाळत जातं. प्रेमात प्रमाण असावं लागतं, ही गोष्ट कदाचित विचारांनी मान्य होते, पण मनाला मोजमाप करणं माहीत नसतं. ते ओसंडून वाहतं. आणि मगच, त्या वाहण्यातून स्वतःच्या रिकामेपणाची जाणीव तीव्रतेनं मनात घर करते. शेवटी हेच पटतं की हृदय उघडणं सोपं असतं, पण त्या उघड्या दारांतून प्रेमानं कोणीतरी प्रवेश करेलच, याची हमी नसते. कधी कधी ते उघडं दार ही आपलीच तडफड होतं न सांगता आलेली, न विसरता आलेली.

प्रेमाचे ओलसर कवडसे एखाद्या टाचेखालच्या कोवळ्या पानासारखे असतात ज्याचं अस्तित्व आपल्याला कळतं, पण समोरच्याला ते केवळ पाण्याच्या डागासारखं वाटतं .... सावलीसारखं प्रेम होतं, अलगद आणि नाजूक, मनाच्या दारावरून गेलं, न उमगता दूरदूर .... जगाला वाटली छाया, आपल्याला वाटलं आकाश, ओल्या पानावरची ती गोष्ट, राहिली केवळ श्वास ....

# महिला आयोगाच्या अध्यक्षा अराजकीय व कायदेतज्ज्ञच असाव्या..!



विचारमंथन

डॉ. एम.आर.इंगळे
मो. 9423429060

भारतीय समाजव्यवस्थेत हुंडा प्रथा व महिलांवर अन्याय अत्याचार करून त्यांचा छळ करण्याची कुप्रथा अस्तित्वात होती. या कुप्रथांना आळा घालण्यासाठी सरकारने १९६१ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा संमत केला. त्यानंतर महिलांच्या संरक्षणासाठी, कल्याणासाठी, त्यांना विविध क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने आपला विकास करता यावा आणि त्यांचे सक्षमीकरण होऊन सुदृढ समाजाची निर्मिती व्हावी यासाठी विविध कायदे केले. या विविध कायद्यांमुळे महिलांना शिक्षणाची संधी तर मिळालीच पण त्यांना सर्वच क्षेत्रात प्रगतीही करता आली.

आज महिलांनी प्रत्येक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली. मात्र पुरुषप्रधान संस्कृतीत त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार व कुटुंबात होणारा छळ थांबला नाही. त्यामुळे वाढत्या कौटुंबिक हिंसाचाराला पायबंद घालण्यासाठी सरकारने २००५ मध्ये कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा तयार केला.

महिला आयोगाची स्थापना : महिलांना संरक्षण देणाऱ्या कायद्यासोबतच त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी व त्यांना संरक्षण देण्यासाठी १९९० साली राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम तयार केला. या अधिनियमा अंतर्गत ३१ जानेवारी, १९९२ रोजी राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग : महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीबा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या विचारांचे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने देखील राज्यात २५ जानेवारी, १९९३ रोजी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना केली.

आयोगाची रचना : या आयोगात एक अध्यक्ष, सहा अशासकीय सदस्य; एक सदस्य-सचिव आणि एक पोलीस महासंचालक हे पदसिद्ध सदस्य असतात. तद्वतच सरकारने आयोगासाठी एकोणचाळीस कर्मचारी संख्या मंजूर केली आहे.

आयोगाचे अधिकार : महिलांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी, कुटुंब आणि समुदायात होणाऱ्या कोणत्याही प्रकारचा छळ आणि समस्यांपासून महिलांचे संरक्षण आणि समानता सुनिश्चित करण्यासाठी या आयोगाकडे अधिकार आहेत.

महिला आयोगाची कार्ये : १) भारतीय संविधान आणि महिलांशी संबंधित कायद्यांनुसार महिलांसाठी हमी दिलेल्या तरतुदी आणि संरक्षणाचे पालन होते किंवा नाही याची खात्री करणे.

२) राज्यातील कोणतीही एजन्सी महिलांविरुद्ध संरक्षणात्मक उपाययोजना राबविण्यात अपयशी ठरले तर ते सरकारच्या निदर्शनास आणून देणे.

३) महिलांच्या हक्कांच्या उल्लंघनाची कोणतीही समस्या संबंधित अधिकाऱ्यांकडे घेऊन जाणे आणि त्यांना पुढील कारवाईची शिफारस करणे.

४) अत्याचार आणि भेदभावाला बळी पडलेल्या महिलांचे समुपदेशन आणि मदत करणे.

५) महिलांच्या मोठ्या गटाशी संबंधित कोणत्याही मुद्द्यांसाठी खटल्याच्या खर्चासाठी वित्तपुरवठा करणे आणि त्यासंबंधित राज्य सरकारला अहवाल देणे.

६) महिला कैद्यांना ठेवण्यात आलेल्या कोणत्याही परिसराची, तुरुंगाची किंवा इतर रिमांडहोमची तपासणी करणे. काही त्रुटी आढळल्यास त्या संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देणे.

७) महिलांशी संबंधित कोणत्याही विशिष्ट समस्यांची चौकशी, अभ्यास आणि तपास करणे इत्यादी.

महिला आयोगाच्या अध्यक्षा अराजकीय व कायदेतज्ज्ञच का असावा...? महिला आयोगाचे अधिकार, जबाबदारी आणि कार्ये विचारात घेतली तर या आयोगावर उच्चशिक्षित, समाजकार्याची मनापासून आवड, कायद्याचे ज्ञान, स्त्रियांच्या समस्यांची जाण आणि सामाजिक भान असणाऱ्या तसेच सामाजिक व विधीक्षेत्रात नावलौकिक असलेल्या सक्षम व्यक्तीचीच निवड होणे गरजेचे आहे. मात्र या आयोगावर राजकीय व्यक्तीची अध्यक्ष म्हणून निवड केली जाते ही अत्यंत खेदाची बाब आहे.

राज्य महिला आयोगावर अध्यक्षासह नऊ महिलांची नियुक्ती करण्यात येते. त्यामुळे त्यात अध्यक्ष हा अराजकीय व कायदेतज्ज्ञ असावा. इतर सदस्य सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, विधी क्षेत्रात आणि महिला चळवळीत सक्रिय असलेल्या ख्यातीप्राप्त व्यक्तींची निवड करण्यात यावी. ही निवड करतांना त्यात अजिबात राजकारण न करता पारदर्शक पद्धतीने निवड व्हावी हीच अपेक्षा.

महिला आयोगाला सक्षम करण्यासाठी प्रभावी उपाय : १) अधिकार वाढवणे: आयोगाला अधिक प्रभावीपणे काम करण्यासाठी, कायद्यांतर्गत अधिक अधिकार देणे आवश्यक आहे. उदा., चौकशी अधिकार वाढवणे, कायद्यांचे उल्लंघन झाल्यास कारवाई करणे, आणि महिलांच्या समस्यांवर अधिक प्रभावी उपाययोजना करणे.

२) अधिक निधी : महिला आयोगाला अधिक निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ज्यामुळे ते आवश्यक असलेले मनुष्यबळ आणि तंत्रज्ञान उपलब्ध करून अधिक प्रभावीपणे काम करू शकतील.

३) पारदर्शकता वाढवणे : आयोगाच्या कामकाजात पारदर्शकता वाढवणे आवश्यक आहे. यामुळे लोकांचा आयोगावर विश्वास वाढेल, आणि ते अधिक सहजपणे तक्रारी नोंदवू शकतील.

४) तक्रार निवारण प्रक्रियेत सुधारणा : तक्रार निवारण प्रक्रिया अधिक सोपी आणि जलद करणे आवश्यक आहे. यासाठी, एक ऑनलाइन तक्रार निवारण प्रणाली तयार करणे आणि तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक समर्पित टीम तयार करणे आवश्यक आहे.

५) जागरूकता मोहीम : महिलांच्या हक्कांविषयी जागरूकता वाढवण्यासाठी विविध मोहीम राबवणे आवश्यक आहे. यामुळे, महिलांना त्यांच्या हक्कांविषयी माहिती मिळेल आणि त्यांना न्याय मिळवण्यासाठी मदत होईल.

६) महिला आयोगाच्या सदस्यांची क्षमता वाढवणे : महिला आयोगाच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्यात यावे जेणेकरून त्या महिलांच्या समस्या अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊन अधिक प्रभावीपणे उपाययोजना करू शकतील.

७) राजकीय हस्तक्षेप कमी करणे : महिला आयोगाच्या कामकाजात राजकीय हस्तक्षेप नसावा. त्यामुळे आयोग अधिक स्वतंत्रपणे काम करू शकेल आणि महिलांच्या समस्यांवर अधिक प्रभावी उपाययोजना करू शकेल.

८) तंत्रज्ञानाचा वापर : महिला आयोगाच्या कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर वाढवावा म्हणजे ते अधिक प्रभावीपणे काम करतील आणि त्यांची कार्यक्षमता वाढेल.

९) अन्य सरकारी यंत्रणांशी समन्वय : महिला आयोगाने इतर सरकारी यंत्रणांशी समन्वय साधून काम करावे, त्यामुळे महिलांच्या समस्यांवर अधिक प्रभावी उपाययोजना करता येईल.

१०) महिला संघटनांशी समन्वय : महिला आयोगाचे कार्य अधिक कार्यक्षम होण्यासाठी विविध क्षेत्रात कार्यरत महिला संघटना किंवा महिलांच्या चळवळींसोबत समन्वय ठेवावा.

११) जिल्हावार समित्या स्थापन करणे : जिल्ह्यातील महिलांच्या समस्या व त्या सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी जिल्हावार समित्या स्थापन कराव्या.

१२) महिलांचे मेळावे : महिलांचे मेळावे व परिषदा भरवून त्यात महिलांना मार्गदर्शन व प्रबोधन करावे.

अशा उपाययोजनांमधून, महिला आयोगाचे कार्य अधिक कार्यक्षम आणि प्रभावी होईल, ज्यामुळे महिलांच्या समस्यांवर प्रभावी उपाययोजना करता येतील आणि त्यांना न्याय मिळू शकेल.

# फिलिपिन्समधील कृषी क्रांती



पर्यटन

नितीन देशमुख
मो. 9834280264

मी विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील वटफळी येथील एक सामान्य शेतकरी. शेती आणि शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान हा माझ्या अभ्यासाचा आणि आवडीचा विषय. विशेषतः १९९० च्या दशकात उदयास आलेल्या जी.एम. (जेनेटिकली मॉडिफाइड) तंत्रज्ञानाचा मी अभ्यास करत आहे. याच अभ्यासाच्या निमित्ताने, 'मोन्सँटो' कंपनीच्या वतीने आयोजित केलेल्या कृषी अभ्यास दौऱ्यासाठी माझी निवड झाली आणि मला फिलिपिन्स या देशात जाण्याची संधी मिळाली. भारतातून निवडलेल्या केवळ दोन शेतकऱ्यांमध्ये माझा समावेश होता. ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब होती. हा दौरा माझ्यासाठी केवळ एक परदेशवारी नव्हती, तर कृषी क्षेत्रातील एका भविष्याचा वेध घेणारा अनुभव होता.

फिलिपिन्सची राजधानी मनिला येथे आमचा दहा दिवसांचा मुक्काम होता. या काळात तिथे आठ देशांची एक परिषद (समिट) आयोजित करण्यात आली होती, ज्यात चीन, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान, न्यूझीलंड आणि भारत यांसारख्या देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. फिलिपिन्स हा देश दिसायला अत्यंत सुंदर असला, तरी भौगोलिक आणि नैसर्गिकदृष्ट्या तो खूपच गुंतागुंतीचा आहे. सुमारे ४८० लहान-मोठ्या बेटांवर वसलेला हा देश अनेक नैसर्गिक आव्हानांना तोंड देत असतो. तिथे पोहोचल्यावर मला एक गोष्ट पाहून खूप आश्चर्य वाटले. त्या देशात पेट्रोलचे दर अवघे ३० रुपये प्रतिलिटर असूनही तेथील नागरिक मोठ्या प्रमाणावर सायकलचा वापर करतात. हे पाहून मला आपल्या देशाची आठवण झाली, जिथे पेट्रोलचे दर शंभर रुपयांवर पोहोचलेले असतानाही आपण वाहनांचा वापर कमी करत नाही. याउलट, फिलिपिन्सच्या लोकांची ही काटकसर आणि साधनसंपत्तीचा जपून वापर करण्याची वृत्ती अत्यंत कौतुकास्पद आणि प्रेरणादायी होती. बिकट परिस्थितीतून मार्ग काढताना प्रत्येक गोष्टीचे महत्त्व जाणण्याची त्यांची वृत्ती त्यांच्या प्रगतीचे गमक असावे, असे मला वाटून गेले.

**तांदळाचे जागतिक संशोधन केंद्र आणि 'सीड बँक'चे महत्त्व**

फिलिपिन्स हा देश 'धान' म्हणजेच तांदळाच्या उत्पादनासाठी आणि संशोधनासाठी जगप्रसिद्ध आहे. जगातील सर्वांत मोठे आंतरराष्ट्रीय तांदूळ संशोधन केंद्र येथेच आहे. या संशोधन केंद्राला भेट देण्याचा अनुभव अविस्मरणीय होता. तिथे तांदळाच्या तब्बल चाळीस हजार जाती जतन करून ठेवल्या आहेत. यापैकी भारतातील पंधरा ते सोळा हजार जुन्या जाती त्यांनी मला दाखवल्या. हे पाहून मला नवल वाटले. आपल्याकडे अनेकदा 'जुनी बियाणी संपली' किंवा 'देशी वाण नष्ट झाले' अशी चर्चा होते, पण वस्तुस्थिती वेगळी आहे. प्रत्येक देशात 'सीड बँक' (बियाणे पेढी) असते, जिथे बियाण्यांचा शोध लागल्यापासूनच्या सर्व जाती आणि वाण शास्त्रीय पद्धतीने संग्रहित केलेले असतात. फिलिपिन्समधील या केंद्राने केवळ जुने वाण जपले नाहीत, तर विज्ञानाच्या आणि नियमांच्या आधारे नवनवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करून प्रगतीचा मार्गही चोखाळला आहे. जी.एम. तंत्रज्ञान: कृषी क्रांतीचा पाया फिलिपिन्स हा जगातील अशा काही पहिल्या देशांपैकी एक आहे, ज्यांनी जैविक तंत्रज्ञानाला महत्त्व देऊन कृषी क्षेत्रात त्याचा प्रभावीपणे वापर सुरू केला. त्यांनी १९९० च्या दशकातच जी.एम. तंत्रज्ञानाच्या आधारावर आपल्या कृषी विकासाचा प्रवास सुरू केला आणि आज त्या देशात झालेली कृषी क्रांती पाहण्यासारखी आहे. त्यांच्या यशस्वी प्रयोगांमुळेआज तिथे सोयाबीनचे सरासरी उत्पादन हेक्टरी २५ क्विंटल, मक्याचे ४०क्विंटल आणि तांदळाचे ३० क्विंटलपर्यंत पोहोचले आहेत. या तंत्रज्ञानामुळे ज्या गोष्टी शेतकऱ्यांचे नुकसान करायच्या, त्याच गोष्टींचा त्यांनी मोठ्या हुशारीने फायद्यासाठी उपयोग करून घेतला. उदाहरणार्थ, मक्याच्या पिकावर येणारी बुरशी (फंगस) आणि किडींचा प्रादुर्भाव (डंख) ही जगभरातील एक मोठी समस्या आहे. ज्या मक्यावर बुरशी किंवा डंख नाही, त्यालाच आंतरराष्ट्रीय बाजारात चांगला भाव मिळतो. फिलिपिन्समधील शेतकऱ्यांनी जी.एम. तंत्रज्ञानाने विकसित केलेला कीड-प्रतिरोधक आणि बुरशी-प्रतिरोधक मका वापरल्यामुळे, त्यांचा मका आज जगातल्या उत्कृष्ट मक्यांपैकी एक गणला जातो.

**'गोल्डन राइस': कुपोषणावर मात करणारा एक यशस्वी प्रयोग**

जैविक तंत्रज्ञानाचा सर्वांत प्रभावशाली वापर त्यांनी तांदळामध्ये केला. जगभरातील कुपोषणाचे एक प्रमुख कारण म्हणजे तांदळात 'आयर्न'ची (लोह) असणारी कमतरता. ही समस्या ओळखून, फिलिपिन्समधील संशोधकांनी जैविक तंत्रज्ञानाचा वापर करून मक्यामधील 'आयर्न'चे जनुक तांदळात यशस्वीरीत्या स्थापित केले. इतकेच नाही, तर या प्रक्रियेत तांदळाने मक्याचा पिवळा रंगही स्वीकारला, ज्यामुळे या नवीन वाणाला 'गोल्डन राइस' असे नाव देण्यात आले. या एका संशोधनामुळे जगभरातील कुपोषण संपवण्यासाठी मोठी मदत झाली. आज या 'गोल्डन राइस'ची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत सुमारे चारशे रुपये प्रतिकिलो आहे. भारतातील विरोध आणि जगातील स्वीकार एकीकडे फिलिपिन्स आणि जगातील अनेक प्रगत राष्ट्रे जी.एम. तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी विकास साधत असताना, आपल्या भारतात मात्र या तंत्रज्ञानाला मोठ्या प्रमाणावर विरोध केला जातो. पण वस्तुस्थिती अशी आहे की, आपण परदेशातून आयात करत असलेले तेल आणि सोयाबीन हे अनेकदा जी.एम. तंत्रज्ञानाने बनवलेलेच असते. इतकेच काय, तर आपली कोरोनाची लस आणि मधुमेहाच्या रुग्णांना दिले जाणारे इन्शुलिन हे सुद्धा जैविक तंत्रज्ञानातूनच तयार केले जाते. मग जर एखादे तंत्रज्ञान मानवाच्या प्रगतीसाठी आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी उपयुक्त ठरत असेल, तर त्याचा स्वीकार करायला आपण मागे का राहावे? मला वाटते की, भारतीय शेतकऱ्यांच्या हितासाठी जी.एम. तंत्रज्ञान भारतातही आले पाहिजे.



**फिलिपिन्समधील विकासाचे प्रेरक मॉडेल**

या दौऱ्यात दोन-तीन गोष्टींचा माझ्यावर खोलवर परिणाम झाला. फिलिपिन्समध्ये वार्षिक सरासरी पर्जन्यमान चौदाशे मिलिमीटर असूनही, तिथले शेतकरी अत्यंत चांगल्या पद्धतीने शेती करतात. पण याहीपेक्षा मोठा चमत्कार म्हणजे तिथे मी एक नवीन आणि अत्यंत प्रभावी शेती मॉडेल पाहिले, जिथे शेतकरी स्वतः शेती करत नाही, तर कंपन्या शेती करतात. शेतजमीन शेतकऱ्यांच्या मालकीची राहते, पण पेरणीपासून ते काढणीपर्यंतची सर्व प्रक्रिया कंपन्या व्यावसायिक पद्धतीने करतात. या 'कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग' मॉडेलमुळे शेतकऱ्यांचा लागवडीचा खर्च तब्बल ३०टक्के कमी झाला आहे आणि बाजारातील नफ्यातही त्यांना तेवढाच अधिक वाटा मिळतो. याशिवाय, त्यांनी खेड्यापाड्यांतील डोंगरांवर सौर ऊर्जा युनिट्स उभारले आहेत. यातून निर्माण होणारी वीज शहरांना विकली जाते आणि त्यातून मिळणारा पैसा ग्रामीण भागातील प्रत्येक शेतकऱ्याला दिला जातो.

या सर्वांचा परिणाम असा झाला आहे की, आज फिलिपिन्समधील खेड्यांमध्ये २०-२५ पेक्षा जास्त लोक राहत नाहीत. बहुतेक तरुण पिढी शहरात जाऊन आनंदाने आणि समृद्धीने जीवन जगत आहे आणि गावांमध्ये साठ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आपल्या बंगल्यांमध्ये समाधानाने राहत आहेत. विकासाचे आणि कृषी प्रगतीचे हे चित्र मी स्वतः माझ्या डोळ्यांनी पाहिले.

**निष्कर्ष: भारताने काय शिकावे?**

: फिलिपिन्ससारख्या एका छोट्या आणि अनेक आव्हाने असलेल्या देशाने जर तंत्रज्ञानाच्या जोरावर एवढी प्रगती केली असेल, तर आपल्याजवळ सर्व प्रकारची साधनसंपत्ती आणि मनुष्यबळ असूनही आपला देश कृषी क्षेत्रात मागे का आहे? मला वाटते की, यामागे आपल्या देशातील नेत्यांची दूरदृष्टीची कमतरता आणि काहीही नवीन करण्याची इच्छाशक्ती नसणे, ही प्रमुख कारणे आहेत. आता वेळ आली आहे की, भारतातील शेतकरी, नेते आणि धोरणकर्त्यांनी तंत्रज्ञानाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे आणि फिलिपिन्सरख्या देशांकडून प्रेरणा घेऊन आपल्या कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवले पाहिजेत.

## लोकरंजन

# 'मैने प्यार किया फिरसे' चित्रपटाचा भव्यदिव्य मुहूर्त संपन्न

दोन दशकापूर्वी सलमान खान भाग्यश्री यांच्या मैने प्यार किया या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घातला होता. आता अनेक वर्षानंतर याच शीर्षकाचा परंतु वेगळ्या कलाकारांच्या संचात नवा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पर्ल ग्रुप ऑफ कंपनी आणि सिनेबस्टर मॅगझीन या कंपनीचे मालक रॉनी रॉड्रिक्स यांनी आता चित्रपट निर्मिती क्षेत्रात पाऊल टाकले असून त्यांच्या पहिल्या वाहिल्या सिनेमाचा मैने प्यार फिरसे किया चा भव्यदिव्य मुहूर्त नुकताच मुंबईत एका शानदार सोहळ्यात संपन्न झाला. चित्रपटाच्या या मुहूर्ताला जेष्ठ अभिनेते धर्मेंद्र आवर्जून उपस्थित होते. तर अरबाज खान,विद्या माळवदे, राजपाल यादव या कलाकारासोबतच चित्रपटाचे संगीतकार दिलीप सेन आणि गायक उदित नारायण आणि नृत्य दिगदर्शक गणेश आचार्य देखील उपस्थित होते. याच सोहळ्यात रॉनी यांच्या जुळ्या मुलांचा चार्ल्स आणि काढेन यांचा वाढदिवस देखील मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. निर्माता रॉनी रॉड्रिक्स यांनी त्यांचा मुलगा काढेन यांच्यासह फॅटमार करून चित्रपटाचा मुहूर्त केला.

## मॅच फिक्सिंग






लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

ह्या क्रिकेटच्या खेळात
फिक्सिंग खरोखर होते
उलाढाल कोटी रुपयात
पहा सहजच ती असते

विधानसभा निवडणुकीत
राजकीय पक्षांनी केली
काँग्रेस म्हणते महाराष्ट्रात
हीच मॅच फिक्सिंग झाली
त्या गांधींनी लिहिला लेख
फडणविसांनी दिले उत्तर
आयोगाने दिलाय आलेख
का त्यामुळे सर्वच निरुत्तर?

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर ८०५५२१३२८१



दाखविण्यासाठी
नका करू कर्म ।
खोटा आहे धर्म
ऐसा मित्रा ॥

लावलेले बीज
खारु विसरते
तसे विसरावे
तूही मित्रा ॥

जगा दाखवून
जो कर्म करतो ।
हो धर्म बुडतो
त्याचा मित्रा ॥

कर्म करायचे
न ते दाखवावे ।
आणि विसरावे
फळास हो ॥

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 68




### हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दव योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः—**

**दोन अक्षरी**

- अंत
- काका
- कारा
- खत
- गीता
- तन
- तव
- ताल
- थर
- दल
- नेम
- पत
- पंत
- मग
- मुख
- सक्ती
- सान
- सुरा

**तीन अक्षरी**

- अकरा
- अंगुर
- अवज्ञा
- कामसु
- खलिता
- गजरा
- तारीख
- तालीम
- दालन
- पंचक
- पोटगी
- प्रकाश
- प्रसाद
- माखण
- मुंडन
- रतीब
- रसिक
- वखर
- वामन
- वेतन
- विराट
- सतार
- सितारा
- सुग्रीव
- सुमन
- सुरभी

**चार अक्षरी**

- अनुराधा
- चवदार
- जनमत
- दशरथ
- तारामती
- नवनीत
- नित्यनेम
- पंचनामा
- पडसाद
- पाणपोई
- पानदान
- पादचारी
- प्रवचन
- महाराजा
- रातराणी
- सत्यवान
- पंतप्रधान
- पारितोषिक
- भीष्मप्रतिज्ञा
- शरणागत

**पाच अक्षरी**

- करारनामा
- तो मी नव्हेच
- नारदमुनी

**सहा अक्षरी**

- प्रतिकार शक्ती
- वरातीमागून

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 448



**—: आडवे संकेत :—**

1) पूर्वीच्या काळी विधवा स्त्रीबद्दल पत्रात लिहावयाचा आदरार्थी मायना
5) संकुचित स्थळी वाढलेला, विहिरीतील बेडूक
8) मिठाई करून विकणारा
11) वर्तुळाकार
12) अंबाडीसारखे एक झाड किंवा त्याचा वाख
13) आरोप, लांछन 14) रिकामा
15) माय, जननी, माता
16) आशा, अपेक्षा, इच्छा
17) तुरुंगवास
19) पाणी, जल
20) पोळी भाजण्याचे पसरट पात्र
21) अतिशय शुद्ध व उत्तम बावन्नवेळा शुद्ध केलेले सोने
22) स्वर्गलोकीचा एक देवर्षी
24) सूर्यास्त होण्याच्या सुमाराचा मुहूर्त
26) पति, स्वामी
27)उष्णतेमुळे अंगातून निघणारे पाणी
28) एक लहान चर्मवाद्य
30) समुदाय, जमाव
31) हे नऊ नाथ नवनारायणाचे अवतार समजले जातात
33) सौभाग्यवतीचे संक्षिप्त उच्चारण
34) जनावरांचा जमाव
35) कडे, वर्तुळ
37) दगा, समान संख्यांचा गुणाकार
38) ओझे, वजन
39) लाजाळू
40) साप मुंगुसाचे खेळ दाखविणारा
41) देहावसान
43) गिरणीवर पीठ करायला नेलेले गहू, डाळ इत्यादी
44) अंगावरील कोमल केस
46) मनाशी केलेला कठोर निश्चय
49) व्यवस्था करणारा, प्रत्यक्ष कृती करणारा
50) धन्यवाद, कृतज्ञता
51) बंदुकीच्या गोळ्या किंवा तलवारीच्या वारापासून संरक्षण व्हावे म्हणून घातलेला लोखंडी अंगरखा
53) गर्विष्ठ, बाणेदार,
55) नदीचा तीर, काठ
56) समाजात प्रतिष्ठा असलेली व्यक्ती
57) बंधन सुटलेला, स्वैर, मोकळा
58) पांडवांद्वारा अभयदानप्राप्त एक दानव
59) नाटकाच्या आरंभी सूत्रधार आणि एखादे पात्र यांचे संभाषण
60) प्रेम, जिव्हाळा 61) विस्तव
62) हिमालयात आढळणारा एक केसाळ प्राणी
63) पौराणिक काळातील मदनाची प्रेयसी
64) रंगमंचावर सादर होणारे कथानक
65) कृतज्ञ, ऋणी असणे
66) धैर्य, हिंमत
67) सजावट, शोभिवंत रचना
68) इच्छित कार्य सिद्धीस गेल्यास देवाला काहीतरी अर्पण करण्याचा निश्चय
69) शहराच्या आरंभी असलेली चौकी
71) एक ऋतू 72) प्रत्येक
73) सुक्या मेव्यातील एक फळ
74) कावळ्यांचा आवाज
75) भारताचे नागरिकत्व स्वीकारलेला
76) शुभ कार्याचा आरंभ
77) फूल उमलण्याअगोदरची स्थिती

**—: उभे संकेत :—**

1) गंगेचे उगमस्थान
2) कपोल
3) आचार्य विनोबा भावेंनी लिहिलेली श्रीमद् भगवत्गीतेवरील टीका
4) ताठा, गुर्मी
5) वंश, घराणे, पक्षकार
6) रामायणात कैकयीचे कान भरणारी दासी
7) देवळाचा शिरोभाग, अतिरेक, पराकाष्ठा
8) हिमालयाच्या कुशीत असलेले एक प्रसिद्ध पवित्र तीर्थक्षेत्र
9) वेल, वल्ली
10) येशु ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा दिवस, गुड फ्रायडेनंतरचा पहिला रविवार
13) बैठक, बसण्याची वस्तू
15) स्वर, नाद
16) पुनः पुनः म्हणणे, आवृत्ती करणे
17) मराठी रंगभूमी व चित्रपटात अभिनय करणारा एक जुना नावाजलेला अभिनेता
18) डावा
20) गोणपाट, पोत्याचा तुकडा
21) भुजा
22) लहान बालकाचे नाव ठेवणे
23) जुलूम, अन्यायाने एखादी चळवळ दाबून टाकणे
24)..... अन् पोटात पाय या म्हणीतील जीव कोणता ?
25) कर्जाची मूळ रक्कम
29) रडणे, शोक
32) शिजवून पातळ केलेली डाळ
35) घरातील मोठी व्यक्ती
36) मृत्यूदेवता
38) कपाळ, ललाट
42) राखण, राखड
45) जन्मापासून आजवर घालविलेली एकंदर वर्षे
46) शक्यता, संभव
47) पडणे, पान
48) मोठा जोराचा आवाज
49) श्रीगणेशाचे एक नाव
50) गायनातील एक राग
51) चिकित्सा करणारा, परीक्षा करणारा
52) शेतजमिनीत घातलेले पौष्टिक द्रव्य
54) व्यवस्थित राहणारा, यथायोग्य, शोभेसा
55) जादू
57) ज्वारीची कणसे बडविण्याचे लाकडी अवजार
59) एखाद्या व्यक्तिने दिलेला अनुकूल उद्गार
60) रस्त्याने जाणारा, पांथस्थ
61) सादृश्य, भ्रम, प्रतिबिंब
63) बारीक झणझण
64) मोर्च्यातील घोषणा
65) पसंत पडणे
66) अरबीमध्ये दहा हा आकडा
67) देवांस स्तुती स्तोत्र म्हणत दिव्यांनी ओवाळणे
69) कोमल, सुकुमार
70) वडिलांचा भाऊ
72) मूल्य, किंमत (उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** धार्मिक भावनांमुळे तुम्ही एखाद्या तीर्थस्थळाला भेट देऊ शकता. आणि तुम्हाला एखाद्या संताकडून काही दैवी ज्ञान मिळेल.

**वृषभ:** आज तुम्ही नवीन कल्पनांनी परिपूर्ण असाल आणि तुम्ही निवडलेली कामे तुम्हाला अपेक्षेपेक्षा जास्त फायदे देतील.

**मिथून :** जर तुम्ही तुमच्या घरगुती जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष केले तर तुमच्यासोबत राहणारे काही लोक रागावू शकतात.

**कर्क :** खर्च वाढेल, परंतु त्याच वेळी उत्पन्नात वाढ त्याला संतुलित करेल. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्यांनी मन शांत ठेवण्याची गरज आहे.तुमचे प्रयत्न निश्चितच सकारात्मक परिणाम देतील.

**सिंह :** आर्थिक सुधारणांमुळे, तुमच्यासाठी आवश्यक वस्तू खरेदी करणे सोपे होईल. नातेवाईक/मित्र एका छान संध्याकाळसाठी घरी येऊ शकतात.

**कन्या :** कुटुंबाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तुम्हाला काहीतरी करावे लागेल. तुम्हाला काही चांगली बातमी मिळू शकते, ज्यामुळे तुम्हालाच नाही तर तुमचे कुटुंबही आनंदी

**तुळ :** रिअल इस्टेटशी संबंधित गुंतवणूक तुम्हाला चांगला नफा देईल. मुले घरातील कामे पूर्ण करण्यास मदत करतील.

**वृश्चिक :** कोणतेही पाऊल उचलण्यापूर्वी, तज्ञांचा सल्ला घ्या. तरुणांना शालेय प्रकल्पाबाबत काही सल्ला घ्यावा लागू शकतो.

**धनु :** आज तुम्हाला महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील, ज्यामुळे तुम्हाला ताण आणि चिंता सहन करावी लागू शकते. तुम्हाला थकवा आणि गोंधळ जाणवेल.

**मकर :** रिअल इस्टेटमध्ये अतिरिक्त पैसे गुंतवले जाऊ शकतात. तुमचा काही वेळ इतरांना देण्यासाठी हा चांगला दिवस आहे. या सुंदर दिवशी, प्रेम-नात्यातील तुमच्या सर्व तक्रारी नाहीशा होतील.

**कुंभ :** तुमच्या आरोग्याची काळजी घ्या, अन्यथा तुम्हाला त्रास सहन करावा लागू शकतो. आज तुमच्याकडे येणाऱ्या नवीन गुंतवणूक संधींचा विचार करा.

**मीन :** तुमचा दानशूर स्वभाव वेशात वरदान ठरेल. गुंतवणुकीचा विचार करता, स्वतंत्र रहा आणि स्वतःचे निर्णय घ्या.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### बसस्थानक चोरीतील आरोपी रेल्वे पोलिसांच्या ताब्यात

**पांढरकवडा:** पांढरकवडा बसस्थानकातून गर्दीचा फायदा घेत आरती विशाल भागनागरकर या महिलेच्या बॅगेतून १०६ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरणाऱ्या नऊ जणांच्या टोळीला आता नागपूर लोहमार्ग पोलिसांनी विविध गुन्ह्यांच्या तपासासाठी ताब्यात घेतले आहे. या आंतरजिल्हा टोळीकडून रेल्वे हद्दीतील अनेक गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.पांढरकवडा पोलिसांनी ९ मे रोजीच्या या चोरीप्रकरणी ९ जणांना अटक करून त्यांच्याकडून ९.७५ लाखांचे दागिने व ४.५० लाखांची कार जप्त केली होती. अटक केलेल्या आरोपींमध्ये चालक आशिष गणेशराव वानखेडे, साहिल भेदन पुरवले, महिला टोळीतील सत्यफुला भेदन पुरवले, रोशनी लखन शेंडे, कमलाबाई रमेश राखडे, भुली नाजिम शाह, मिलन सिकंदर शाह, चोरीचे सोने विकणारा करण भेदन पुरवले व खरेदीदार सोनार राकेश गंगाप्रसाद गुप्ता यांचा समावेश आहे. या आरोपींनी रेल्वे प्रवासातही अशाच प्रकारे अनेक चोऱ्या केल्याचा संशय असल्याने, लोहमार्ग पोलिसांनी या सर्वांना तपासासाठी ताब्यात घेतले. आता त्यांची कसून चौकशी सुरू आहे.

### वेळापत्रक नसताना शिक्षकांच्या बदलीचे पोर्टल सुरू; शिक्षकांमध्ये संभ्रमाचे वातावरण

**अकोला :** जिल्हा परिषद शाळांमधील प्राथमिक शिक्षकांच्या बदली प्रक्रियेसाठी ग्रामविकास विभागाने अद्याप कोणतेही अधिकृत वेळापत्रक जाहीर केले नसतांना शिक्षकांच्या बदल्यांचे पोर्टल सुरू करण्यात आल्याने शिक्षकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांच्या बदली प्रक्रियेसाठी ग्रामविकास विभागाने अधिकृत वेळापत्रक, मार्गदर्शन सुचना जाहीर केले नाही. विशेष म्हणजे या बदली प्रक्रियेसंदर्भात जिल्हा परिषदेने कोणत्याही स्पष्ट सूचना दिल्या नसुन शिक्षकांच्या बदलीसाठी रिक्तत पदांची यादी देखील जाहीर करण्यात आली नाही. मात्र, बदलीचे पोर्टल सुरू करण्यात आल्याने शिक्षकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. सद्यस्थितीत संवर्ग एक व दोनच्या कर्मचाऱ्यांना बदलीसाठी होकार किंवा नकार कळविण्यासाठी ७ ते ९ जून पर्यंत मुदत दिली आहे. त्यानंतर १० ते १२ जून दरम्यान पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी व आरोग्य अधिकारी यांची त्रीसदस्य समिती स्थापन करून कागदपत्रांची पडताळणी करण्यात येणार आहे.

### समृद्धी महामार्गावर भीषण अपघात : अकोल्याचे योगेश वाटुरकर यांच्यासह दोघांचा मृत्यू



**अकोला :** खदान, अकोला येथील प्रतिष्ठित आणि मनमिळावू स्वभावाचे योगेश चंद्रशेखर वाटुरकर (५२) यांचा समृद्धी महामार्गावर औरंगाबादजवळ झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. ही दुर्घटना १० जून रोजी सकाळच्या सुमारास घडली.मुंबईहून फोर व्हीलरने अकोल्याकडे परतत असताना औरंगाबादजवळ समृद्धी महामार्गावर त्यांच्या कारने समोर उभ्या असलेल्या दुसऱ्या कारला जोरदार धडक दिली. या अपघातात योगेश वाटुरकर यांचा जागीच मृत्यू झाला, तर समोरच्या कारचा चालकही ठार झाला आहे. याशिवाय अपघातात आणखी एक प्रवासी गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.योगेश वाटुरकर यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा आप्त परिवार असून त्यांच्या अकाली निधनाने अकोला शहरात शोककळा पसरली आहे.

### देशातील पहिली मुस्लिम आय.ए.एस अदिबा अनम यांचा १५ जूनला अकोल्यात जाहीर सत्कार



**अकोला:**शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी व विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासाकरिता कार्यरत बेरार तालीम कारवा व अन्य स्वयंसेवी संस्थांच्या वतीने देशातील पहिली मुस्लिम आयएएस अदिबा अनम अशाक अहमद यांचा जाहीर सत्कार १५ जून २०२५ रोजी अकोल्यात सकाळी ११ वाजता प्रमिलाताई ओक हॉलमध्ये आयोजित करण्यात आला असल्याची माहिती आज पत्रकार परिषदेत देण्यात आली. आमदार अमोल मिटकरी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सत्कार समारंभास आय.ए.एस महाबीजचे मॅनेजींग डायरेक्टर योगेश कुंभेजकर , बेरार तालीम कारवाचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री खान मोहंमद अजहर हुसेन, आमदार साजिद खान पठाण हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत, मुस्लिम समाजातील पहिली आयएएस अदिबा अनमने अत्यंत कठीण परिस्थितीत शिक्षण घेवून आय.ए.एस केले आहे. अत्यंत गरीबीच्या परिस्थितीत चिकाटीने शिक्षण घेवून आय.ए.एस. झालेली अदिबा अनम ही आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांसाठी आयकॉन ठरली आहे. तीच्यापासून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने आय.ए.एस. अदिबा अनम यांचा १५ जूनला अकोल्यात सकाळी ११ वाजता प्रमिलाताई ओक हॉलमध्ये जाहीर सत्कार करण्यात येणार असून सर्व विद्यार्थी, पालकांनी, नागरीकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन बेरार तालीमी कारवांचे अध्यक्ष व आयोजन समितीचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री अजहर हुसेन आणि सर्व पदाधिकारी य आयोजन समितीने केले आहे.

# ‘मुख्यमंत्री साहेब, शेतकऱ्यांचा सातबारा कधी कोरा होणार?’

## निवडणुकीच्या वचनाचे काय झाले?

। विठ्ठल महल्ले ।



**अकोला, दि. १० :**‘‘कोरा करु, कोरा करु, कोरा करु!‘‘ या शब्दांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचार सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेलं आश्वासन अजूनही शेतकऱ्यांच्या मनात घर करून आहे. अकोल्यातील माजी प्रचारसभेत मुर्तीजापूर मतदारसंघात भाजपचे उमेदवार हरीश पिंपळे यांच्या प्रचारार्थ बोलताना फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं होतं की, ‘‘सत्तेत आलो, तर शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू!‘‘ मात्र, या घोषणेला आजपर्यंत प्रत्यक्ष अंमलबजावणीचं स्वरूप आलेलं नाही.

राज्यातील शेतकऱ्यांची एकूण संख्या सुमारे १.५ कोटी असून त्यापैकी ८५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी पीककर्ज घेतले आहे. सहकार व कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकट्या पीककर्जाचे कर्जरूप १.८५ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. त्यापैकी ५०% हून अधिक शेतकरी नियमित परतफेड करू शकलेले नाहीत, तर लाखो शेतकरी एनपीए (थकबाकीदार) ठरवले गेले आहेत.

### फडणवीस पुन्हा अकोल्यात काय देणार उत्तर?

विकास संवाद सभे करिता मुख्यमंत्री फडणवीस बुधवारी अकोल्यात जाहीर सभेला उपस्थित राहणार आहेत. अकोला क्रिकेट क्लब मैदानावर होणाऱ्या या संवाद सभेकडे संपूर्ण विदर्भातील शेतकऱ्यांचे डोळे लागले आहेत. मुख्यमंत्री या वेळेस कर्जमाफीच्या मुद्द्यावर ठोस भूमिका घेतात का? की पुन्हा वळवून नेतात हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### कर्जमाफीसाठी किती लागेल रक्कम?

गतज्ज्ञांच्या मते जर सरकारने संपूर्ण कर्जमाफीची घोषणा केली, तर त्यासाठी किमान ९५,००० कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल. सध्या राज्याची आर्थिक स्थिती पाहता, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्टपणे सांगितले की, ‘‘कर्जमाफी शक्य नाही,‘‘ आणि शेतकऱ्यांना त्यांचे कर्ज स्वतः भरावे लागेल.

### शेतकरी संतप्त,वचनभंगाचा निषेध

या पार्श्वभूमीवर शेतकरी नेत्यांमध्ये संताप उसळला आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. शेतकरी संघटनांचे नेते प्रकाश पोहरे आणि विजयकांत तूपकर यांनी सुद्धा सरकारवर जोरदार टीका करत आंदोलन उभारले आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेकडे लक्ष

राजकीय आश्वासने वारंवार दिली जातात, पण अंमलबजावणीत उणीव राहते. कर्जबाजारी शेतकऱ्यांचा संघर्ष मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. आता मुख्यमंत्री स्वतः येऊन काय भूमिका मांडतात, आणि त्या शब्दांना कृतीत उतरवतात का हेच आगामी काळात राज्याच्या राजकारणाचे भविष्य ठरवेल.

## गंगानगरमधून ३६ किलो गांजाची जप्ती; २ महिला अटकेत



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** ‘ऑपरेशन प्रहार’ अंतर्गत अकोला जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखेने २०२५ सालातील सर्वात मोठी अंमलीपदार्थविरोधी कारवाई करत गंगानगर परिसरातून तब्बल ३६ किलो ०२ ग्रॅम ओलसर गांजा जप्त केला आहे. या कारवाईत २ महिला आरोपींना अटक करण्यात आली असून, एकूण जप्त मुद्देमालाची किंमत अंदाजे ७ लाख ३५ हजार ४०० रुपये इतकी आहे.

स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाल्यानंतर, जुने शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या गंगानगर भागात छापा टाकण्यात आला. या छाप्यात बिलकीस बानो सैय्यद रफीक व कनिज फातेमा सलीम शाह या दोन महिलांच्या घरातून गांजाची मोठ्या प्रमाणावर जप्ती करण्यात आली.

सदर कारवाई शासकीय पंच व राजपत्रित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली. आरोपींविरुद्ध एन.डी.पी.एस. ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदवून त्यांना पुढील कारवाईसाठी जुने शहर पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही धडक मोहीम मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.कारवाईत पो. नि. शंकर शेळके ( अकोला), स.पो. नि. विजय चव्हाण, पो.उ.नि. गोपाल जाधव, सहाय्यक पो.नि. राजपालसिंह ठाकूर यांच्यासह फिरोज खान, अब्दुल माजीद, रविंद्र खंडारे, अविनाश पाचपोर, वसीमोद्दीन, भारकर थोत्रे, एजाज अहमद, खुशाल नेमाडे, किशोर सोनोने, आकाश मानकर, स्वप्नील खेळकर, स्वप्नील चौधरी, उदय शुक्ला, अन्सार अहमद, अशोक सोनवणे, महिला अंमलदार मेघा मुळे, स्वप्ना चौधरी आणि चालक मनिष ठाकरे, प्रशांत कमलाकर, विजय यादव यांनी सहभाग घेतला.

## पोलीस लॉनमधील भ्रष्टाचार, अतिक्रमण व आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करा!

### सेवानिवृत्त पोलीस संघटनेचा संतप्त आरोप; आंदोलनाचा इशारा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** जिल्हा पोलीस वेलफेअर लॉनमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार, अतिक्रमण व आर्थिक अनियमितता घडत असल्याचा गंभीर आरोप सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष गोपाल परशराम चव्हाण यांनी केला आहे. त्यांनी सविस्तर तक्रारीसह पोलिस अधीक्षक कार्यालयात निवेदन सादर करत संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशी करून कडक कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

पोलीस लॉन व सभागृह सर्वसामान्य नागरिकांसह पोलीस कर्मचाऱ्यांना सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्याचा निर्णय असतानाही, केवळ एका खासगी कंत्राटदाराला मोठ्या रकमेची थकबाकी असतानाही पुन्हा कंत्राट दिले गेले, अशी संतप्त टीका निवेदनात करण्यात आली आहे.

कंत्राटदाराने भोजन, डेकोरेशन, विद्युत रोषणाई आदी सेवा अत्यंत उच्च दराने लादून कर्मचाऱ्यांची लूट सुरू केल्याचा आरोप आहे. यामध्ये जेवणाची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असून, बाहेरून अन्न आणले जात असल्याची तक्रारही नोंदविण्यात आली आहे.

पोलीस विभागाच्या मालकीची जागा अतिक्रमित असूनही, अधिकृतपणे ‘‘अतिक्रमण नाही‘‘ असे उत्तर देऊन गोपनिय माहिती लपवली जात आहे, असा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. देवी पोलीस लाईनजवळ मंदिराजवळील गेटलगत दोन इमारती, वसंत टॉकीजसमोरील जागा जिथे मस्जिद व शाळेसाठी जागा लिजवर देण्यात आली, अनेक ठिकाणी पक्क्या इमारती, टपऱ्या, दुकानं, गाळे हे अतिक्रमण स्वरूपात सुरू आहेत. हे सगळे असूनही पोलीस विभागाकडून स्पष्ट खोटे पत्र दिले गेल्याचा आरोप करण्यात आला आहे.

#### दीड ते दोन कोटींची थकबाकी!

सदर कंत्राटदाराकडे दीड ते दोन कोटी रुपयांपर्यंतची रक्कम शिल्लक असून ती बिनव्याजी ठेवण्यात आल्याचा आरोप निवेदनात आहे. ही रक्कम पोलीस वेलफेअरच्या निधीची असून, संबंधित पोलीस निरीक्षक वेलफ अर यांच्यावर या प्रकरणात आर्थिक लाभ घेण्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

पोलीस वेलफेअर अंतर्गत पेट्रोल पंप, सोसायटी, लॉन व इतर सेवा केंद्रांवर नियुक्ती प्रक्रियेत अपारदर्शकता आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची मुले बेरोजगार असताना बाहेरील लोकांची नियुक्ती होत असल्याचा आरोप करत, अशा केंद्रांवर स्थानिक बेरोजगारांना प्राधान्य देण्याची मागणी करण्यात आली आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कार्यवाही न झाल्यास, सेवानिवृत्त पोलिस कर्मचारी संघटना तीव्र आंदोलन छेडणार, असा स्पष्ट इशारा चव्हाण यांनी दिला आहे. वरील निवेदन हे गोपाल चव्हाण, उपाध्यक्ष - सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी संघटना, अकोला यांच्या वतीने सादर करण्यात आले आहे.

## चक्रीवादळाचा धुमाकूळ : शाळेच्या इमारतीसह अनेक घरांचे नुकसान

### इंझोरी वाघोळा रस्त्यावरील अनेक झाडे कोलमडली





दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**इंझोरी, दि. १० :** इंझोरी गावाला सुसाट वाऱ्यासह चक्रीवादळाने घेरले. या चक्रीवादळाच्या कचाट्यात जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक मराठी शाळा, मुंगसाजी महाराज विद्यालय, यासह गावातील अनेक घरे आल्याने प्रचंड नुकसान झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. ही घटना १० जून रोजी सायंकाळी पाच वाजताचे सुमारास घडली.

चक्रीवादळाचा जोर एवढा होता की जिल्हा परिषद मराठी शाळेवरील शाळेची भिंत सह टिन पत्री उडाली. पडलेल्या भिंतीमुळे वर्गखोलीत असणारे डेक्स बेंच तुटून पडले. तर मुंगसाजी महाराज विद्यालय मधील स्वयंपाक घरावरील संपूर्ण टीन उडून गेलीत. यासह इंझोरी वाघोळा रस्त्यावरील अनेक झाडे कोलमडून पडली. विद्युत पोलही पडली असल्याने गावातील विद्युत पुरवठा खंडित झाला आहे रस्त्यावरील अनेक झाडे पडल्याने रस्ता संपूर्ण बंद झाला आहे . अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये सुद्धा नुकसान आहे सध्या नुकसानाची आकडेवारी अद्याप मिळाली नाही. झालेल्या नुकसानाचे शासनाने त्वरित पंचनामे करावे अशी मागणी शेतकरी नागरिकांनी केली आहे.

## उमरखेड तालुक्यात वादळी-पावसाचा तडाखा

### शहर-ग्रामीण भाग रात्रभर अंधारात, महावितरणचे पितळ उघडे पडल्याचा आरोप!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**उमरखेड, दि. १० :** तालुक्यात सोमवारी सायंकाळच्या वादळी पावसाने मोठे नुकसान केले असून, शहर व ग्रामीण भाग अंधारात बुडाला आहे. महावितरणच्या मान्सूनपूर्व कामांकडे दुर्लक्ष झाल्याने हे संकट ओढवल्याचा आरोप होत असून, नागरिकांमध्ये प्रचंड संताप आहे.

सोमवारी, ९ जून रोजी सायंकाळी, अचानक आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यासह वादळी पावसाने उमरखेड शहर आणि तालुक्याला जोरदार तडाखा दिला. या वादळामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून रस्त्यांवर पडली, तर ग्रामीण भागांतील घरांवरील पत्रे उडाली. मात्र, या नैसर्गिक आपत्तीपेक्षाही महावितरण कंपनीच्या मान्सूनपूर्व कामांतील कथित हलगर्जीपणा अधिक प्रकर्षाने समोर आला. विजेचे खांब कोसळल्याने आणि तारा तुटल्याने संपूर्ण उमरखेड शहरासह तालुका रात्रभर अंधारात बुडाला होता, ज्यामुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. महावितरणकडून पावसाळ्यापूर्वी वीजवाहिन्यांना स्पर्श करणाऱ्या झाडांच्या फांद्या छाटणे, धोकादायक खांब बदलणे, आणि उघड्या डीपींची दुरुस्ती करणे यांसारखी अत्यावश्यक कामे करणे अपेक्षित असते. मात्र, ही कामे झाली नसल्याने, वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी तारांवर फांद्या पडून, तर काही ठिकाणी खांब कोसळून वीजपुरवठा खंडित झाला. रस्त्यांवर तारा आणि खांब पडल्याने उमरखेड-ढाणकी आणि उमरखेड-पुसद यांसारखे प्रमुख मार्गही काही काळासाठी बंद झाले होते, ज्यामुळे वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला. मंगळवारी दुपारपर्यंतही शहरातील अर्ध्याहून अधिक भागांतील वीजपुरवठा सुरळीत झाला नव्हता. ज्यामुळे सर्व शासकीय आणि खाजगी कार्यालयांतील कामकाज ठप्प पडले होते. वाढलेला उकाडा आणि विजेचा लपंडाव यामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान बालके आणि आजारी व्यक्तींचे सर्वाधिक हाल झाले. महावितरणने अर्धवट राहिलेली मान्सूनपूर्व कामे तात्काळ पूर्ण करून वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी जोरदार मागणी आता नागरिक करत आहेत.

#### वादळाचा वाहतुकीला मोठा फटका

सोमवारच्या वादळी पावसामुळे उमरखेड-ढाणकी आणि उमरखेड-पुसद या प्रमुख मार्गांवरील झाडे उन्मळून पडली. यासोबतच, विजेचे खांब आणि तारा रस्त्यावर कोसळल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला. त्यामुळे अनेक तास हे रस्ते वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद होते, ज्यामुळे प्रवाशांचे मोठे हाल झाले.

# शास्त्रज्ञ पोहोचले शेतकऱ्यांच्या बांधावर

## ‘विकसित कृषी संकल्प अभियान’ अंतर्गत नऊ तालुक्यात जनजागृती






दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १० :** शेतकऱ्यांना त्यांच्या गावातच कृषी तंत्रज्ञान आणि शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी ‘विकसित कृषी संकल्प अभियान’ जिल्ह्यात राबविल्या जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून कृषी रथांच्या माध्यमातून शास्त्रज्ञ शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना मार्गदर्शन करीत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत कृषी विज्ञान केंद्र आणि कृषी विभागातर्फे हा उपक्रम सुरू आहे.

या अभियानासाठी केव्हीके व कृषी विभागासोबत आत्मा, ॲक्शन फॉर फूड प्रोडक्शन, केंद्रीय कापूस संशोधन केंद्र आणि इफको यांचे संयुक्त सहकार्य लाभले आहे. यवतमाळ, कळंब, बाभुळगाव, राळेगाव, घाटंजी, मारेगाव, वणी, केळापूर व झरी-जामणी या नऊ तालुक्यांत दररोज तीन गावांमध्ये हे अभियान राबवले जात आहे. दोन फिरत्या कृषी रथांच्या माध्यमातून शास्त्रज्ञ रोज ११०० ते १२०० शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत आहेत. यावेळी खरीप हंगामासाठी पीक लागवड, रुंद वरंबा सरी पद्धत, कापूस पिकात अति सघन लागवड, बीज प्रक्रिया, तण, कीड व रोग व्यवस्थापन, फवारणीतील काळजी आणि कृषी विभागाच्या योजना यावर सविस्तर माहिती दिली जात आहे. ऐन हंगामाच्या मुहूर्तावर मिळणाऱ्या या मार्गदर्शनामुळे शेतकरी प्रोत्साहित होत असून, अभियानाला उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे केव्हीकेच्या वरिष्ठ शास्त्रज्ञांनी सांगितले.

## तालुका युवक काँग्रेसच्या वतीने शिवराज्याभिषेक दिन साजरा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बाळापूर, दि. १० :**उरळ प्राथमिक आरोग्य केंद्र येथे तालुका युवक काँग्रेसच्या वतीने शुक्रवार दि. ६जुनं रोजी शिवराज्याभिषेक दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रम मा.प्रकाश तायडे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली बाळापुर तालुका युवक काँग्रेसच्या वतीने उरळ प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शिवराज्याभिषेक कार्यक्रम साजरा करण्यात आला. सोबतच उरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे हेड डॉ.विनोद श्रीपाद दारोकार यांनी पदभार स्विकारल्या बद्दल त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन युवक काँग्रेस बाळापूरच्या वतीने स्वागत करण्यात आले. बाळापुर तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष दिलीप रवींद्र पाटील यांनी त्यांचे स्वागत केले आहे. व सोबतच आपले काही विशेष मत व्यक्त केले. त्यांनी डॉ. साहेबांना सांगितले की, आपल्या उपस्थितीमध्ये आता उरळ प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत येत असलेल्या गावातील गोरगरीब रुग्णांना वेळेवर उपचार देण्यात यावे व त्यांना कुठल्याच प्रकारची त्रास होता कामा नये याची दक्षता घ्यावी. काँग्रेस पार्टी गोरगरीब जनतेच्या हितासाठी व लोकांच्या न्याय हक्कासाठी सदैव लोकांमध्ये जाऊन काम करत असते.

**Change of Name**

I have changed my name from MOHAMMAD ANIS SHAIKH HANIF to MOHAMMAD ANIS MOHAMMAD HANIF Address:-Khadakpura, Old city, Murtizapur, Murtizapur, Dist. Akola,

# सूर्या मुंबई टी-२० मध्ये फ्लॉप

**नवी दिल्ली, दि. १० प्रतिनिधी**

आयपीएल २०२५ चे जेतेपद आरसीबीने पटकवले. या लीगच्या समाप्तीनंतर टी-२० मुंबई लीग २०२५ खेळवण्यात येत आहे. या दरम्यान, भारतीय संघातील अनेक स्टार खेळाडू या लीगमध्ये काही संघांचे नेतृत्व करताना दिसून येत आहेत. मुंबई इंडियन्सचा खेळाडू आणि टीम इंडियाचा टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव हा ट्रायम्फ नाईट्स एमएनई संघाचे नेतृत्व करत आहे. या स्पर्धेत मात्र त्याचे नेतृत्व काही कमाल दाखवू शकले नाही. आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळताना त्याने आपल्या बॅट धावांचा पाऊस पडला होता. परंतु त्याला टी-२० मुंबई लीग २०२५ लीगमध्ये आपली छाप सोडता आली नाही.सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली, ट्रायम्फ नाईट्स एमएनई संघ टी-२० मुंबई लीग २०२५ स्पर्धेतून मधून बाहेर पडला आहे. एकंदरीत, सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील ट्रायम्फ नाईट्स एमएनई संघ बाद फेरीत देखील पोहचू शकला नाही. पहिल्या सामन्यानंतर सूर्यकुमार यादवल देखील चांगली कामगिरी करता आलेली नाही. आता यामुळे, त्याची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.मुंबई पँथर्सने सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली ट्रायम्फ नाईट्स एमएनआयचा ३८ धावांनी पराभव केला आहे.




# वेस्ट इंडिजचा फलंदाज निकोलस पूरनने जाहीर केली निवृत्ती

मागील काही दिवसांपासून जगभरातील विविध देशांमधील दिग्गज क्रिकेटपटूंनी निवृत्ती जाहीर केली आहे. यानंतर आज (दि. १० जून) क्रिकेट विश्वाला आणखी एक धक्का बसला. वेस्ट इंडिजचा स्टार क्रिकेटपटू निकोलस पूरनने वयाच्या २९ व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. आज त्याने एका इंस्टाग्राम पोस्टद्वारे ही घोषणा केली.



**निकोलस पूरनने इंस्टाग्राम पोस्टमध्येनमूद केले की, खूप विचार आणि चिंतन केल्यानंतर मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे. या खेळाने मला खूप आनंद दिला. हा खेळ अविस्मरणीय आठवणींबरोबरच वेस्ट इंडिजच्या लोकांचे प्रतिनिधित्व करण्याची संधी देत राहील. मरून रंगाची जर्सी घालणे, राष्ट्रगीतासाठी उभे राहणे आणि प्रत्येक वेळी मैदानावर पाऊल ठेवताना सर्वकाही देणे, त्या क्षणांचे शब्दात वर्णन करणे कठीण आहे. याचा माझ्यासाठी काय अर्थ आहे हे स्पष्ट करणे कठीण आहे. कर्णधार म्हणून संघाचे नेतृत्व करणे हा एक सन्मान आहे जो मी नेहमीच माझ्या हृदयात ठेवेन.' तुमच्या अढळ प्रेमाबद्दल चाहत्यांचे आभार. तुम्ही कठीण काळात मला साथ दिली. चांगल्या क्षणांमध्ये मोठ्या उत्साहाने साजरा केला. या संपूर्ण प्रवासात मला साथ देणारे माझे कुटुंब, मित्र आणि सहकाऱ्यांचे आभार. तुमचे आशीर्वाद आणि पाठिंब्यामुळेच मी या प्रवासात आगेकूच करु शकलो. माझ्या कारकिर्दीचा हा आंतरराष्ट्रीय अध्याय संपला असला तरी, वेस्ट इंडिज क्रिकेटवरील माझे प्रेम कधीही कमी होणार नाही. मी संघ आणि प्रदेशाला पुढील वाटचालीसाठी यश आणि बळ मिळो अशी शुभेच्छा देतो.**

**पूरनने वेस्ट इंडिजसाठी ६१ वन-डे सामने आणि १०६ टी-२० सामने खेळले. वन-डेमध्ये त्याने ३९.६६ च्या सरासरीने १९८३ धावा केला. तर टी-२० मध्ये २६.१५ च्या सरासरीने आणि १३६.४० च्या स्ट्राईक रेटने २२७५ धावा केल्या आहेत. पूरनने वन-डेमध्ये सामन्यात तीन शतके आणि ११ अर्धशतके झळकावली आहेत. तर टी-२० मध्ये १३ अर्धशतके त्याच्यानावावर आहेत. रनने वेस्ट इंडिजसाठी कधीही कसोटी सामना खेळला नाही. पूरनने एकदिवसीय सामन्यातही सहा विकेट्स घेतल्या आहेत. पूरन सर्वात लहान स्वरूपात वेस्ट इंडिजचा कर्णधार देखील राहिला आहे.**

**पूरनने निवृत्तीचे कारण स्पष्ट केले नसले तरी जगभरातील टी-२० लीग खेळण्यासाठी त्याने हा निर्णय घेतला असावा, असे मानले जात आहे. वेस्ट इंडिजचे ड्वेन ब्राव्हो, ख्रिस गेल, आंद्रे रसेल आणि सुनील नारायण यांनीही जगभरातील टी-२० लीग खेळण्यासाठी निवृत्ती जाहीर केली हेती. आता पूरन जगभरातील विविध लीग खेळत राहिल. सध्या टी-२० मधील स्टार फलंदाजांपैकी एक अशी त्याची ओळख आहे. फ्रँचायझी त्याला त्यांच्या संघात समाविष्ट करण्यास उत्सुक आहे.**

**इंडीयन प्रीमियर लीग २०२५ च्या निकोलस पुरन यांच्या कामगिरीबद्दल बोलायचं झाले तर तो या सिझनमध्ये लखनऊ सुपर जायंट्स या संघाकडून खेळला. यामध्ये त्याने १४ सामन्यामध्ये त्याने ५२४ धावा केल्या. त्याचबरोबर ५ अर्धशतक झळकावले. त्याने सुरुवातीच्या काही सामन्यांमध्ये कमालीची कामगिरी केली होती पण त्यानंतर तो शेवटच्या काही सामन्यात फेल ठरला होता. एवढेच नव्हे तर त्याने या सिझनमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याच्या यादीत अव्वल स्थानावर होता. त्याने आयपीएल २०२५ मध्ये ४० षटकार मारले. त्याने या सिझनमध्ये चांगली कामगिरी केली आणि त्याने शक्ती प्रदर्शन दाखवले.**

# जसप्रीत बुमराह करणार जागतिक क्रिकेटवर राज्य!




**नवी दिल्ली, दि. १० प्रतिनिधी**

भारत आणि इंग्लंडमध्ये २० जूनपासून पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाणार आहे. यासाठी टीम इंडिया इंग्लंडला रवाना झाली आहे. भारतीय संघ इंग्लंडमध्ये सराव सामने खेळत आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा या दिग्गज अनुभवी खेळाडूंनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घोषित केली आहे. त्यांच्याशिवाय भारतीय संघ एका नव्या दमाच्या खेळाडूंसोबत प्रदेश वारी करत आहे. शुभमन गिलकडे संघाची धुरा सोपविली आहे.या संघात रवींद्र जडेजा आणि जसप्रीत बुमराह ही दोन अनुभवी खेळाडू आहेत. या मालिकेत, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला विक्रम करण्याची संधी चालून आली आहे. त्याला पाकिस्तानी दिग्गज वसीम अक्रमला मागे तकणेची संधी आहे. त्यानंतर जागतिक क्रिकेटमध्ये जसप्रीत बुमराहचे राज्य चालू होईल.पाकिस्तानचा माजी दिग्गज वेगवान गोलंदाज वसीम अक्रम हा आशियातील एकमेव गोलंदाज आहे ज्याने सेना () देशांमध्ये सर्वाधिक विकेट्स घेतल्या आहेत. इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाला यांना सेना देश म्हटले जाते. वसीम अक्रमने या देशांमध्ये एकूण १४६ विकेट्स मिळवल्या आहेत. भारताचा स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराह या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे.जसप्रीत बुमराहने सेना देशांमध्ये एकूण १४५ कसोटी विकेट्स मिळवल्या आहेत. त्यानुसार, जसप्रीत बुमराहला आपला दबदबा निर्माण करण्यासाठी आणि माजी पाकिस्तानी गोलंदाज वसीम अक्रमचा विक्रम मोडण्यासाठी फक्त दोन विकेट्सची गरज आहे. इंग्लंड मालिकेत दोन विकेट्स घेणे ही जसप्रीत बुमराहसाठी काही मोठी गोष्ट नाही. २० जूनपासून खेळल्या जाणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यात तो वसीम अक्रमचा विक्रम मोडण्याची शक्यता वर्तवण्यातएत आहे.भारताचा दिग्गज फिरकी गोलंदाज अनिल कुंबळेचे नाव देखील सेना देशांमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या आशियाई गोलंदाजांच्या यादीत तिसऱ्या क्रमांकावर समाविष्ट आहे. त्याने सेना देशांमध्ये एकूण १४१ विकेट्स मिळवल्या आहेत. यादीत चौथ्या क्रमांकावर आणखी एका भारतीय वेगवान गोलंदाजाचा सामावेश आहे. इशांत शर्माने तेथे एकूण १३० विकेट्स मिळवण्यात यश प्राप्त केले आहे.

# लंडनमध्ये धोनीचा खास सन्मान

## आयसीसीच्या 'हॉल ऑफ फेम'मध्ये मिळाले स्थान!

**नवी दिल्ली, दि. १० प्रतिनिधी**

सोमवारी लंडनमध्ये झालेल्या एका समारंभात टीम इंडियाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीचा आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये समावेश करण्यात आला.



आयसीसीने ११५ खेळाडूंच्या यादीत सात नवीन खेळाडूंमध्ये (पाच पुरुष आणि दोन महिला) धोनीचा समावेश केला. आयसीसीने सन्मानित केलेला तो ११ वा भारतीय खेळाडू (पुरुषांमध्ये नववा) आहे.

धोनीने २००४ मध्ये भारतासाठी पदार्पण केले होते आणि २००७ मध्ये झालेल्या पहिल्या आयसीसी टी-२० विश्वचषकात संघाचे नेतृत्व केले, जिथे भारताने जेतेपद जिंकले.

त्यानंतर, २०११ मध्ये ५० षटकांचा विश्वचषक आणि २०१३ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकून त्याने भारतीय संघाला आयसीसीच्या तिन्ही ट्रॉफी जिंकून देण्याची किमया केली. धोनीच्या नेतृत्वाखाली, २००९ मध्ये टीम इंडिया पहिल्यांदाच कसोटी क्रिकेटमध्ये नंबर-१ बनली.धोनीसह, इतर अनेक दिग्गज खेळाडूंनाही आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये स्थान देण्यात आले आहे.

दक्षिण आफ्रिकेचा उत्कृष्ट सलामीवीर हाशिम अमलालाही त्यात स्थान मिळाले आहे. कसोटीत ३८० धावांची ऐतिहासिक खेळी खेळणारा ऑस्ट्रेलियाचा प्रसिद्ध फलंदाज मॅथ्यू हेडनचाही समावेश करण्यात आला आहे.सर्वाधिक कसोटी सामने जिंकणारा कर्णधार असलेला दक्षिण आफ्रिकेचा ग्रॅमी स्मिथ आता या विशेष यादीचा भाग बनला आहे.

# हेनरिक क्लासेनने निवृत्तीबद्दल केला मोठा खुलासा

**नवी दिल्ली, दि. १० प्रतिनिधी**



दक्षिण आफ्रिकेचा धडाकेबाज फलंदाज हेनरिक क्लासेनने काही दिवसांपूर्वी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. त्याच्या या निर्णयाने संपूर्ण क्रिकेट जगताला हादरवून टाकले. जेव्हा त्याने निवृत्तीची घोषणा केली, तेव्हा त्यामागील कारण कोणालाही माहिती नव्हते. पण आता क्लासेनने स्वतःच वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती का घेतली याचा खुलासा केला आहे.हेनरिक क्लासेन सांगितले की, त्याला त्यांच्या देशासाठी क्रिकेट खेळण्याबरोबरच जगभरातील प्रमुख टी-२० लीगमध्येही सहभागी व्हायचे होते. मात्र, क्रिकेट दक्षिण आफ्रिका () सोबत करार होऊ न शकल्याने आणि प्रशिक्षकपदातील बदलांमुळे त्याला हा निर्णय घ्यावा लागला. क्लासेनला २०२७ च्या क्रिकेट विश्वचषकापर्यंत दक्षिण आफ्रिकेसाठी खेळायचे होते. परंतु, रॉब वाल्टर यांना प्रशिक्षकपदावरून हटवण्यात आल्यानंतर आणि व्हाइट-बॉल संघासाठी शुकरी कोनराड यांची प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाल्याने क्लासेनच्या भविष्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली.

## ५ लाख ७७ हजार जणांनी गमावला रोजगार

**नवी दिल्ली:** देशात ९० च्या दशकात केबल टेलिव्हिजनचा उदय झाला. अवघ्या काही वर्षांमध्ये देशभरात याचे जाळे पसरले. केबल टीव्हीने सामाजिक व सांस्कृतिक मोठा बदल झालाच. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीही झाली. महानगरापासून निम्मशहरांपर्यंत पसरलेल्या या केबल टेलिव्हिजन उद्योगाने लाखो जणांना रोजगार उपलब्ध करुन दिले. मात्र मागील काही वर्षांमध्ये मोबाईल स्मार्ट फोनने सर्वांचे जगणं बदललं. याचा थेट परिणाम भारतातील केबल टेलिव्हिजन उद्योगावर झाला आहे. गेल्या सात वर्षांत केबल टीव्ही व्यवसायातील लाखो जणांनी रोजगार गमावले असल्याचे स्टेट ऑफ केबल टीव्ही डिस्ट्रीब्युशन इन इंडिया'ने आपल्या सर्वेक्षण अहवालात नमूद केले आहे.ऑल इंडिया डिजिटल केबल फेडरेशन (एआयडीसीएफ ) आणि ईवाय इंडिया यांनी संयुक्तरित्या तयार केलेल्या 'स्टेट ऑफ केबल टीव्ही डिस्ट्रीब्युशन इन इंडिया'ने सर्वेक्षण अहवालानुसार, मागील सात वर्षांत म्हणजे २०१८ ते २०२५ या कालावधीत पैसे भरून केबल टीव्ही सेवा घेणाऱ्यांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. २०१८ मध्ये केबल टीव्ही ग्राहकांची संख्या तब्बल १५.१ कोटी होती. २०२४ मध्ये ती ११.१ कोटीवर आली आहे . ही संख्या २०३० पर्यंत आणखी घटून ७.१ ते ८.१ कोटीपर्यंत जाण्याची शक्यता आहे.अवघ्या सात वर्षांपूर्वी देशभरात केबल टीव्ही ग्राहकांची संख्या १५. १ कोटी होती. मात्र यानंतर ग्राहकांच्या संख्येत सातत्याने घट झाली आहे. यामागे चॅनल शुल्कात वाढ, ओटीटी प्लॅटफॉर्म्समधून मिळणारी वाढती स्पर्धा आणि डीडी फ्री डिशसारख्या विनामूल्य सेवांचा वाढता वापर, अशी कारणांमुळे ग्राहकांमध्ये घट झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.चार प्रमुख डीटीएच (डायरेक्ट-टू-होम) कंपन्या आणि १० मोठ्या एमएसओज (मल्टी-सिस्टम ऑपरेटर्स) यांच्या मिळकतीत २०१८ पासून १६ टक्के घट झाली असून, त्यांचा नफा २९% ने घसरला आहे. वित्तीय वर्ष २०१९ मध्ये या कंपन्यांची एकत्रित उलाढाल २५,७०० कोटी रुपये होती, जी वित्तीय वर्ष २०२४ मध्ये २१,५०० कोटी रुपयांवर आली आहे.स्थानिक पातळीवर केबल ऑपरेटरचे चित्र अधिक चिंताजनक आहे.

# कर्ज स्वस्ताईचे पाऊल ; पाच बँकांकडून कर्जदारांना व्याजदरात कपातीचा लाभ

**नवी दिल्ली, दि. १० प्रतिनिधी**

रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी रेपो दरात केलेल्या अपेक्षेपेक्षा जास्त अशा अर्धा टक्क्यांच्या कपातीची ताबडतोब परिणाम दिसून येत असून, अनेक बँकांनी रविवारपासून व्याजाचे दर तेवढ्याच प्रमाणांत म्हणजे अर्धा टक्क्यांनी कमी करण्याची घोषणा केली. सरकारी मालकीच्या बँक ऑफ बडोदा, पंजाब नॅशनल बँक यांनी रविवारी रिझर्व्ह बँकेच्या दर कपातीला अनुसरून, तिचे रेपो दराशी संलग्न कर्जदर




(आरएलएलआर) ५० आधार बिंदूनी अर्थात अर्धा टक्क्यांनी कमी करण्याची घोषणा केली. त्यांचे या प्रकारातील व्याजाचे दर हे आता अनुक्रमे ८.१५ टक्के आणि ८.३५ टक्के पातळीवर आले आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील बँक ऑफ इंडियानेही तत्सम कपात करून, ८.८५ टक्क्यांऐवजी आता ८.३५ टक्के असे सुधारीत व्याजदर रेपो दर संलग्न कर्जांसाठी लागू केले आहेत.

खासगी क्षेत्रातील एचडीएफसी बँकेने त्यांच्या निधी आधारीत कर्जाचे दरात (एमसीएलआर) कालावधीनुरूप १० आधार बिंदूंची (०.१० टक्के) कपात केली आहे. ज्यांचे कर्ज या मानदंडाशी संलग्न आहेत, अशा कर्जदारांना याचा फायदा होईल. बँकेचे हे नवीन दर ७ जूनपासूनच लागू झाल्याचे म्हटले आहे. युको बँकेनेही 'एमसीएलआर' संलग्न व्याजाचे दर १० आधारबिंदूंनी कमी केले आहेत. अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी व्याजदरात कपातीसह, रिझर्व्ह बँकेकडून अनपेक्षितपणे बँकांना कर्ज देण्यासाठी अधिक पैसे उपलब्ध करून देणारे रोख राखीव प्रमाण (सीआरआर) देखील एक टक्क्यांनी कमी करण्याच्या निर्णयाची घोषणा केली. टप्प्याटप्प्याने लागू होणाऱ्या या कपातीने बँकांसाठी सीआरआरचे प्रमाण हे ४ टक्क्यांवरून ३ टक्क्यांवर येईल आणि तब्बल २.५० लाख कोटी रुपयांचा निधी बँकांना कर्जवितरणासाठी खुला होईल, असे रिझर्व्ह बँक गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी शुक्रवारी स्पष्ट केले.

# चांदी पोहोचली १ लाख ८ हजार रुपये प्रती किलोवर



**नवी दिल्ली, दि. १० प्रतिनिधी**

जागतिक बाजारात चांदीला मागणी कायम आहे. अशा परिस्थितीत सोमवारी चांदीचा दर दिल्ली सराफा १,००० रुपयानी वाढून १ लाख ८ हजार रुपये प्रती किलो या पातळीवर गेला. दिल्ली सराफात सोन्याचा दर मात्र २८० रुपयांनी कमी होऊन ९७,७८० रुपये प्रति दहा ग्रॅम या पातळीवर गेला.चांदीचा दर एकतर्फे वाढत असल्याबद्दल व्यापाऱ्यांनी सांगितले की, जागतिक पातळीवर आता गुंतवणूकदार महागाईपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी चांदीची खरेदी वाढवीत आहेत. कारण सोन्याचा दर अगोदरच उच्च पातळीवर आहे.

रशिया -युक्रेन युद्ध अधिक चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अमेरिकेची अर्थव्यवस्था डबघाईला आल्यामुळे अमेरिकेचा डॉलर कमकुवत होत आहे. त्याचबरोबर अमेरिकेच्या कर्जरोख्यातील गुंतवणुकीबाबत गुंतवणूकदार सावध झाले आहेत.

# गव्हाच्या सरकारी खरेदीचा गेल्या ४ वर्षातील उच्चांक

**नवी दिल्ली, दि. १० प्रतिनिधी**

या वर्षी सरकारने किमान आधारभूत किमतीवर (एमएसपी) भरपूर गहू खरेदी केला आहे. गव्हाची सरकारी खरेदी ३०० लाख टनांच्या पातळी ओलांडली आहे. ज्याचा लाखो शेतकऱ्यांना फायदा झाला आहे. गेल्या काही वर्षांपासून गव्हाची सरकारी खरेदी कमी होत होती आणि ३०० लाख टनांच्या खालीच राहिली होती. अशा परिस्थितीत, ४ वर्षांनंतर या वर्षी गव्हाची सरकारी खरेदी ३०० लाख टनांचा आकडा ओलांडली आहे.यापूर्वी २०२१-२२ मध्ये विक्रमी ४३३ लाख टन गहू खरेदी करण्यात आला होता. त्यानंतर २०२२-२३ मध्ये गव्हाच्या उत्पादनात घट झाल्याने त्याची सरकारी खरेदीही १८७ लाख टनांपर्यंत कमी झाली. आता गेल्या ३ वर्षांपासून चांगले गव्हाचे उत्पादन झाल्यामुळे त्याची खरेदीही वाढत आहे. २०२५-२६ च्या रब्बी हंगामासाठी गव्हाची किमान आधारभूत किंमत २,४२५ रुपये प्रति क्विंटल आहे.यावर्षी गव्हाच्या खरेदीत तेजी आहे. केंद्र सरकारच्या केंद्रीय अन्नधान्य खरेदी पोर्टल () नुसार, रब्बी विपणन हंगाम २०२५-२६ मध्ये आतापर्यंत गव्हाची सरकारी खरेदी ३०० लाख टन (३,००,००,८४०.३१ टन) ओलांडली आहे. यावर्षी सरकारने ३१२ लाख टन गहू खरेदी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. गहू खरेदी अजूनही सुरू आहे आणि त्याची खरेदी करण्याची शेवटची तारीख ३० जून आहे.

यावर्षी गव्हाची सरकारी खरेदी गेल्या वर्षीपेक्षा खूपच जास्त झाली आहे. गेल्या रब्बी हंगामात सरकारने सुमारे २६६ लाख टन गहू खरेदी केला होता. अर्थात, या वर्षी गव्हाची खरेदी गेल्या वर्षीच्या एकूण खरेदीपेक्षा सुमारे १३ टक्के जास्त आहे.पंजाबमध्ये सर्वाधिक गहू खरेदी करण्यात आली आहे. सीएफपीपीच्या आकडेवारीनुसार, पंजाबमधून ११९.१९ लाख टन गहू खरेदी करण्यात आला आहे, जो एकूण खरेदीच्या सुमारे ४० टक्के आहे. त्यानंतर, मध्य प्रदेशातून ७७.५३ लाख टन, हरियाणामधून ७२.०६ लाख टन गहू खरेदी करण्यात आला आहे.



एकूण गहू खरेदीमध्ये या तीन राज्यांचा वाटा ९० टक्क्यांच्या जवळपास होता. सरकारने राजस्थानमधून २०.६० लाख टन आणि उत्तर प्रदेशमधून १०.२६ लाख टन गहू खरेदी केला.सरकारी हमीभावावर गव्हाच्या खरेदीचा लाखो शेतकऱ्यांना फायदा झाला आहे आणि त्यांना हजारो कोटी रुपये देण्यात आले आहेत. सीएफपीपीकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार, चालू रब्बी हंगामात आतापर्यंत २३,८६,५५६ शेतकऱ्यांकडून गहू खरेदी करण्यात आला आहे .

पैसे बिमारी ठीक होने के बाद

उम्र की अधिकता और
बीपी शुगर से आई कमजोरी,
टायमिंग में कमी,
शुक्राणु की कमी,
निःसंतान, आदी सभी
रोगों का विशेष
आयुर्वेदिक पद्धती से इलाज. मनचाहा पॉवर
सफलता से प्राप्त करने हेतु संपर्क करें
धन्वंतरी आयुर्वेदिक
भारती कॉम्प्लेक्स नं.२ उद्योग भवन समोर,
दारव्हा रोड, यवतमाळ
8767418343

# नागपुरातील ‘सक्षम’ उपक्रम ठरला प्रभावी

## विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीत सकारात्मक बदल, ५०० शिक्षकांनाही उद्योजकतेसंबंधी प्रशिक्षण

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १० : नागपूर व अमरावती जिल्ह्यातील शाळांमध्ये ‘उद्यम लर्निंग फाउंडेशन’चा ‘सक्षम’ उपक्रम प्रभावी ठरला आहे. विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीत सकारात्मक बदल होऊन, त्यांच्यात उद्योजकता वाढत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीने राबवलेल्या या उपक्रमातून ५०० शिक्षकही प्रशिक्षित झाले आहेत.**



नागपूर जिल्ह्यातील निवडक शाळांमध्ये २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात राबविण्यात आलेला ‘सक्षम’ हा उपक्रम, विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशील मानसिकता विकसित करण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरल्याचे निष्पन्न झाले आहे. युवकांमधील उद्योजकतेला चालना देण्यासाठी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आणि शासनाच्या सहकार्याने, ‘उद्यम लर्निंग फाउंडेशन’ या सेवाभावी संस्थेमार्फत नागपूर आणि अमरावती जिल्ह्यांतील शासकीय, अनुदानित शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये हा विशेष उपक्रम राबविण्यात आला.

‘उद्यम’ ही मेकिन माहेश्वरी यांनी ना-नफा तत्त्वावर स्थापन केलेली संस्था असून, १४ ते २५ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये प्रकल्पाधारित शिक्षणातून उद्यमशील मानसिकता व कौशल्ये विकसित करणे, हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. नागपूर जिल्हा परिषदेच्या ३० शाळांमध्ये याचा पथदर्शी प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यात आला, ज्यात ४० प्रकल्पांचे प्रदर्शनही भरवण्यात आले. तर, अमरावती जिल्हा परिषदेच्या २१२ शाळांमधील आठ हजार विद्यार्थ्यांसोबत हा कार्यक्रम राबविण्यात आला असून, २०२५-२६ मध्ये त्याचा विस्तार ४०० शाळांपर्यंत होणार आहे. राज्यस्तरावर ‘सक्षम’ कार्यक्रमात १५ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, ज्यातून २५०० हून अधिक व्यवसाय कल्पना सादर झाल्या, १५०० प्रोटोटाईप तयार झाले आणि ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी आपल्या उत्पादनांची विक्री करून प्रत्यक्ष व्यवसायाचा अनुभव घेतला. यातून विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीत सकारात्मक बदल दिसून आला. सोबतच, ५०० शिक्षकांनाही उद्योजकतेसंबंधी प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती ‘उद्यम लर्निंग फाउंडेशन’ने दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे की, “महाराष्ट्रात दरवर्षी सुमारे १४ लाख युवा मनुष्यबळ दाखल होत असल्याने, त्यांच्या हातांना अधिक कौशल्यपूर्ण करण्यासाठी ‘सक्षम’सारखे उपक्रम उपयुक्त ठरतील.” नागपूर जिल्हा परिषदेच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांनीही, “या उपक्रमाने विद्यार्थ्यांना नोकरी किंवा स्वयंरोजगार निर्मितीची प्रत्यक्ष अनुभूती दिली, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे,” असे सांगत या उपक्रमाचे कौतुक केले.

### ‘सक्षम’मधून प्रत्यक्ष व्यवसाय निर्मिती

**‘सक्षम’ कार्यक्रमांतर्गत राज्यभरातील १५ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यातून २५०० हून अधिक व्यवसाय कल्पना पुढे आल्या, १५०० प्रोटोटाईप तयार झाले, तर ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष आपल्या उत्पादनांची विक्री करून नफा कमावला. यातून त्यांच्यात उद्योजकतेचे गुण रुजण्यास मोठी मदत झाली.**

### राज्यात आणि देशात होणार विस्तार

**हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, आत्मविश्वास आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढवत आहे. या माध्यमातून राज्यातील १७ हजार शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील सुमारे ४५ लाख विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट आहे. ‘उद्यम’ संस्थेने आतापर्यंत १२ राज्यांत २९ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना उद्योजकीय शिक्षण दिले आहे.**

# शिवराज्याभिषेक सोहळा थाटात साजरा

## छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री शर्मा यांची उपस्थिती

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर, दि. १० :** नागपूर महानगरपालिका आणि श्री शिवराज्याभिषेक सोहळा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी महाल येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ‘शिवतीर्थ’ येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य शिवराज्याभिषेक सोहळा पार पडला.

छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री विजय शर्मा यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली. आमदार प्रवीण दटके, श्रीमंत राजे मुधोजी भोसले, युवराज जयसिंग भोसले, नागपूर मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, माजी महापौर दयाशंकर तिवारी, उपायुक्त विनोद जाधव, क्रीडा अधिकारी पीयूरू आंबुलकर आदी उपस्थित होते. सोहळ्याचे उत्कृष्ट आयोजन बघून आपण येथे रायगडावरील छत्रपती शिवजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक सोहळ्याला आलो असल्याची भावना उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री श्री. विजय शर्मा यांनी व्यक्त केली. उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांनी उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांचे स्वागत केले. तसेच, उपमुख्यमंत्री शर्मा यांना मनपाचा मानाचा दुप्पटा व ७५ व्या अमृत महोत्सवी सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. सोहळ्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल बघायला मिळाली. ढोल-ताशांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. सोहळ्यानिमित्त सादर करण्यात आलेल्या शिवकालीन क्रीडा प्रात्यक्षिकांनी उपस्थितांना त्या ऐतिहासिक काळाची आठवण करून दिली. तसेच, शिवराज्याभिषेक महिला मुद्रा पथकाने केलेल्या सादरीकरणाने सर्वांची मने जिंकली.

# प्रेयसीच्या सरणावर प्रियकरही चढला

**नागपूर, दि. १० :** प्रेमप्रकरणातून नैराश्य आलेल्या १९ वर्षीय तरुणीने आत्महत्या केली. तिच्या अंत्यविधीदरम्यान प्रियकराने सरणावर उडी मारण्याचा प्रयत्न केला. ही घटना नागपूर जिल्ह्यातील नवीन कामठी ठाण्याच्या हद्दीत रविवारी घडली. कन्हान येथील विद्या (बदललेले नाव) हिचे कन्हानमधीलच अनुराग मेश्रामसोबत प्रेमसंबंध होते. काही कारणास्तव दोघांमध्ये मतभेद झाले आणि तिने रविवारी नैराश्याच्या भरात राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी कामठी उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आला. सोमवारी तिच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यासाठी कन्हान नदीपात्रातील घाटावर नेण्यात आले. यावेळी अनुराग दारूच्या नशेत घाटावर आला आणि त्याने तिच्या सरणावर उडी मारण्याचा प्रयत्न केला. मात्र, उपस्थित नागरिकांनी वेळीच त्याला रोखले. शिवाय चांगला चोपही दिला.

# ८४ वर्षांच्या वृक्षाचे यशस्वी पुनर्रोपण

## पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीकोनातून मनपाचा अभिनव प्रयोग

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर, दि. १० :** महानगरपालिका व्यवस्थापनाने ‘ट्रान्सप्लान्टर मशीन’द्वारे ८४ वर्षे जुन्या हेरिटेज झाडाचे प्रायोगिक तत्वावर यशस्वीपणे पुनर्रोपण केले आहे. पर्यावरण संरक्षणाच्या आणि हरित नागपूरच्या दिशेने नागपूर महानगरपालिकाच्या वतीने एक उल्लेखनीय पाऊल उचलण्यात आले आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणतर्फे भांडेप्लॉट चौक येथे उड्डाणपुल (फ्लायओव्हर) बांधण्यात येत आहे. या रस्त्यावर मुखर्जी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलजवळ पिंपळाचा ८४ वर्षे जुना वृक्ष वाहतुकीसाठी अडथळा ठरत होता. या ३० फूट उंच झाडाला ‘ट्रान्सप्लान्टर मशीन’च्या सहाय्याने जमिनीतून उचलण्यात आले. अगोदर जेसीबीने झाडाच्या बुंध्याशी मोठा खड्डा करण्यात आला. या प्रक्रियेत झाडाच्या मुळांना आणि खोडाला नुकसान न करता शीतला मातामंदिर परिसरातील भविष्य निर्वाह निधी कार्यालयाजवळ यशस्वीपणे पुनर्रोपित केले. रिमोटद्वारे संचालित डकोटा कंपनीची मशीन ठाणे महानगरपालिकानंतर नागपुरातच आहे. मशीनचे काम रिमोटद्वारे करण्यात येते. मशीनमध्ये १६०० लिटर पाण्याची टाकी आहे. झाड काढताना आणि पुन : रोपित करताना झाडाच्या मुळांना पाणी देता येते. शहरातील विविध विकासकामांत अडथळे निर्माण करणाऱ्या झाडांना प्रत्यारोपण करण्यात मशीनची मदत घेण्यात येत आहे. खरेदीसाठी जिल्हा नियोजन निधीतून ५ कोटी ४७ लाख रुपयांची तरतूद झाली आहे. मनपातर्फे खरेदी करण्यात आलेल्या या मशीनला प्रादेशिक परिवहन विभागाकडून वाहन क्रमांक सुद्धा प्राप्त झाला आहे. याप्रसंगी मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. आणि उपायुक्त (उद्यान) गणेश राठोड, नेहरूनगर झोनच्या सहायक आयुक्त सोनम देशमुख, कार्यकारी अभियंता राजेश गुरमुळे, उज्ज्वल लांजेवार, उद्यान अधीक्षक अमोल चौरपागार आदी उपस्थित होते.

# जागतिक योग दिन कार्यक्रमाचा आढावा



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १० :** नागपूर महानगरपालिकेच्या वतीने २१ जून रोजी सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमाचे आयोजन आले आहे. यानिमित्त तयारीचे स्वरूप आणि विविध संस्थांच्या सूचना जाणून घेण्याच्या दृष्टीने आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.

उपायुक्त विनोद जाधव, क्रीडा अधिकारी पीयूष आंबुलकर यांच्यासह आंतरराष्ट्रीय योगपटू धनश्री लेकुरवाळे, माजी उपमहापौर सुनील अग्रवाल, अनिल मोहगावकर, प्रशांत राजूरकर, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय सक्करदरा, जनार्धन स्वामी योगाभ्यासी मंडळ, हौशी नागपूर योगासन असोसिएशन, वाय के. ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, पतंजली, दत्ता मेघे आयुर्वेदिक कॉलेज हिंगणाचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत सर्वप्रथम विनोद जाधव यांनी आयोजनाची माहिती दिली. डॉ. अभिजीत चौधरी यांनी सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेत सर्व संस्थांच्या सूचना जाणून घेतल्या. पावसाळा असल्याने नागरिकांची गैरसोय होऊ नये यासंदर्भात चर्चा करून त्याबाबत कार्यवाहीचे निर्देश दिले. नागरिकांना योगाचे महत्त्व पटावे, त्यांनी योगासाठी पुढे यावे या हेतूने योग मंडळ व संस्थांच्या सहकार्याने दरवर्षी मनपातर्फे जागतिक योग दिवसाच्या निमित्ताने सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

# आदिवासी समाजाच्या समस्यांसंदर्भात एनआयटी प्रशासनासोबत चर्चा



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १० :** आदिवासी समाजासाठी नागपूरमध्ये समाजभवन, लायब्ररी व वसतिगृह उभारणीसाठी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेकडून एनआयटी अध्यक्षांशी सकारात्मक चर्चा करण्यात आली.

गोंड राजे भक्त बुलंद शहा यांनी वसविलेल्या नागपूर शहरात आजही त्यांच्याच समाजाचे -आदिवासी बांधवांचे -स्वत:चे समाज भवन, सेंट्रल लायब्ररी किंवा छात्रावास (होस्टेल) नाही. दरवर्षी विदर्भ आणि महाराष्ट्रातील दुर्गम भागांतून हजारो आदिवासी विद्यार्थी शिक्षणासाठी नागपूर शहरात येतात. मात्र, ९० टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या मागास आहेत. त्यांच्याकडे शिक्षणाची तळमळ असली तरी राहण्याची व्यवस्था, अभ्यास करण्यासाठी शांत जागा, क्रीडा प्रशिक्षणासाठी आवश्यक सुविधा यांचा अभाव आहे. याच अनुषंगाने अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्या शिष्टमंडळाने एनआयटीचे अध्यक्ष संजय मीणा यांच्याशी सविस्तर व सकारात्मक चर्चा केली.प्रतिनिधीमंडळात माजी महापौर माया इवनाते, राष्ट्रीय उपाध्यक्ष विनोद मसराम, महाराष्ट्र प्रदेश सचिव आकाश मडावी, विदर्भ अध्यक्ष संतोष आत्राम, राजे वीरेंद्र शाह, अजय कुंभारे, अजय आत्राम, ललित पवार, त्रिवेश कुमरे आदींचा समावेश होता.

# गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, शिष्यवृत्ती वाटप

## हरिभाऊ नाईकांचा तृतीय स्मृतिदिन सोहळा



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १० :** हरिभाऊ नाईक समाजसेवा प्रतिष्ठानच्या वतीने गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व शिष्यवृत्ती वाटपाचा कार्यक्रम हरिभाऊ नाईक यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त शिक्षक सहकारी बँकेत आयोजित करण्यात आला होता.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी कार्यक्रमाच्या प्रमुखस्थानी होते. हरिभाऊ नाईक हे कामगार चळवळीचे आदर्श नेतृत्व होते; त्यांनी कधीही चुकीचा मार्ग स्वीकारला नाही, अशा शब्दांत नितीन गडकरी यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. प्रतिष्ठानच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक करत, भविष्यातही सर्व प्रकारची मदत देण्याची ग्वाही त्यांनी दिली. यावेळी आमदार सचिन अहीर, आमदार अभिजीत वंजारी, आमदार गजानन लोटे, माजी आमदार एस. क्यू. जमा, अध्यक्ष रत्नाकर चेडगे, सचिव संजय नाईक आदी उपस्थित होते.

## सुंदर आणि आकर्षक चित्रांमुळे विद्यार्थी व पालकांमध्ये उत्साह, शाळांना गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार बनविण्यावर भर

# नागपूर मनपा शाळांतील बोलक्या भिंतींचा विद्यार्थ्यांशी संवाद

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**नागपूर, दि. १० :** मनपा शाळांना गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार करण्याकरिता नागपूर महानगरपालिकेने ठोस पावले उचलली असून, नव्या शैक्षणिक सत्राच्या तयारी लागली आहे. शाळेतील प्रत्येक दिवस विद्यार्थ्यांकरीता सकारात्मक आणि सुंदर वातावरण तयार होईल याकरिता शाळेच्या भिंतीवर सुंदर आणि आकर्षक चित्रे काढण्यात आली आहे. यामुळे या भिंती जूण काही बोलत आहेत असे वाटत आहे. बोलक्या भिंतीचा हा उपक्रम विद्यार्थी व पालकांना आकर्षित करीत आहेत.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी मार्गदर्शनानुसार अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्या नेतृत्त्वात आणि शिक्षणाधिकारी साधना सयाम यांच्या मार्गदर्शनाखाली शाळांना गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार बनविण्यावर भर दिला जात आहे. दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण यश मिळविल्याने मनपा शाळेबाबत विद्यार्थी आणि पालकांमध्ये आशा जागृत झाली आहे. स्व:त अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांनी पालकांशी संवाद साधत मनपा शाळेत आपल्या पाल्यांचे प्रवेश करण्यासाठी प्रेरित केले. यावर्षी जूनच्या अखेरीस नवीन मनपाच्या शैक्षणिक सत्र सुरु होणार आहे. याकरीता शाळेत जोरदार तयारी सुरू आहे. शहराच्या वेगवेगळ्या भागातील मनपाच्या पाच शाळांना विद्यार्थ्यांसाठी अधिक आकर्षक आणि प्रेरणादायी बनवण्याच्या उद्देशाने भिंतींवर रंगीत चित्र काढण्यात आली आहेत. मद हॅप्पी स्कूल प्रोजेक्टमअंतर्गत डब्ल्यूसीएल सीएसआर निधी अंतर्गत जिचकार फाऊंडेशनच्या माध्यमातून मनपा शाळेतील शैक्षणिक वातावरण सुधारण्यात आले आहे. चालू शैक्षणिक वर्षासाठी मनपाच्या पाच शाळांचे चित्र बदलविण्यात आले आहे. शाळेमधील विविध दुरुस्ती कामासह, रंगरंगोटी विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवसापासून शाळा आकर्षक वाटावी, यासाठी शाळेच्या भिंती बोलक्या करण्यात आल्या आहेत. शाळेत काही ठिकाणी विज्ञानाच्या शोधाचे चित्र आहेत, तर काही ठिकाणी विमान, गणित, विज्ञान, खगोल, कार्टून, जंगल, वन्यजीव आणि अक्षरज्ञानाने सजवलेली चित्रे काढण्यात आली आहे. बोलक्या भिंतींमुळे शाळेचे वातावरण अधिक आकर्षक, उत्साहवर्धक, ज्ञानवर्धक आणि मनोरंजनात्मक बनवून विद्यार्थ्यांना नवीन शिकण्याची संधी उपलब्ध करणे आणि विद्यार्थ्यांची गळती थांबविणे हा या मागे उद्देश आहे. शिवाय काही शाळांचे मैदानात सुद्धा दुरुस्ती करण्यात आले आहेत. याशिवाय नवीन सत्रात विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उत्साह अधिक कायम रहावा याकरीता वर्गखोल्यांची स्वच्छता, विद्यार्थ्यांकरीता बसण्याची चांगली व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात आहे. शाळांमधील हे रंग मुलांच्या मनात शिक्षणाबद्दल आवड निर्माण करण्यास उपयुक्त ठरणार आहे. अशा प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड निर्माण झाली आहे. तसेच शिक्षकांनाही उत्तमोत्तम शिक्षण देण्यासाठी अधिक समक्ष बनविण्यास हातभार लावले आहे.

### स्मार्ट क्लासेस

**नवीन वर्षाच्या नवीन सत्रात मनपा शाळेतील विद्यार्थ्यांकरीता नवीन गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे. काही शाळांमध्ये डिजिटल स्मार्ट क्लासेस सुरू होत आहेत. काही ठिकाणी कृती-आधारित शिक्षण पद्धतीवर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. विद्यार्थी फक्त पाठ्यपस्तकांपुरते मयार्दीत राहू नये याकरीता शाळेत क्रीडा, कला आणि हस्तकला, संगीत आणि ग्रंथालयाच्या वापरालाही प्रोत्साहन दिले जात आहे.**

# थोडक्यात

## घरफोडीत मुद्देमाल लंपास

**नागपूर :** वाठोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गजानन हाऊसिंग सोसायटीत दोन शेजारी घरे फोडून अज्ञात चोरट्यांनी रोख रक्कम व सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह एकूण ३ लाख २९ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली. ही घरफोडी शनिवारी (दि. ७) जून २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान झाली. फिर्यादी अमित भगवानजी सोमनाथे यांच्या घरातून २ लाख ३४ हजार, तर त्यांचे शेजारी दीपक नथ्थुजी कुथे यांच्या घरातून ९५ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला. दोन्ही कुटुंबे बाहेर गेली असताना, चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. याप्रकरणी वाठोडा पोलिसांनी भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला आहे.

## कुष्ठरोगावर नि:शुल्क उपचार

**नागपूर :** शरीरावर पिवळा, लालसर डाग किंवा चट्टा, अंगावरील गाठी, कानाच्या जाड झालेल्या पाळ्या, यासारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. ते कुष्ठरोग असू शकते. त्यामुळे वेळीच निदान होण्यासाठी तत्काळ मनपा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात नि:शुल्क उपचार करून घ्यावे, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेद्वारे करण्यात आले आहे. आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात कुष्ठरोग जनजागृती उपक्रमाअंतर्गत जनजागृती कार्यवाही केली जात आहे. कुष्ठरोग हा आजार एम. लेप्रा जिवाणूच्या संक्रमणाने होतो. ते त्वचा आणि मज्जासंस्थेवर आघात करत असल्याने शरीरावर चट्टे दिसतात वेळेवर उपचार न झाल्यास विकृती होण्याची शक्यता असते. वेळेत कुष्ठरोगाचे निदान झाल्यास योग्य उपचाराने रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो, असे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी म्हटले आहे.

## नागपुरात पुन्हा ‘हिट अँड रन’

**नागपूर:** बेलतरोडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चिंचभवन चौकात भरधाव अज्ञात कारने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एकाचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. ही ‘हिट अँड रन’ची घटना रविवारी (दि. ८) जून २०२५ रोजी पहाटे सव्वातीन वाजताच्या सुमारास घडली. मृतक योगेश तुळशीराम बोपचे व जखमी भोजेंद्र खोब्रागडे हे एम्स रुग्णालयातून नातेवाईकांना भेटून परत येत होते. यावेळी निष्काळजीपणे चालवलेल्या कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. अपघातानंतर चालक कार घटनास्थळी सोडून पळून गेला. जखमींना एम्स रुग्णालयात दाखल केले असता, उपचारादरम्यान योगेश बोपचे यांचा मृत्यू झाला. लोकेश तुळशीराम बोपचे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६ चा समावेश करण्यात आला आहे.






अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, बुधवार, दि. ११ जून २०२५







# मुख्यमंत्री साहेब, एक तरी मोठा उद्योग द्या!

## गवगवा कशासाठी; जिल्हा मागे पडला कसा?

। रवी देशमुख ।




**अकोला, दि. १०:** मुख्यमंत्री साहेब, कोटीच्या कोटी उड्डाणे घेण्यापेक्षा अकोला जिल्ह्याला काय मिळाले नाही, हे महत्त्वाचे आहे. जिल्ह्यात एकही मोठा उद्योग नसल्याने बेरोजगारी वाढली आहे. विदर्भात नागपूर आणि अमरावती जिल्ह्याच्या तुलनेत अकोला जिल्हा खूप मागे पडला आहे. येथील औद्योगिक वसाहती भकास झाल्या आहेत. विमानतळाचा विस्तार कित्येक वर्षांपासून रखडलेला आहे. जिल्ह्यातील बहुतांश विकास कामांचा दर्जा अतिशय निकृष्ट असून, जिल्ह्याला कुणीही वाली नाही, अशी अवस्था झाली आहे. तुमच्या हस्ते जिल्ह्यातील विविध विकास कामांचा उद्घाटन सोहळा पार पडणार आहे; पण यामध्ये कुठलाही नाविन्यपूर्ण प्रकल्प दिसत नाही. जिल्ह्याला एखादा असा उद्योग द्या की, त्यामुळे जिल्ह्याचे कल्याण होईल.

पूर्व विदर्भाच्या तुलनेत पश्चिम विदर्भाला सावत्रपणाची वागणूक दिली जात असल्याचे वास्तव आहे. त्यातही पश्चिम विदर्भात अमरावती जिल्हा व अमरावती शहर अकोला जिल्ह्याच्या व अकोला शहराच्या तुलनेत अधिक पुढे गेले आहे. अमरावतीच्या तुलनेत भौगोलिकदृष्ट्या अकोला शहर अतिशय सोयीचे असताना अकोला औद्योगिक वसाहत भकास पडली आहे. अकोला जिल्हा कॉटन सिटी म्हणून देशात प्रसिद्ध असताना अमरावती जिल्ह्यात टेक्सटाइल इंडस्ट्रीज विकसित झाल्या आहेत. केंद्र शासनाने अमरावती शहराला स्मार्ट सिटी योजनेत समाविष्ट करून अकोला शहराची उपेक्षा केली आहे.

शिवनी विमानतळाचे विस्तारीकरणाचे भिजत घोंगडे कायम आहे. नुसते चॉकलेट देण्याचे काम सुरू आहे. अमरावती विमानतळावर नागरी विमानसेवा सुरू झाली आहे. राजकीय इच्छाशक्तीअभावी जिल्ह्याचा विकास रखडला असल्याची परिस्थिती आहे. जिल्ह्यात एकही मोठा उद्योग नसून, युवकांना रोजगारासाठी जिल्ह्याबाहेर स्थलांतर करण्याची वेळ आली आहे. जिल्ह्यात झालेल्या बहुतांश रस्त्यांचे पितळ उघडे पडले आहे. अकोट ते अकोला रस्त्याचे काम अतिशय संथगतीने झाले, काम पूर्ण होण्यापूर्वीच या रस्त्याचा भिकार दर्जा समोर आला. अकोला शहरातील बहुतांश मुख्य काँक्रिट रस्त्यांची निकृष्ट बनावट उघडी पडली आहे. कित्येक वर्षांनंतर एक मोठा उड्डाणपुलाचा प्रकल्प झाला; पण या प्रकल्पानेसुद्धा निराशा केली. नियोजन न करता हे काम करण्यात आल्याचे आता समोर येऊ लागले आहे. उड्डाणपुलाच्या खाली मुख्य जलवाहिनी कुठल्या तर्काने दाबण्यात आली, ही समजण्यापलीकडची बाब आहे. दरम्यान, जलवाहिनी फुटल्याने उड्डाणपूल जवळपास ६ महिने बंद होता. उड्डाणपूल बांधताना सूक्ष्म नियोजन न केल्याने अकोलेकरांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. शहरातील ''अंडरपास'' विकास कसा नसावा, याचे सर्वोत्तम उदाहरण आहे. कुठल्या डिझाईननुसार हे काम करण्यात आले, याचा जाब विचारला जात नाही, जिल्ह्यातील सत्ताधारी केवळ आपल्या फायद्यासाठी काम करीत आहेत. जिल्ह्याचा औद्योगिक विकास व्हावा, असे कुणालाही वाटत नाही. अकोला विमानतळाच्या मुद्द्यावरून आपली राजकीय कुवत कुठपर्यंत आहे, हे जिल्हावासियांना दिसून आले.

### विस्तारीकरणाचे नुसते चॉकलेट

शिवनी विमानतळाचे विस्तारीकरणाचे भिजत घोंगडे कायम आहे. नुसते चॉकलेट देण्याचे काम सुरू आहे. अमरावती विमानतळावर नागरी विमानसेवा सुरू झाली आहे. राजकीय इच्छाशक्ती प्रबळ नसलेल्या जिल्ह्याचे काय होते, हे समोर येऊ लागले आहे. यावर जिल्ह्याच्या सर्वपक्षीय नेत्यांनी मंथन करण्याची गरज आहे.

### 'सुपरस्पेशालिटी' केवळ नावालाच

सुपरस्पेशालिटी रुग्णालयाची इमारत झाली म्हणजे उपचार सुरू झाले, असे होत नाही. रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू झाले नाही पाहिजे, यासाठी राजकीय शक्ती खर्ची घातली जात आहे. जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना योग्य उपचार मिळावे, असे वाटत नसल्याने उपचाराची सुपर स्पेशालिटी केवळ नावालाच उरली आहे.

अमरावती जिल्ह्याच्या नावाने बोटे मोडून काहीही होणार नाही. अमरावती जिल्ह्यातील राजकीय वातावरण अधिक परिपक्व असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. अमरावती शहरातून सुरू झालेल्या नवीन रेल्वे, अकोल्याहून अमरावती जिल्ह्यात नेण्यात आलेली इंटरसिटी एक्स्प्रेस, बडनेरा स्थानकावर महत्त्वाच्या रेल्वे गाड्यांचा केलेला स्टॉपेज, अशी अनेक उदाहरणे देता येतील. आपल्या अकोला रेल्वे स्थानकावर मात्र या रेल्वे गाड्या थांबत नाहीत; ही आपली राजकीय उपलब्धी आहे. अमरावती विद्यापीठाचे केंद्र बुलडाणा व वाशिम जिल्ह्यातील महाविद्यालयांना अंतराच्या दृष्टीने गैरसोईचे असतानाही अमरावती विद्यापीठाच्या उपकेंद्राचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. अकोल्यात सुपरस्पेशालिटी रुग्णालय सुरू झाले, तरी अजूनही रुग्णांवर प्रभावीपणे उपचार होत नसल्याचे वास्तव आहे. अकोला महापालिका क्षेत्रात भुयारी गटार योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील कामांना संपूर्णपणे मंजुरी मिळाली नसून, या कामात होणारी रस्त्यांची तोडफोड व त्यासाठी लागणारा निधी अजूनही उपलब्ध झालेला नाही. अकोला शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी अल्प निधी मिळाल्याने हे कामही अर्धवट होणार आहे. शहरातील इलेक्ट्रिक शहर बस डेपो व चार्जिंग स्टेशनचे काम अतिशय संथगतीने सुरू आहे. बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरादेवी तीर्थक्षेत्रासाठी अतिशय महत्त्वाच्या असलेल्या अकोला ते महान मार्गाचे चौपदरीकरण करणे आवश्यक असताना केवळ या मार्गाची तीन मीटर रुंदी वाढविण्यात येत आहे. स्थानिक प्रश्न मांडण्यात राजकीय अपयश येत असल्याचा परिणाम जिल्ह्याच्या विकासावर होत असून, केवळ कोटीच्या कोटी उड्डाणे घेऊन काहीही मिळणार नाही. सर्वच जिल्ह्यात असे प्रकल्प होत असतात. पायाभूत सुविधांचा एवढा गवगवा करणे कितपत योग्य आहे, असा सवाल जिल्ह्यातील नागरिक उपस्थित करीत आहेत.

# मुख्यमंत्री फडणवीसांची आज धडाडणार तोफ!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १० :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राजेश्वर नगरीमध्ये येत असल्यामुळे अकोला शहरातील २२ किलोमीटरचा रस्ता भाजपामय करण्यात आला असून, ठिकठिकाणी होर्डिंग्ज, बॅनर्स तसेच भाजपाचे झेंडे लावून त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली आहे. या सभेतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरोधी पक्षांवर काय? निशाना साधतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

अकोला जिल्ह्याच्या विकासाला केंद्रबिंदू ठरणारा व २०२५ च्या ऐतिहासिक सभेसाठी भाजपा कार्यकर्त्यांनी गावपातळी ते शहरापर्यंत जोरदार तयारी केली असून, मातृशक्ती, युवाशक्ती, समाजातील विविध घटकांना निमंत्रण देऊन अकोला क्रिकेट क्लब मैदानावर दुपारी १ वाजता आयोजित या ऐतिहासिक सभेमध्ये उपस्थित राहण्याची विनंती केली आहे. ही विकास संवाद सभा भव्य-दिव्य व्हावी व अकोला महानगरपालिका, जिल्हा परिषदेत विजयाचा शंखनाद या विकास संवाद सभेच्या माध्यमातून करण्याचा संकल्प भारतीय जनता पक्षाने केला आहे. भाजपाचे प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, महानगराध्यक्ष जयंत मसने, जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, विजय अग्रवाल, किशोर पाटील यांच्या मार्गदर्शनात भाजपाचे वेगवेगळ्या आघाडीचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत. विकासाचा नवीन आयाम महायुतीने दिला असून, सर्वस्पर्शी विकास करण्याचा संकल्प महायुतीचा असून, लाडक्या बहिणींना तसेच बांधकाम क्षेत्रातील कामगारांना न्याय देण्याचे काम युती सरकारने केले आहे. ग्रामीण आणि शहरी भागातून आपापल्या वेगवेगळ्या वेशभूषेमध्ये संपूर्ण अकोला शहरातील नागरिक वाजत गाजत या सभेत उपस्थित राहणार आहेत.

नामदार फडणवीस यांच्यासोबत भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्राचे कार्यकारी अध्यक्ष माजी मंत्री आमदार रवींद्र चव्हाण तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज सातारा गादीचे राजे शिवेंद्र सिंग भोसले या बैठकीत सभेमध्ये उपस्थित राहणार आहेत.

शिवनी विमानतळ बाळापूर, नाका, अशोक वाटिका ते रेल्वे स्टेशन झेंडे लावण्यात आले आहेत, तसेच चार ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली असून, डॉक्टरांची आरोग्य सेवा डॉक्टर प्रवीण अग्रवाल यांच्या नेतृत्वात डॉक्टरांची चमू सज्ज आहे. जलसेवासोबत विकास संवाद सभेमध्ये वेगवेगळ्या समाज घटकांसाठी विशेष व्यवस्था, २२ वेगवेगळे गाले, ३५००० खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा प्रसिद्ध प्रमुख गिरीश जोशी यांनी दिली.

# जिल्ह्यात १३ हजारांवर घरकुलांना मंजुरीची प्रक्रिया सुरू



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत अकोला जिल्ह्यात नव्याने मिळालेल्या १३ हजार ३६९ घरकुलांना पंचायत समिती स्तरावर मंजुरीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील एकही कुटुंब हक्काच्या निवाऱ्यापासून वंचित राहू नये, यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहत. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्व कच्चे घर व बेघर पात्र लाभार्थ्यांनी ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मार्फत किंवा आपण स्वतः ही घरकुलाकरिता सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. या योजनेंतर्गत शासनाकडून शुक्रवारी (ता.६) १३ हजार ३६९ घरकुलांचे नव्याने उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. शासनाकडून नव्याने घरकुलांचे उद्दिष्ट मिळाल्यानंतर ग्रामपंचायतकडून लाभार्थ्यांची कागदपत्रांची पडताळणी करून पंचायत समिती स्तरावर मंजुरीची प्रक्रिया करण्यात येत आहे.

### कागदपत्रांची पडताळणी – सीईओ मनोज जाधव

शासनाकडून जिल्ह्यात नव्याने १३ हजार ३६९ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. सद्यस्थितीत पंचायत समिती स्तरावर मंजुरीची प्रक्रिया सुरू असून, आठवड्यात ही प्रक्रिया पूर्ण होणार असल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव यांनी

## हाच पती मिळू दे...!



**अकोला : वटपौर्णिमेनिमित्त मंगळवारी महिलांनी वटवृक्षाच्या झाडाचे पूजन करून आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.** (छाया. संजय ताथुरकर)

# ऊर्जामंत्र्यांसह अकोला महावितरणच्या दहा अधिकाऱ्यांना कायदेशीर नोटीस

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** शहरातील जुने शहर भागात वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यावर अखेर कायदेशीर प्रक्रिया सुरू झाली आहे. ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महावितरणच्या १० अधिकाऱ्यांना कायदेशीर नोटीस बजावण्यात आली असून, ही जनहित याचिकेपूर्वीची पहिली पायरी आहे. अकोला येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार प्रसन्न जकाते यांच्यावतीने ॲड. सौरभ भेंडे यांनी ही नोटीस पाठविली आहे. गेल्या तीन वर्षांपासून जुने शहर भागात वीज पुरवठा सातत्याने खंडित होत आहे. यावर उपाययोजना न झाल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर थेट जबाबदारी निश्चित करत न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यापूर्वी ही कायदेशीर नोटीस देण्यात आली. महावितरणकडून साहित्य, मनुष्यबळ आणि देखभाल अभावाचे कारण देण्यात येत असले तरी यामागे दुर्लक्ष आणि हलगर्जीपणा असल्याचा आरोप आहे. या याचिकेत दोषी अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची आणि नागरिकांना नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात येणार आहे. विद्युत ग्राहक अधिकार नियम २०२० अंतर्गत ही कारवाई होत असून, अकोल्यातील विजेच्या समस्येवर आता कायदेशीर लढा उभारला जाणार आहे.

# सार्वजनिक ठिकाणी तंबाखू घोटाल तर खबरदार!

## जिल्ह्यात ३६८ कारवाया, ६७ हजारांचा दंड वसूल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १० :** तंबाखू विक्री व सेवनावर निर्बंध घालणाऱ्या कोटपा कायद्यांतर्गत अकोला जिल्ह्यात पाच महिन्यांत ठोस कारवाई करण्यात आली आहे. १ जानेवारी २०२५ ते ३१ मे २०२५ या कालावधीत जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, पोलीस विभाग आणि स्वच्छता विभाग यांनी संयुक्तपणे केलेल्या कारवाईत एकूण ३६८ व्यक्तींवर कारवाई करीत ६७,२२५ रुपयांचा दंड वसूल केला आहे. ही माहिती कोटपा जिल्हा सल्लागार डॉ. प्रीती कोगदे यांनी दिली.

कोटपा म्हणजे सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने (नियमन व व्यापार प्रतिबंध) अधिनियम-२००३. या कायद्यानुसार सार्वजनिक ठिकाणी तंबाखू सेवन, शैक्षणिक व आरोग्य संस्थांच्या परिसरात तंबाखू विक्री, तसेच १८ वर्षांखालील मुलांना तंबाखू विक्रीवर बंदी आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात आली. या संयुक्त कारवाई अंतर्गत शहरातील महत्त्वाच्या भागांमध्ये आणि ग्रामीण परिसरात तंबाखू विक्री करणाऱ्या ठिकाणी छापे टाकण्यात आले. या दरम्यान अनेक दुकानदार व ग्राहकांकडून नियमभंगाच्या प्रकरणांवर दंड वसूल करण्यात आला. या मोहिमेचे मार्गदर्शन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तरंगातुषार वारे करीत असून, त्यांच्याच अधिपत्याखाली कोटपा विभाग कार्यरत आहे. स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा, आरोग्य विभाग आणि स्वच्छता विभाग यांच्यात समन्वय साधून ही मोहीम राबवली जात आहे.

डॉ. कोगदे म्हणाल्या की, अलीकडे तरुणांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये तंबाखूच्या सेवनाचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी जनजागृती मोहीम राबवून तंबाखूविरोधात जनतेला जागरूक करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तंबाखूविरोधी अभियान आणखी प्रभावी करण्यासाठी येत्या काळात अधिक व्यापक पातळीवर तपासणी आणि जनजागृती उपक्रम राबविले जाणार आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

### अन्न व औषध प्रशासन गायबच!

तंबाखूविरोधी संयुक्त कारवायांमध्ये जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, पोलीस आणि स्वच्छता विभाग सक्रिय असताना अन्न व औषध प्रशासन विभागाची कोणतीही कारवाई नोंदविली गेलेली नाही. विक्रीस बंदी असलेल्या तंबाखूजन्य पदार्थांवर कारवाई करणे ही त्यांच्या जबाबदारीत येते; मात्र त्यांची अनुपस्थिती प्रशासकीय हलगर्जीपणाकडे निर्देश करते.

# वटपौर्णिमा म्हणजे सौभाग्याचा उत्सव!

## परंपरेचा गंध जपणाऱ्या आजींच्या आठवणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १० :** आमच्या वेळेस वटपौर्णिमा म्हणजे केवळ पूजाच नव्हे तर एक उत्सव असायचा. वडाच्या झाडाजवळ दिवसभर महिला गोळा व्हायच्या. उटणं, गंध, रांगोळ्या आणि मंगलाष्टकांनी वातावरण भारलेलं असायचं, असं ७० वर्षीय कुमुदिनी देशमुख आजीबाई भावुकतेने सांगतात.

त्या काळी महिलांनी स्वतः उटणं बनवून, हार घालायची स्पर्धा लावून, ५१ वेळा झाडाभोवती फेऱ्या मारून पूजा केली जायची. सौंदर्य, साड्या, ओवाळणी, आणि घरचा फराळ याचं समाधान वेगळंच होतं.

मोबाइल, सोशल मीडियाचा गोंधळ नव्हता; पण सणातली आत्मियता होती. आजच्या तरुणींना सल्ला देताना त्या म्हणाल्या की, सण साजरे करताना त्यामागचं धार्मिक आणि भावनिक महत्त्व समजून घ्या. परंपरा केवळ सौभाग्यासाठी नाही, तर कृतज्ञतेसाठी साजऱ्या करा.



"छत्रपती शिवाजीनगरमधील हे वडाचं झाड आमच्यासाठी श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे. १०० वर्षांपासून महिलांनी येथे वटपौर्णिमेला सात फेऱ्या घेऊन पूजा केली जाते. बदलत्या काळातही ही परंपरा तशीच टिकून आहे. त्यामुळे परिसरात एक वेगळंच धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरण तयार झालं आहे.

**- संध्या चंद्रकांत साहुजी**



"राजपूत समाजातील महिला वडाच्या वृक्षाला सात फेऱ्या मारून ओटी भरतात व कलावा बांधतात, ही एक गौरवशाली परंपरा आहे. यामागे नातेसंबंधातील स्थैर्य, दीर्घायुष्य आणि कुटुंबाच्या कल्याणाची श्रद्धा आहे. ही परंपरा आपल्या संस्कृतीतील नारीशक्तीचे प्रतीक असून, सामाजिक एकतेचा सुंदर संदेश देणारी आहे.

**- कल्पना उदयसिंग चौव्हान**

## थोडक्यात

### रात्रीच्या वेळी विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्याची मागणी

**खामगाव :** स्थानिक सकळकळे ले आऊट, वरणगांवकर ले आऊट, सावजी ले आऊट, उदासी ले आऊट व सुटाळा खुर्द आदी भागातील विद्युत पुरवठा वारंवार खंडीत होत आहे. त्याामुळे या भागातील नागरिकांनी आज ५० जून २५ रोजी सहाय्यक अभियंता बावनकर यांना निवेदन दिले. त्याामध्ये नमूद केले आहे की, सुटाळा खुर्द फिडरवरील विद्युत पुरवठा रात्रीच्या वेळी वारंवार खंडित होत आहे. त्याामुळे अबाल वृध्द नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तरी रात्रीच्या वेळी विद्युत पुरवठा सुरळीत ठेवावा, अशी मागणी निवेदनात केली आहे निवेदन देतांना रमेश घाडगे, महादेव राजुरकर, गणेश घोराळे, कपिल इंगळे, बंटी फुंडकर, निखिल सरप, गणेश तायडे, हरिष अहेरकर, आकाश सनासे, पिंटु देशमुख, थोरात, देशमुख, संतोष पाटील, निवृत्ती पाटील, वैभव मानकर, समर्थ बोदडे, निलेश दुर्गे, वेरुळकर सह ग्रामस्थ उपस्थित होते

### डॉ रवींद्र सुरुशे बीडीओ यांची गावागावात भेट

**शेगाव :** शेगाव पंचायत समितीच्या संवर्ग विकास अधिकारी पदाची सूत्रे डॉक्टर रवींद्र सुरुशे यांच्या हाती नुकतीच आली त्याांनी आपला प्रदभार स्वीकारताच ग्रामीण भागातील ग्रामपंचायत ला भेटी देण्यास सुरुवात केली आहे शेगाव तालुक्याचा सर्वांगीण विकासासाठी व पारदर्शी व गतिमान लोकाभिमुख प्रशासन निर्माण करणे या अनुषंगाने शेती आरोग्य शिक्षण आणि ग्रामविकास याच्यावर भर देण्यासाठी डॉक्टर रवींद्र सुरोशे यांनी दिनांक ९/६/ २०२५ रोजी मनसगाव भोनगाव चिंचखेड माटरगाव खुर्द तसेच भोनगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र यांना भेटी देऊन आवश्यक सूचना दिल्या विविध विकास कामे वेळेवर पूर्ण करणे घरकुल बांधकाम पूर्ण करणे कर वसुली करणे टीसीएल पावडर चा नियमित वापर करणे अशा प्रकारचे सूचना दिल्या यावेळी विस्तार अधिकारी श्री फुटाणे, इंगोले,पांडे तसेच पंचायत समितीचे कर्मचारी सह ग्रामीण भागात दौरा केला आहे.

### जिल्हा पोलीस अधीक्षक पदाची कॅटमध्ये सुनावणी १२ जूनला

**खामगाव :** जिल्हा पोलिस अधिक्षक विश्व पानसरे यांची २२ मे २५ रोजी अमरावती येथे बदली झाल्यानंतर त्यांचे जागी नागपुर येथुन निलेश तांबे रुजु झाले आहेत. परंतु काही कारण नसतांना बदली झाल्यामुळे विश्व पानसरे यांनी केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणात (कॅट) धाव घेऊन बदली विरोधात प्रकरण दाखल केले होते. यावर कॅटने बदलीला स्थगीती दिली होती. यामुळे जिपोअ अधिक्षक पदावर २ अधिकाऱ्यांनी हक्क सांगीतल्यामुळे गोंधळाचे वातावरण निर्माण झालेले असून चर्चेचा विषय बनला आहे. याप्रकरणी कॅटमध्ये ९ जून २५ रोजी सुनावणी होणार होती. मात्र आता १२ जून रोजी सुनावणी होणार आहे.

# शिक्षण विभागाला आली जाग ; ले-आउट टाकायला आले अभियंता

## आंदोलनाच्या बातम्या प्रकाशित होताच शिक्षण विभाग म्हणतो त्या वर्ग खोल्या मंजूर आहेत

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**डोणगाव दि. १०**

डोणगाव येथील जिल्हा परिषद उर्दू शाळा मधे ११ तुकड्या असून ८ वर्ग खोल्या आहेत त्याला पाहता ३ वर्ग खोल्या नसल्याने मुलांना खुल्या जागेत बसून शिक्षण घ्यावे लागत असून यावर पावसाळ्या मधे वाटरप्रूफ टेन्टची मागणी दै.अजिंक्य भारत वृत्तपत्रात करताच शिक्षण विभागाने त्या वर्ग खोल्या मंजूर केल्या असून एका वर्ग खोलीचे बांधकाम साठी ले आउट टाकले आहे. मात्र प्रवेश उत्सव सुरू असतांना वर्ग खोल्या कश्या होणार ? हा प्रश्नच आहे..

मेहकर तालुक्यातील सर्वात मोठी जिल्हा परिषद उर्दू शाळा डोणगाव ही असून ३४७ विध्यार्थी असून येथे ११ तुकडया असून तीन वर्ग खोल्या कमी आहेत त्याला पाहता १५ फेब्रुवरी २०२४ रोजी आंदोलन केल्या नंतर शिक्षण विभागाने २० सप्टेंबर २०२४



रोजी वर्ग खोली बांधकाम साठी मंजुरात दिली होती. मंजुरात मिळून देखील बांधकाम करण्यात आलेले नसल्याने विध्यार्थीयांना खुल्या जागेत झाडा खाली बसून शिक्षण घ्यावे लागत असल्यामुळे पालकांनी आंदोलक पवित्रा घेत वर्ग खोल्या नको पावसाळ्या मधे शिक्षण घेण्यासाठी वॉटर प्रूफ टेन्ट देण्याची मागणी केली.दै.अजिंक्य भारत वृत्तात

अजिंक्य भारत इम्पॅक्ट

याचे वृत्त प्रकाशित होताच झोपलेले शिक्षण विभाग जागे झाले. एका वर्ग खोलीच्या बांधकामाचे ले आउट टाकण्या साठी जिल्हा परिषद बांधकाम



वर्गखोली नसल्यामुळे चिमुकल्यांचे हाल !

वर्ग भरतो झाडाखाली,शिक्षण विभागाचे दुर्लक्ष

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
डोणगाव दि.९

येथील जिल्हा परिषद शाळेमधे ११ तुकड्या असून ८ वर्ग खोल्या आहेत. ३ वर्गखोल्या कमी असल्यामुळे विध्यार्थ्यांना उघड्यावर झाडाखाली बसून शिक्षण घ्यावे लागते. त्यामुळे नवीन शिक्षण सत्र सुरू होण्यापूर्वी वर्ग खोल्यांची सुव्यवस्था करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

मेहकर तालुक्यातील सर्वात मोठी डोणगाव येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेमध्ये ३४७ च्या जवळपास विध्यार्थी असून ११ तुकड्या आहेत. सध्या मात्र ८ तुकड्या आहेत. त्याला पाहता ३ वर्ग हे उघड्यावर झाडाखाली किंवा एकाच वर्गात

विधानसभेत तारांकित प्रश्न मांडला होता. तेव्हा शिक्षण विभागाने लगबग करत ३ वर्ग खोल्या मंजूर केल्या. मात्र पुढे त्याचे काय झाले ते कळलेच नाही. अश्यात वर्ग खोल्या नसल्याने हिवाळा व उन्हाळा या दोन ऋतूत झाडाखाली खुल्या परिसरात वर्ग भरवण्यात येतात.

अश्यात पावसाळ्या मध्ये उघड्यावर झाडाखाली वर्ग भरवण्यात येऊ शकणार नाही. त्याला पाहता पावसाळ्या मध्ये खुल्या मध्ये वर्ग भरवण्यासाठी वॉटर प्रूफ टेन्ट द्यावे किंवा बुलढाणा जिल्हा परिषद मध्ये शाळा भरवण्या साठी डोणगाव ते बुलढाणा जाणे येणे करण्यासाठी स्कूल बसची व्यवस्था करण्यात यावी. यासाठी एक निवेदन शिक्षण

विभागाचे शाखा अभियंता निलेश दहातोंडे, जिल्हा परिषद बांधकाम विभाग अभियंता शुभम वायाळ यांना पाठवून वर्ग खोलीचे बांधकाम सुरु करण्याचा देखावा करायला लावला.

शिक्षण विभागाने आंदोलकास दिलेल्या पत्रा नुसार वर्ग खोल्या मंजूर आहेत. त्यात २० सप्टेंबर २०२४ रोजी एका वर्ग खोलीला मंजुरात मिळाली होती तर जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ मधे वर्ग खोल्यांचा समावेश करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात कामाला सुरवात झालीच नाही. अश्यात पुन्हा तेच होणार असल्यामुळे वर्ग खोली नको पावसाळ्या साठी वॉटर प्रूफ टेन्ट द्या अशी मागणी पालक करीत आहेत. जे बांधकाम मागील एक ते दीड वर्षात होऊ शकले नाही ते आता काय करणार असा प्रश्न निर्माण होतं आहे.

## छ.शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीराचे आयोजन

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**सिं.राजा दि.१०**

महसूल विभागाशी संबंधित नागरिकांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी सिंदखेडराजा तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार आणि जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्या आदेशानुसार, हे शिबीर मंडळ स्तरावर आयोजित करण्यात येत आहे. या शिबिराचा मुख्य उद्देश महसूल प्रशासनाला अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान बनवणे हा आहे.

या शिबिरात पालकत्व स्वीकारलेल्या गावांमध्ये शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी विशेष प्रयत केले जाणार आहेत. उपविभागीय अधिकारी संजय खडसे आणि तहसीलदार अजित दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली, मलकापूर पांग्रा मंडळाच्या वतीने मंडळ स्तरावर मलकापूर पांग्रा येथील पंडित नेहरू विद्यालय शाळेत १३ जून २०२५ रोजी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात सर्व संबंधित विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित राहणार असून, नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या महसूल संबंधित समस्यांचे निराकरण करून घ्यावे, तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिरात नागरिकांना खालील प्रमुख सेवा आणि योजनांचा लाभ घेता येईल. तसेच पंचायत समिती, कृषी विभाग, आरोग्य विभाग, महावितरण विभाग इत्यादी विभागांच्या विविध योजनांचा लाभ देखील या शिबिरात उपलब्ध असणार आहे.

तरी, मलकापूर पांग्रा मंडळातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या महत्त्वपूर्ण शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रेमानंद वानखेडे (मंडळ अधिकारी, मलकापूर पांग्रा), प्रभाकर बावस्कर, निलेश किंगरे भाग २जयसिग राठोड , श्रीकृष्ण निकम पंकज देशमख ग्राम महसूल अधिकारी यांनी केले आहे.

## प्रा. रवींद्र चाट राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**लाखनवाडा दि.१०**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथे गरुड फाउंडेशन व युवा पत्रकार संघाच्या वतीने आयोजित कार्यक्रमांमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालय लाखनवाडा चे प्राचार्य प्राध्यापक रवींद्र गुलाबराव चाटे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्राध्यापक चाटे सर हे गेल्या दहा ते बारा वर्षांपासून शिक्षण क्षेत्रामध्ये काम करतात चाटे सर सर यांचे मूळ गाव सिंदखेडराजा तालुक्यातील दरेगाव लहानपणापासूनच समाजसेवा चा वसा हाती घेतलेला व्यक्ती म्हणून त्यांची समाजामध्ये ओळख आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये उतरल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास वर भर देणे पालकांच्या नेहमी संपर्कात राहणे त्यांच्या या स्वभावामुळे त्यांची जनमानसात कमी दिवसात ओळख निर्माण झाली. लाखनवाडा परिसरामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांच्या ते परिचित आहेत परिसरामध्ये कोणताही सामाजिक उपक्रम असेल समाज उपयोगी कार्यक्रम असेल तर त्याांचा हिरारीने



त्यामध्ये सहभाग असतो.

महाराष्ट्रभर त्यांची व्याख्याता म्हणून ख्याती आहे तसेच ते कवी आणि लेखक सुद्धा आहेत. या अगोदर त्यांना उत्कृष्ट निवेदक म्हणून कोकण विभागाने त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. त्यांच्याच शैक्षणिक कार्याची गरुड फाउंडेशन व युवा पत्रकार अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी यांनी दखल घेऊन त्याांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे. अहिल्या नगरचे खासदार निलेश जी लंके साहेब यांच्या हस्ते तो प्रदान करण्यात आला. त्याांच्या या पुरस्काराने त्यांच्या मित्र परिवारामध्ये विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पिंपळनेर,अंभोरा गावासाठी कोतवालाची नियुक्ती करा : जय शिवसंग्राम संघटनेची मागणी

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**दे.राजा दि.१०**

तालुक्यातील पिंपळनेर आणि अंभोरा या गावासाठी कोतवालाची जागा रिक्त असल्याने ग्रामस्थांना अडचणी निर्माण होत आहे प्रशासनाने तातडीने या दोन्ही गावासाठी कोतवालाची नियुक्ती करावी अशी मागणी जय शिव संग्राम संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भातील निवेदन नायब तहसीलदार प्रविण घोटकर यांना देण्यात आले आहे. तलाठी कार्यालय येथे भाग ३ मध्ये खाजगी व्यक्ती याच्या भरोशावर तलाठी कार्यालयाचे काम सुरू आहे. दोन-तीन



महिन्यापासून तलाठी कार्यालय कधी ११ तर कधी १२ वाजता उघडण्यात येते आणि ४:०० वाजता बंद करण्यात येते, तलाठी कार्यालय हे खाजगी व्यक्तीच्या भरोशावर चालू आहे. गोरगरीब जनतेचे व निराधार लोकांचे कामाला गती मिळत नाही खाजगी व्यक्तीकडून नागरिकांना जास्त पैशाची मागणी करून नागरिकाची व विद्यार्थ्यांची लूट सुरू आहे काही दिवसावरच शाळा उघडणार आहे. शाळेसाठी लागणारे दाखले उत्पन्न दाखले कॅरेक्टर सर्टिफिकेट साठी धावपळ सुरू राहाणार आहे या कामासाठी तहसीलदारांनी शासकीय कोतवालाची तलाठी कार्यालय येथे नियुक्त करावे, नागरिकांचे व विद्यार्थ्यांचे काम सोयीचे होईल.

शासनाचा जी आर क्रमांक - संकीर्ण २०२४/प्र. क्र. ३६३/ई-१० नुसार खाजगी व्यक्तीची नियुक्ती करता येत नाही त्या आदेशाचे पालन करत शासकीय कोतवालाची नियुक्ती करावी अशी मागणी जय शिवसंग्राम संघटनेचे तालुका अध्यक्ष जहीर खान, शहराध्यक्ष अजमत खान, युवक शहराध्यक्ष शंकर वाघमारे, मुबारक चाऊस,आयाज खान पठाण, राजू गव्हाणे,साजिद खान,असलम खान,किशोर वाघ,राजेश भाग्यवंत यांनी केली आहे.

## मराठा सेवा संघ व ब्रिगेडच्यावतीने शिवराज्याभिषेक दिन साजरा

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**नांदुरा दि.१०**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त, छत्रपती शिवराय यांना अभिवादन करण्यासाठी एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ व शिवप्रेमी यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक नांदुरा येथे करण्यात आला. कार्यक्रमात छत्रपती शिवरायांच्या शौर्याचा गौरव करण्यात आला आणि त्यांच्या कार्याचा जागर करण्यात आला.

या प्रसंगी अशोक धनोकार, बाळासाहेब पवार, भगवान सोयस्कर, वा. वि. भगत, निलेश



ठाकरे, किशोर देशमुख, डॉ. अंकित पाटील, डॉ. शरद पाटील, अमर पाटील, अमोल भगत, सौरभ केदार, कुलदीप डंबेलकर, रामकृष्ण घपांडे, संतोष गायगोळ, गणेश धोरण, संतोष वक्ते, दिलीप कोल्हे या सर्व मावळ्यांनी एकत्र येऊन शिवरायांच्या कार्यास बंदन केले व त्यांच्या विचारांना उजाळा दिला.

## कॉम्रेड मॅरेथॉन स्पर्धेत योगेश सानपने मिळविले सिल्व्हर मेडल

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**अंढेरा दि.१०**

मातृतिर्थ बुलढाणा जिल्ह्यातील अंढेरा येथील रहिवासी असलेला योगेश जगन्नाथ सानप याने जगप्रसिद्ध असलेल्या 'कॉम्रेड मॅरेथॉन' अंतर ९० किलो मीटर असलेल्या स्पर्धेत दक्षिण आफ्रिका येथे दि ८ जुन २०२५ रोजी पार पडलेल्या पार पडलेल्या स्पर्धेत तब्बल ७ तास २६ मिनिटे ५८ सेकंदात पूर्ण करुन भारतातून दुसरा वेगवान धावपटू होण्याचा मान पटकवला.

अंढेरा येथील योगेश सानप यांनी दक्षिण आफ्रिकेत झालेल्या जगप्रसिद्ध 'कॉम्रेड मॅरेथॉन' स्पर्धेत ९० किलोमीटर अंतर अवघ्या ७ तास २६ मिनिटे ५८ सेकंदात पूर्ण करत भारताला सिल्व्हर मेडल मिळवून देत ऐतिहासिक कामगिरी केली असून अशी कामगिरी करणारा योगेश सानप हा ९८ वर्षांत तिसरा भारतीय ठरला. ही स्पर्धा पीटरमैरिट्झबर्ग ते डर्बन या अत्यांत खडतर आणि आव्हानात्मक मार्गावर पार पडली. कॉम्रेड मॅरेथॉनची वैशिष्ट्ये आणि आव्हाने 'कॉम्रेड मॅरेथॉन' ही जगातील सर्वात जुनी (हे शंभरावे वर्ष परंतु ९८ वी स्पर्धा)आणि सर्वात मोठी अल्ट्रा-मॅरेथॉन स्पर्धा मानली जाते. या स्पर्धेचे अंतर ८७ ते ९० किलोमीटर इतके असते आणि ते दक्षिण आफ्रिकेतील डोंगराळ, चढ-उतारांनी भरलेल्या आणि अतिशय खडतर मार्गावर धावावे लागते. या स्पर्धेत केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिक क्षमतेचीही कसोटी लागते. या वर्षी २२००० हून जास्त जगभरातील धावपटूंनी या स्पर्धेत भाग घेतला होता. स्पर्धा पूर्ण करणे हेच मोठे यश मानले जाते. त्यामुळेच योगेश सानप यांची ही कामगिरी अत्यांत उल्लेखनीय आहे.या स्पर्धेसाठी योगेश सानप हा मागील गेल्या सहा वर्षांपासून दररोज कठोर मेहनत घेत होता यासाठी तो दररोज धावण्याचा असुन सराव करायचा आणि आपल्या कठोर मेहनतीच्या जोरावर देशात कुठेही मॅरेथॉन स्पर्धेत अवार्जुन भाग घेत हम खास बक्षीस जिंकायचा.



संपुर्ण सानप कुटुंबावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अंढेरा येथील एका खेड्यात गावातील रहिवासी असलेला योगेश जगन्नाथ सानप या नोकरी निमित्ताने पुणे येथे राहत असुन मागील सहा वर्षांपासून दररोज धावण्याचा सराव करत असायचा जगप्रसिद्ध असलेल्या कॉम्रेड मॅरेथॉन स्पर्धेत भाग घेत भारतातुन दुसरा धावपटू होण्याचा मान मिळवत सिल्व्हर मेडल जिंकले असुन योगेश सानप यांच्यावर आणि संपूर्ण सानप कुटुंबावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.तो १२जुनला दक्षिण आफ्रिकेतुन भारतात परतणार आहे.

## गुरांची वाहतूक करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.१०**

खामगाव तालुक्यातील चिखली बायपासजवळ ६ जून २०२५ च्या मध्यरात्री शिवाजीनगर पोलिसांनी केलेल्या तपासणीत एका मालवाहू वाहनात (-२८ ३९७५) २१ गुरांची अमानवीय पद्धतीने वाहतूक होत असल्याचे उघड झाले. या प्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन आरोपींना अटक केली आहे.

सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) अनिल भगत यांच्या नेतृत्वाखालील पथकाने रात्रीच्या गस्तीदरम्यान हे वाहन तपासले. तपासणीत असे आढळले की, गजानन वासुदेव जावरकर आणि अब्दुल नजिम अब्दुल कलिम या दोघांनी गुरांना अत्यांत क्रूरपणे वाहनात कोंबले होते. गुरांना पुरेशी जागा, हवा किंवा पाणी मिळत नव्हते, ज्यामुळे त्यांची अवस्था दयनीय झाली होती. पोलिसांनी तात्काळ गुरांना सुरक्षित ठिकाणी हलवले आणि त्यांची सुटका केली या घटनेनंतर पोलिसांनी आरोपींविरुद्ध पशुसंवहन नियमांचे उल्लंघन, पशु क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६०



आणि मोटार वाहन कायद्याच्या संबंधित कलमांखाली गुन्हा नोंदवला आहे. सध्या दोन्ही आरोपींना अटक करून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. या प्रकरणी दोषी आढळल्यास आरोपींना कठोर शिक्षेचा सामना करावा लागू शकतो, असे पोलिसांनी सांगितले. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या अमानुष वर्तनाला आळा घालण्यासाठी पोलिस कठोर कारवाई करत आहेत. ''पशु क्रूरता प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही,'' असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, गुरांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना योग्य ठिकाणी पाठवण्यात आले असून, त्यांची काळजी घेतली जात आहे.

## उपमुख्यमंत्री पवार उद्या खामगावात

### पोलिस अधिकाऱ्यांनी केली बंदोबस्ताची पाहणी

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.१०**

राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार हे गुरुवारी खामगावात येत असल्याने अपर पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा, ठाणेदार रामकृष्ण पवार तसेच न.प. कर्मचारी यांनी आज शहरातील काही भागातील पाहणी करुन बंदोबस्तासाठी ही पाहणी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

तसेच अजितदादा पवार यांचे खामगाव आगमन प्रसंगी कुठलीही अडचण येऊ नये तसेच काही ठिकाणच्या टपऱ्यासुध्दा काढण्यात येणार असल्याचे सांगण्यात येते. तसेच माजी आमदार राणा



दिलीपकुमार सानंदा हे राष्ट्रवादीत पक्ष प्रवेश करणार असून यावेळी संकल्प मेळाव्याचे सुध्दा आयोजन करण्यात आले आहे.

सदर मेळावा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानावर होणार आहे. यावेळी अनेक मंत्र्यांची उपस्थिती राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे. न.प. मैदानावर भव्य-दिव्य मंडप उभारणीचे काम सुरु असून गांधी चौकात ना. अजितदादा पवार यांचा फोटो असलेले बॅनर तसेच छत्रीवर सुध्दा अजितदादा पवार यांचे छायाचित्र लक्ष वेधत आहे.

## थोडक्यात

### कचरा संकलन करणाऱ्या घंटागाडी चालकांचा बेमुदत संप

**वाशिम :** घरोघरी जाऊन कचरा संकलन करणाऱ्या घंटागाडी चालकांनी ५ जूनपासून बेमुदत संप पुकारल्याने ही स्थिती निर्माण झाली असून, कचऱ्याची विल्हेवाट लागणे कठीण झाले आहे. महाराष्ट्र श्रमिक विकास संघटनेकडून प्रशासनाकडे सादर करण्यात आलेल्या निवेदनात नमूद आहे की, कचरा संकलनाचे काम करणाऱ्या घंटागाडीचालकांचा पगार दोन महिन्यांपासून थकीत आहे. यासह पीएफ, ईएसआयसी यांसारख्या शासकीय योजनांचाही त्यांना लाभ दिला जात नाही. अनेक वर्षांपासून प्रामाणिक सेवा करूनही मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळेच अखेर संपाचा निर्णय घ्यावा लागल्याचे निवेदनात नमूद आहे.

### थ्रीडी स्टॅच्यू तयार करून देण्याची बतावणी करीत फसवणूक

**वाशिम :** स्वर्गवासी वडिलांचा थ्रीडी स्टॅच्यू तयार करून देतो, अशी बतावणी करत भामट्यांनी क्यू-आर कोडद्वारे पैसे उकळले. अशाप्रकारे आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर येथील नवीन आययूडीपी कॉलनी स्थित प्राचार्य प्रशांत गडेकर यांनी पोलिसांत तक्रार दाखल करून न्याय मिळण्याची मागणी केली आहे.

### जुन्या भांडणाच्या कारणावरून काठीने हल्ला

**मंगरूळपीर :** जुन्या वादातून दोघांनी एका तरुणास मारहाण करत शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना मंगळसा फाटा येथे घडली. याप्रकरणी मंगरूळपीर पोलिसांनी ८ जून रोजी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. शिवाजी पाकधने (वय २७, रा. मंगळसा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ८ जून रोजी सकाळी सुमारे ९:४५ वाजताच्या सुमारास मंगळसा फाटा येथे, ओम ठाकरे (वय २२) व सोम ठाकरे (वय २०, दोघे रा. मंगळसा) यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून फिर्यादीवर लाकडी काठीने हल्ला केला. या मारहाणीमध्ये शिवाजी यांच्या उजव्या पायाला दुखापत होऊन रक्तस्राव झाला.

### शिवीगाळ करून महिलेला मारहाण

**रिसोड :** शिविगाळ करून एका महिलेला मारहाण केल्याची घटना रिसोड तालुक्यातील देऊळगाव बंडा येथे शनिवार, ८ जून रोजी दुपारी १ वाजता घडली. या मारहाणीत महिला गंभीर जखमी झाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. जखमी महिलेचे नाव अर्चना अतिष भगत (वय ३८) असे आहे. या प्रकरणी अर्चना भगत यांनी रिसोड पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत नमूद केले की, त्या दुपारी रस्त्याने जात असताना यशोदा जनार्दन भगत हिने त्यांना पाहताच शिवीगाळ केली. त्याचे कारण विचारल्यावर यशोदा भगत आणि मयुरी संतोष भगत यांनी तिला मारहाण केली. संतोष जनार्दन भगत याने रस्त्यावरील विट उचलून अर्चनाच्या डोक्यावर वार केले. या मारहाणीत त्या गंभीर जखमी झाल्या. जखमी अवस्थेत तिला रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या प्रकरणी तिघांविरुद्ध बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

### मागासवर्गीय मुलींकरिता वसतिगृहात प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ

**वाशिम :** मागासवर्गीय तथा आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, वाशीम या वसतिगृहामध्ये सन २५-२६ या शैक्षणिक सत्रातील एस.सी., एस.टी., ओबीसी, व्ही.जे., एन.टी., एसबीसी, अपंग, अनाथ अशा एकूण २२ जागांकरिता जातिनिहाय असलेल्या आरक्षणानुसार गुणवत्ता यादीप्रमाणे प्रवेश देणेसाठी ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. प्रवेशासाठी असलेल्या अटी व पात्रता पुढील प्रमाणे: विद्यार्थीनी ही महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावी. विद्यार्थिनी हिने वाशीम शहरातील कोणत्याही शाळा किंवा महाविद्यालयामध्ये इयत्ता ८ वी, ११ वी, बी.ए., बी.कॉम., बी.एस.सी., एम.ए., एम.कॉम., एम.एस.सी. प्रथम वर्ष किंवा व्यावसायिक विभागाकरिता प्रथम वर्षाचे अभ्यासक्रम घेतलेले असणे आवश्यक आहे.

# प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या

## अनैतिक संबंधाची चाहूल लागल्याने पत्नीनेच पतीला संपविले

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मालेगाव, दि. १० : शिरपूर पोलीस स्टेशन हद्दीतील खंडाळा शिंदे गावात ४ जून रोजी रात्री झालेल्या एका व्यक्तीच्या मृत्यूचे गुढ उकलण्यात पोलिसांना यश आले आहे. सुरुवातीला हा सामान्य मृत्यू वाटत असला तरी शिरपूर पोलिसांनी सखोल तपास करीत हा सुनियोजित खून असल्याचे उघडकीस आणले आहे. या हत्येत मृताच्या पत्नी आणि तिच्या प्रियकराची नावे समोर आली आहेत. दोघांनाही पोलिसांनी अटक केली असून, त्यांना ११ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.**



खंडाळा येथील रहिवासी भागवत पांडुरंग शिंदे (२७) यांनी शिरपूर पोलीस ठाण्यात त्यांचा भाऊ श्रीकृष्ण शिंदेच्या मृत्यूची तक्रार दाखल केली होती. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविला. अहवालाने श्रीकृष्ण शिंदे यांच्या मृत्यूला वेगळीच दिशा मिळाली. हा मृत्यू नैसर्गिक नव्हता तर त्यांची हत्या केल्याचे उघडकीस आले. मृत्यूचे कारण गळा दाबल्याने अहवालात नमूद असल्याने पोलिसांनी तपासाची चक्रे त्या दिशेने फिरविली.

शवविच्छेदन अहवालाच्या आधारे पोलिसांनी ७ जून रोजी आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम १०३ (१) अंतर्गत हत्येचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासादरम्यान मृत श्रीकृष्णाच्या पत्नीचे त्याच गावातील एका तरुणाशी अनैतिक संबंध असल्याचे उघड झाले. श्रीकृष्ण यांना याची कुणकुण लागली. त्यातूनच पत्नीने प्रियकराच्या मदतीने श्रीकृष्ण यांची हत्या केल्याचे उघडकीस आले.

**श्रीकृष्ण यांचा खून झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी संशयितांची कसून चौकशी केली. पोलिसी खाक्या दाखविताच दोन्ही संशयितांनी गुन्ह्याची कबुली दिली. ४ जूनच्या रात्री श्रीकृष्ण घरी झोपले होते तेव्हा त्यांची पत्नी आणि तिच्या प्रियकराने त्यांना मारण्याचा कट रचला. श्रीकृष्ण झोपेत असताना हनुमान श्रीखंडे याने गळा दाबून खून केला. पत्नीने संपूर्ण घटनेत त्याला साथ दिली. सकाळी तिने काहीही माहिती नसल्याचा आव आणत भावाला आणि बहिणीला श्रीकृष्ण जागे होत नसल्याची माहिती दिली.**

# तीन तासातच गोरसेनेच्या आंदोलनाची दखल!



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा , दि. १० :** तालुक्यातील मौजे भोईनी येथे गोरसेना तालुका व जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या वतीने खड्डेमय रस्त्याच्या दुरुस्तीसाठी पाठपुरावा केला; परंतु प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याच्या निषेधार्थ १० जून रोजी करण्यात आलेल्या जल आंदोलनाची प्रशासनाने दखल घेऊन खड्डेमय रस्ता दुरुस्तीचे लेखी आश्वासन दिल्याने आंदोलन तूर्तास मागे घेण्यात आले, अशी माहिती संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष गोपाल चव्हाण यांनी दिली.

ग्राम भोयनी येथे गोरसेना या सामाजिक संघटनेकडून करण्यात येणाऱ्या जलआंदोलन स्थळी आज महसूल प्रशासनाच्यावतीने संदीप एम. आडे, सहायक महसूल अधिकारी यांनी भेट दिली, तसेच सदर ठिकाणी संबंधित कंपनीचे प्रतिनिधी व सा. बां.विभागाचे अधिकारी विवेक पवार हे उपस्थित होते.

### दोन आठवड्यात भोईनी फाटा मोहगव्हाण पारवा रस्त्याची डागडुजी

सदर आंदोलनाची तत्काळ दखल घेणेकामी संबंधितांना सूचना वजा आदेश देण्यात आल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. आंदोलनात सुनील राठोड, तालुकाध्यक्ष गोर सेना मानोरा, गोपाल चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष वाशिम, बाळा बंजारा व इतर पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, इंद्रदीप कंत्राटदार कंपनीमुळे भोईनी फाटा ते मोहगव्हाण पारवा गावातील लोकांना मागील दोन वर्षांपासून मरण यातना सहन कराव्या लागत होत्या. या बेपर्वाईच्या विरोधात गोरसेनेच्यावतीने संबंधित कंपनी विरोधात आंदोलनादरम्यान निषेध नोंदविला.

> आंदोलनकर्त्यांच्या मागणीच्या पूर्ततेचा पाठपुरावा सातत्याने आम्ही कंपनीकडे करीत आहोत. दोन ते तीन दिवसात प्लॅन्ट सुरू करणार असून, पुढील दोन आठवड्यात रस्त्याची डागडुजी करण्यात येईल.
>
> **- विवेक पवार,**
> अभियंता सा. बां.विभाग, मानोरा.

# बंधाऱ्यांचे रूपांतर बॅरेजमध्ये केल्यास हजारो हेक्टर बागायत होणार

## भाजपचे लखनसिंह ठाकूर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. १० :** वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पांतर्गत रिसोड तालुक्यातील पैनगंगा नदीवरील पाच कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर करण्याची मागणी भाजपचे उत्तर भारतीय महाराष्ट्र प्रदेश सचिव लखनसिंह ठाकूर यांनी ५ जून रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनानुसार, रिसोड तालुका सिंचनाच्या दृष्टीने अत्यंत मागासलेला असून, पैनगंगा नदीवरील बाळखेड, धोडप, भापूर, मसला पेन आणि आसेगाव येथील कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर झाल्यास तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा सिंचन लाभ मिळेल. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या कार्यकाळात या प्रस्तावासाठी मंत्रालयात अनेक बैठका झाल्या होत्या; मात्र नाशिक जलविज्ञान केंद्राकडून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे हा प्रकल्प अद्याप रखडलेला आहे.



आता वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्प होत आहे. या प्रकल्पांतर्गत नळगंगा पैनगंगा नदीजोड या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामध्ये टप्पा क्रमांक ४ मध्ये नळगंगा धरण ते पैनगंगापर्यंत सर्वेक्षण प्रस्तावित आहे. या पार्श्वभूमीवर पैनगंगा नदीवरील बाळखेड, धोडप, भापूर, मसलापेन व आसेगाव पेन येथील कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रुपांतर होण्यासाठी सर्वेक्षण करण्याबाबत मंत्रालयस्तरावरून संबंधित यंत्रणेला निर्देश द्यावेत, अशी मागणी लखनसिंह ठाकूर यांनी केली आहे.

रिसोड तालुक्यातील पैनगंगा नदीवरील पाच कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर झाल्यास बाळखेड, धोडप, गोहोगाव, सरपखेडा, एकलासपूर, मसलापेन, महागाव, वाडी वाकद, आसेगाव पेन, बेलखेडा यांसह अन्य गावांतील शेतीला सिंचनाचा थेट लाभ मिळणार आहे, असेही ठाकूर यांनी निवेदनात म्हटले आहे.

# वाशिम जिल्हा क्रीडा संकुलास स्व. पुंडलिकराव गवळींचे नाव देण्याची मागणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १० :** जिल्ह्याचे शिल्पकार दिवंगत खासदार पुंडलीकराव गवळी यांनी लोकआग्रहास्तव शिवसेना प्रमुखांकडे मागणी लावून धरल्याने वाशिम जिल्ह्याची निर्मिती झाली. त्यामुळे स्व. गवळी यांना जिल्ह्याचे शिल्पकार असे संबोधल्या जाते. दरम्यान, येत्या १ जुलै रोजी जिल्हा निर्मितीला २७ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्हा क्रीडा संकुलाचे स्व. पुंडलिकराव गवळी क्रीडा संकुल असे नामकरण करण्याची मागणी शिवसेना शहर प्रमुख डॉ. विशाल सोमटकर यांनी केली आहे.



वाशिम जिल्हा निर्मितीसाठी अनेक आंदोलने झाली, तरी कोणत्याही राजकीय पुढाऱ्याने ही मागणी गांभीर्याने घेतली नव्हती. यानंतर राज्यात सत्तांतर होऊन विधानसभा निवडणुका झाल्यानंतर शिवसेना-भाजप युतीचे सरकार स्थापन झाले. दरम्यान, शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे हे वाशिम जिल्हा दौऱ्यावर असताना स्व. खा. पुंडलिकराव गवळी यांनी वाशिम जिल्हा निर्मितीसाठीची लोकभावना शिवसेना प्रमुखांसमोर मांडली आणि शिवसेना प्रमुखांनी लगेच वाशिम जिल्हा लिहिण्यास सुरुवात करण्याचे आवाहन केले. यानंतर काही दिवसांत वाशिम जिल्हा निर्मितीची घोषणा होऊन १ जुलै १९९८ रोजी वाशिम जिल्हा नकाशावर आला. या घटनेला येत्या १ जुलै रोजी २७ वर्षे पूर्ण होत असून, जिल्हावासियांना व येणाऱ्या पिढीला स्व. पुंडलिकराव गवळी यांच्या कार्याची माहिती व्हावी, यासाठी म्हणून वाशिम येथील क्रीडा संकुलाचे स्व. पुंडलिकराव गवळी क्रीडा संकुल असे नामकरण करावे, अशी मागणी शहर प्रमुख डॉ. विशाल सोमटकर यांच्या नेतृत्वात दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली. या निवेदनावर श्याम खरात, अमोल मापारी, कैलास थोरात, अब्दुल आकीब, राजू पुणेवाड, सय्यद कफील, अजय राईतकर, गोपाल सोमटकर, अस्मत जहागीरदार, गोपाल सारसकर, सुधाकर कुटे आदींसह शिवसैनिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ट्रक अपघातात वृद्ध जखमी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा लाड, दि. १० :** येथील ट्रक अपघातात वृद्ध गंभीर जखमी झाले. ही घटना मंगळवार, १० जून रोजी सकाळी १० वाजता कारंजा बायपास परिसरातील झाशी राणी चौकात घडली.

उद्धव महादेव पाचडे वय ६० वर्षे असे जखमीचे नाव असून, ते शहरातील तुषार कॉलनीतील रहिवासी आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार ते झाशी राणी चौकात असलेल्या भाजीपाला बाजाराजवळ आले होते. काम आटोपल्यानंतर बाहेर उभी केलेली स्कूटी काढत असताना ते एम एच २९ बी डी ४४५६ क्रमांकाच्या ट्रकच्या चाकात आले. त्यामुळे त्यांच्या दोन्ही पायांना गंभीर इजा झाली. घटनेनंतर त्यांना उपचारासाठी कारंजा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले; परंतु उपचारादरम्यान त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे डॉक्टरांच्या निदर्शनास आल्याने त्यांना पुढील उपचाराकरिता अकोला येथे पाठविण्यात आले.

या झाशी राणी चौकामध्ये यापूर्वी एका विद्यार्थिनीचा अपघातात मृत्यू झाला होता. त्यानंतरही पोलीस प्रशासनाकडून कुठलीही दखल घेतली गेली नाही. त्यामुळे १० जून रोजी एका साठ वर्षीय इसमाचा अपघात होऊन त्यांचे दोन्ही पाय गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे कारंजा शहरातील वाहतूक पोलिसांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

वाहतूक पोलीस हे शहरात आपली ड्युटी न बजावता खेर्डा रोडवर नेहमी आपली ड्युटी निभवताना दिसतात. असे काय आहे त्या खेर्डा रोडवर की सर्व वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी तेथे सकाळी सात वाजतापासून ड्युटी निभवताना सर्वसामान्य नागरिकांना दिसतात!

### झाशी राणी चौकातील लघु व्यावसायिकांना इतरत्र हटविण्याची मागणी

बायपासवरील झाशी राणी चौकात रस्त्यावर आंबा विक्रेते आणि इतर लघु व्यावसायिक मोठ्या प्रमाणात असल्याने ग्राहकांची खरेदीसाठी गर्दी होते. शिवाय ग्राहक आपल्या दुचाक्या रस्त्यावर उभ्या करीत असल्याने मोठ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होते. मंगळवारी झालेला अपघातसुद्धा याच कारणामुळे झाला. त्यामुळे येथील लघुव्यवसायिकांना इतरत्र जागा देण्यात यावी, अशी मागणी घटनेवेळी उपस्थित नागरिकांकडून केल्या गेली.

# बाधित शेतकऱ्यांना सात वर्षांपासून मोबदल्याची प्रतीक्षा

## विलंबामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. १० :** तालुक्यातील वाकद लघु पाटबंधारे योजना सन २०१७ पासून कार्यरत असून, या योजनेमुळे परिसरातील अनेक शेतजमिनी पाण्याखाली गेल्या आहेत. यामुळे अनेक शेतकरी बाधित झाले असून, त्यांची उपजाऊ शेतजमीन पूर्णपणे नष्ट झाली आहे. सात वर्षांनंतरही या शेतकऱ्यांना अद्याप मोबदला मिळालेला नाही.

यासंदर्भात लघु पाटबंधारे विभाग, वाशिममार्फत संयुक्त मोजणी करण्यात आली होती. त्यानंतर १६ डिसेंबर २०२४ रोजी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, वाशिम यांनी अंतिम निवाडा जाहीर करत भूसंपादन करण्याबाबत विभागास कळविले होते; मात्र हा निवाडा होऊनही आजपर्यंत विदर्भ विकास महामंडळ, नागपूर यांच्याकडून निधी मंजूर करण्यात आलेला नाही.



या विलंबामुळे संबंधित शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. काही शेतकरी वयोवृद्ध असून काही जण गंभीर आजारांनी ग्रस्त आहेत. शासनाने त्यांच्या जमिनी संपादित करून घेतल्या असतानाही त्यांना मोबदला न मिळाल्याने ते रोजंदारीवर काम करीत आपली गुजराण करीत आहेत. काहींच्या मुलाबाळांचे शिक्षण थांबले असून, कर्जबाजारीपणाची स्थिती निर्माण झाली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने ४ नोव्हेंबर २००९ रोजी (भूसंपा.-२००९/(३२७/२००८) मोप्र-२ मंत्रालय, मुंबई) जारी केलेल्या परिपत्रकात स्पष्ट नमूद आहे की, निवाडा झाल्यानंतर भूसंपादनाची मोबदल्याची रक्कम संबंधित जमीन मालकांना तातडीने अदा करणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. तसेच ही रक्कम कोणत्याही कारणास्तव प्रलंबित ठेवण्यात येऊ नये, असेही स्पष्ट निर्देश आहेत; मात्र प्रत्यक्षात ही परिपत्रकं केवळ कागदावर राहिली आहेत, असे चित्र आहे.

या संपूर्ण प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांचे शोषण होत असल्याचे स्पष्ट होत असून, शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तीव्र मागणी केली आहे की, सदर प्रकरण गांभीर्याने घेऊन, लघु पाटबंधारे विभाग व विदर्भ विकास महामंडळ यांनी समन्वयाने निधी मंजूर करून तातडीने मोबदला द्यावा, अन्यथा भविष्यात होणाऱ्या परिणामांना प्रशासन जबाबदार राहील, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

**शेतकऱ्यांची पिडा, प्रशासनाचे दुर्लक्ष आणि शासनाच्या आदेशाची पायमल्ली या साऱ्या गोष्टी एकत्रितपणे पाहता, ही एक सामाजिक अन्यायाची उदाहरणे बनली असून, लवकरच या प्रकरणात सकारात्मक कार्यवाही झाली नाही, तर बाधित शेतकरी पाटबंधारे विभागासमोर आत्मदहनासारखी पावले उचलण्याच्या तयारीत आहेत. अशा परिस्थितीत संबंधित विभागांनी ही बाब गांभीर्याने घेऊन बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मोबदला द्यावा, अशी मागणी बाधित शेतकऱ्यांनी केली आहे, अन्यथा होणाऱ्या परिणामास संबंधित प्रशासन जबाबदार असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.**

# ४० लघुप्रकल्प कोरडे: जनावरांना पिण्याचे पाणी मिळेना

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १० :** विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत जिल्ह्यातील सहाही तालुक्यांमध्ये दोन मध्यम आणि ७७ लघु सिंचन प्रकल्प कार्यान्वित आहेत. त्यातील ४० लघु प्रकल्प कोरडेठाण झाले असून, उर्वरित लघु आणि दोन मध्यम प्रकल्पांमध्येही जेमतेम साठा शिल्लक आहे. या भीषण परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या घशाला कोरड पडण्यासोबतच मोकाट जनावरांनाही पिण्याचे पाणी मिळेनासे झाले आहे.

पूर्वी साधारणतः ५ ते ७ जूनच्या दरम्यान मृग नक्षत्राला प्रारंभ होऊन धो-धो पाऊस कोसळायचा; मात्र गेल्या काही वर्षात चित्र बहुतांशी पालटले आहे. निसर्गाचा लहरीपणा यंदाही कायम राहिला असून, ९ जून उलटूनही पावसाचा थांगपत्ता नसल्याचे चित्र निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील ७७ लघु सिंचन प्रकल्पांपैकी तब्बल ४० प्रकल्प कोरडे आहेत. म्हणजे या ठिकाणी पिण्याचे पाणी तर सोडाच, जनावरांचीही तहान भागणे कठीण झाले आहे.

### उष्णतेत वाढ; जलस्तर घटतोय!

जिल्ह्यातील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारित असलेल्या एकूण धरणांपैकी शून्य टक्के जलसाठा असलेले ४० प्रकल्प, ५ ते १० टक्क्यांदरम्यान जलसाठा असलेले १५ प्रकल्प, तर केवळ २४ प्रकल्पांमध्ये १०% पेक्षा अधिक पाणीसाठा शिल्लक आहे.

अजिंक्य भारत

# आपला जिल्हा

अकोला । बुधवार, दि. ११ जून २०२५



## थोडक्यात

### लोहारा येथील माजी सैनिक राष्ट्रपाल मोरे झाले महाराष्ट्र पोलीस

**कळंबी महागाव** : अकोला जिल्ह्यातील व बाळापूर तालुक्यातील ग्राम लोहारा येथील राष्ट्रपाल मोरे यांनी



१७ वर्षे ६ महिने देशसेवा केली. त्यांचे शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रीय शाळा मराठी येथे झाले. नंतर श्रीमती राधाबाई बकाल विद्यालय लोहारा येथे झाले. सागर येथील भरतीमध्ये देशाची सेवा करण्यासाठी भरती झाले होते. देशसेवा केल्यानंतर काही महिने ते घरी राहिले व नंतर आपल्याला आता महाराष्ट्र पोलीस बनायचे आहे, हा ध्यास डोळ्यासमोर ठेवून त्यांनी तयारीला सुरुवात केली. त्यांनी ९ जून २०२५ रोजी महाराष्ट्र पोलीसची शपथ घेतली. त्यांनी तरुणांपुढे एक आदर्श निर्माण केला. आजच्या काळात जर काही बनायचे असेल तर अभ्यासाशिवाय दुसरा पर्याय नाही, कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो पिणार तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. आज त्यांच्या नियुक्तीमुळे मोरे परिवारामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### हिवरखेड शहरात वटपौर्णिमा साजरी



**हिवरखेड** : येथे अनेक ठिकाणी महिलांनी वडाच्या झाडाची पूजा करून वटपौर्णिमा साजरी केली. ही हजारो वर्षांपासून चालत आलेली परंपरा असून, पत्नी आपल्या पती परमेश्वराचे आयुष्य वाढविण्यासाठी दरवर्षी वटपौर्णिमेच्या दिवशी दिवसभर निरंकार उपवास तसेच नवीन वस्त्र, सिंगार करून वडाची पूजा करतात. वडाला दोरा बांधून सात जन्माची गाठ बांधतात. वडाच्या झाडाचे शेकडो वर्ष आयुष्य असतं. म्हणून वडाच्या झाडाला दोरा गुंडाळून पूजा करतात व संध्याकाळी आपल्या पतीच्या हाताने अन्न ग्रहण करून उपवास सोडतात. अशा प्रकारे अनेक महिला मोठ्या उत्साहात हा सण साजरा करतात.

### पिंजर शहरात वटपौर्णिमा उत्साहात साजरी

**पिंजर** : पिंजर शहरात वटपौर्णिमा मोठ्या उत्साहाने साजरी केली. सुवासिनींनी परिसरात वडाच्या झाडाच्या ठिकाणी पूजेसाठी गर्दी केली होती. वटपौर्णिमेला महिला वटवृक्षाच्या मुळाशी पाणी शिंपून बुंध्याला सूताचे फेरे घालतात. ही परंपरा पिढ्यान्पिढ्या चालत आलेली आहे, या परंपरेप्रमाणे वटवृक्ष असलेल्या ठिकाणी वटवृक्षाची पूजा करण्यासाठी महिला मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. वडाचे झाड दीर्घायुषी असते, त्याप्रमाणे आपला पतीही दीर्घायुषी रहावा, तसेच पती-पत्नीमधील मधुर नाते आणखी दृढ करण्यासाठी प्रत्येक सुवासिनीने आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाच्या झाडाची मनोभावनेने पूजा केली. सकाळपासून सुहासिनीमध्ये पूजेची लगबग सुरू होती. साजशृंगार करून पूजेचे ताट घेऊन परिसरातील वडाच्या झाडाला सात फेऱ्या घेऊन वडाच्या झाडाची मनापासून पूजा केली. त्यानंतर वडाच्या झाडाला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून दर्शन घेतले. घरी आल्यानंतर आपल्या गल्लीतील महिलांनी एकत्र येऊन विविध गाणी तसेच सामूहिक नृत्य सादर केले. नवऱ्याला उदंड आयुष्य लाभावे आणि जन्मोजन्मी हाच पती मिळावा, असा वसा असणारा सौभाग्यवती महिलांचा वटपौर्णिमा सण. यानिमित्त पिंजर परिसरातील महिलांची सकाळपासून वडाच्या पूजेसाठी गर्दी पाहायला मिळाली.

### संविधान कॉलनीत बुद्धगया येथून आणलेल्या बोधी वृक्षाचे रोपण



**अकोट** : शहरातील लोहारी रोडवर असलेल्या संविधान कॉलनी येथे भिमाई वाटिकेमध्ये, बिहार येथील पवित्र ठिकाण असलेल्या बुद्धगया येथील बोधी वृक्ष आणून वर्षासाच्या तोंडावर बोधीवृक्ष लावून एक सामाजिक संदेश दिला. त्या बोधीवृक्षाचे संगोपन करण्यात येणार असून, महाकाय वृक्ष करण्यात येणार असून, बौद्ध भिक्खुनी माताजी यांच्या हस्ते बुद्धवंदना घेऊन, बोधी वृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी संविधान कॉलनी येथील ज्येष्ठ आंबेडकरी चळवळीतील बसंत तेलगोटे, राजू राऊत, कांबळे, कल्पना राऊत, अन्नपूर्णा पळसपगार, राजकन्या न. ओईंबे, जया पळसपगार, दीक्षा राऊत, वनमाला तेलगोटे, बबीता तेलगोटे, मनीषा तेलगोटे, मनीषा पळसपगार, विशाखा ओईंबे, तसेच योगपाल लबडे व सर्व उपासक, उपसिका उपस्थित होते. यानंतर दर रविवारला वृक्षारोपण व स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे, तसेच संविधान कॉलनी येथे बुद्ध आणि त्यांचा धम्म, या पवित्र ग्रंथाचे पठण होणार आहे.

# अकोट शहरात पिसाळलेल्या माकडाचा हैदोस; पाच नागरिक जखमी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. १० :** अकोट शहरातील मध्यवर्ती भागात सकाळपासून एका पिसाळलेल्या माकडाने धुमाकूळ घातला आहे. या माकडाने कबुतरी मैदान ते नागमते हॉस्पिटल, गवळीपुरा परिसर ते शिवाजी शाळा परिसरापर्यंत हैदोस घातला असून, यामुळे नागरिक प्रचंड भयभीत झाले आहेत. या माकडाच्या हल्ल्यात पाच नागरिक जखमी झाले आहेत.

जखमींमध्ये महिमा पालेकर वय १२, देवंगणा विनोद वक्ते वय ५६,सुवर्णा गणेश कांगळे वय ३२ आणि पवन शिवरकार वय १५ यांचा समावेश आहे. जखमींवर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याशिवाय, शालिनी अवि



पालेकर यांच्या अंगावर वानराने उडी मारून त्यांना दुखापत केली आहे, तसेच गादी कारखान्याजवळ एका व्यक्तीवरही वानराने हल्ला केला; मात्र त्या व्यक्तीचे नाव अद्याप स्पष्ट झालेले नाही.

या घटनेनंतर जितेन बरेठिया व अविनाश पालेकर यांनी तत्काळ वनविभागाशी संपर्क साधला. वनपरिक्षेत्र अधिकारी सुनील राऊत यांनी या संदर्भात माहिती देताना, संध्याकाळपर्यंत आवश्यक बंदोबस्त लावण्यात येईल आणि माकडाला पकडण्याची कारवाई सुरू आहे, असे सांगितले.

**वनविभाग आणि स्थानिक प्रशासनाने सतर्क राहून उपाययोजना सुरू केल्या आहेत. लवकरच या पिसाळलेल्या माकडाला जेरबंद करण्याची कारवाई चालू आहे. कोणीही घाबरू नका, असा विश्वास व्यक्त केला आहे. अकोट शहरात नागरिकांनी घाबरून न जाता घरातच राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

## अखेर नगर परिषद निवडणूकांची तयारी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. १० :** महाराष्ट्रामधील जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, नगरपंचायतीच्या रखडलेल्या निवडणुका येत्या काही महिन्यातच होणार आहेत.

त्यानिमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने प्रभागांमधील प्रभाग रचना व सदस्य संख्या क्रमित करण्यासाठी १० जून २०२५ रोजी आदेश निर्गमित केला आहे. राज्यभरातील नगर पंचायती, नगर परिषद आणि महानगर पालिकांवर प्रशासक कारभार पाहत होते. त्यामुळे नगरसेवकांना निवडणूक कधी होईल आणि आपण कधी सत्ताधारी होऊ याची प्रतिक्षा होती. मात्र विद्य. सुप्रीम कोर्टाने निवडणूक आयोगाला सूचना करून निवडणूका घ्या. असे सांगितले होते. त्यानुसार निवडणूक आयोगाने निवडणूका घेण्याचे तयारी सुरु केली असून राज्यभरातील नगर परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणूक सर्व स्वायत्त संस्थांच्या प्रारंभी होत आहेत आज १० जून रोजी नगर विकास विभागाचा हा आदेश महाराष्ट्रातील सर्व मुख्याधिकारी व सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.

त्यानुसार अकोला जिल्ह्यातील अकोट नगर परिषद प्रशासनाला हा आदेश प्राप्त झाला असून हेच आदेश जिल्ह्यात सर्व नगर पंचायती आणि नगर परिषद प्रशासकांना प्राप्त झाले आहेत. त्यामुळे आता निवडणूकांचे वारे जिल्ह्यात वाहायला सुरुवात झाली असून. आज जारी झालेल्या शासन निर्णय नुसार प्रभाग रचने संदर्भात प्रत्येक प्रभागाची संख्या दोन असावी,एक सदस्य संख्या जास्त असल्यास शेवटच्या प्रभागामध्ये तीन सदस्य असावेत. असे आदेशात नमूद केले आहे.

## माणसातील देव माणूस पाहिलेला युवा समाजसेवक केल्विन सुबी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कुरणखेड, दि. १० :** हिंदू धर्मात देवी-देवता यांना मानण्याची परंपरा पूर्वी काळातूनच होत आहे. हिंदू धर्मात अनेक सण, उत्सव ३३ कोटी देवी-देवता यांना मानणारे भाविक मोठ्या संख्येने आहेत, त्यामध्ये मंदिरातील देवी देवतांसह बाजारात विकत आणलेल्या मूर्तीचाही समावेश असतो. आपल्या प्राचीन संस्कृतीप्रमाणे त्यांचे उत्सव संपन्न झाले की, त्यांची योग्य विल्हेवाट न लावता, इतरत्र वाटेल त्या ठिकाणी विसर्जित न करता वाटेल त्या ठिकाणी रस्त्याच्या कडेला, झाडाखाली किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी ठेवलेले असतात. ज्यामुळे त्यांची विटंबना होते, हे शल्य मनात ठेवून एका ध्येयवेढ्या तरुणाने पाऊल उचलत समाजातील सार्वजनिक



ठिकाणी ठेवलेल्या मूर्तींचा मानसन्मान करून त्यांना विसर्जित करण्याचा संकल्प घेतला आहे.

अकोला जिल्ह्यातील शीख समुदायातून येणारा १९ वर्षीय युवा तरुण केल्विन सुबी यांनी आपल्या मित्र परिवारासह जिल्ह्यातील निर्जलस्थळी तथा सार्वजनिक स्थळी ठेवलेल्या देवी देवतांच्या मूर्ती आपल्या गाडीमध्ये मानसन्मान करून जमा करत त्यांनी नदीमध्ये विसर्जित करण्याचा संकल्प केला आहे. केल्विन सुबी हे नेहमीपासूनच सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. त्यांच्या आई समाजसेविका कमलजीत कौर यांच्यापासून प्रेरित होऊन युवा समाजसेवक केल्विन यांनी या सार्वजनिक कामाकडे वाटचाल सुरू केली आहे. या अभिनव उपक्रमाचे सध्या सर्व जिल्ह्यात कौतुक होत आहे. कुठेही अशा मूर्ती आढळून आल्यास आपण या +९१८६६९८९८२९० नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन केल्विन सुबी युवा मंचतर्फे करण्यात आले आहे.

## पुंडा येथे विस्तार अधिकारी मदनसिंग बहुरे यांची भेट

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पुंडा, दि. १० :** ग्रामपंचायत पुंडा येथे आज१० जून २०२५ रोजी पंचायत समिती अकोटचे विस्तार अधिकारी मदनसिंग बहुरे यांनी भेट दिली. गावात सुरू असलेल्या विविध विकास कामांची पाहणी व प्रगतीपथावर असलेल्या कामांचा आढावा घेतला व शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी ग्रामस्थांच्या समस्या आणि अडीअडचणी जाणून घेऊन त्यावर मार्गदर्शन केले. ग्रामपंचायतीला मिळालेल्या घरकुलच्या उद्दिष्टांपैकी किती घरकुल मंजूर करण्यात आले व त्यापैकी किती लाभार्थींना घरकुल हप्ता जमा झालेला आहे किंवा नाही आणि घरकुलची किती कामे पूर्ण अथवा प्रगतीपथावर आहेत. म.ग्रा.रो.ह.यो.अंतर्गत पूर्ण झालेले विहिरींचे कामांची पाहणी करण्यात आली. सविस्तर माहिती विस्तार अधिकारी बहुरे यांनी घेतली. १५ वा वित्त आयोग अंतर्गत करण्यात आलेली कामे व त्यामधून घेण्यात आलेले साहित्य, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन



अंतर्गत घरगुती कचराकुंडी वाटप झाल्याची खातरजमा आणि पाहणी विस्तार अधिकारी बहुरे यांनी केली. त्याप्रसंगी ग्रामपंचायत अधिकारी एस.डी. मंगलकर, सरपंच लता श्याम वाकोडे, उपसरपंच सुधाकर दादाराव पुंडकर, ग्रामरोजगार सेवक सुरेश कडू, ग्रामपंचायत कर्मचारी संजय गिते, भास्कर किसनराव पुंडकर, गजानन आढे, संगणक परिचालक मंगेश कोथळकर उपस्थित होते.

## उद्या राष्ट्रवादी काँग्रेसचा पक्षप्रवेश सोहळा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे गुरुवार, १२ जून रोजी अकोला जिल्हा दौऱ्यावर येत असून, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अकोला जिल्हा ग्रामीण तर्फे त्यांचा भव्य सत्कार तसेच काँग्रेस पक्षाचे प्रदेश सचिव तथा माजी महापौर मदन भरगड यांच्यासह विविध पदाधिकारी नगरसेवक यांचा जाहीर पक्षप्रवेश सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे. हा सोहळा पोलीस लॉन , जिल्हाधिकारी कार्यालय रोड अकोला येथे दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला असून, या सोहळ्याला विविध मान्यवर नेते, मंत्री उपस्थित राहणार असून, हा सोहळा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधान परिषदेचे आमदार अमोल मिटकरी यांच्या नियोजनात, अकोला जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद बद्रूजमातर्फे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, जिल्हा परिषद सदस्य नगरपालिकेचे नगरसेवक, पंचायत समिती सदस्य, सरपंच यांच्यासह लाडक्या बहिणींनी अजित पवारांचे विचार ऐकण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अकोला जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद बद्रुजमा यांनी केले आहे, अशी माहिती जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अनिल मालगे यांनी दिली.

## संत रुपलाल महाराज पालखीचे हिवरखेडमध्ये आगमन



**हिवरखेडमध्ये संत रूपलाल महाराज अंजनगाव येथील पंढरपूर जाणाऱ्या पालखीचे आगमन. हिवरखेडमध्ये थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली. यामध्ये इंदिरानगरमध्ये जय बजरंग उत्सव मंडळ तसेच इंदिरानगरमधील सामाजिक कार्यकर्ते मिळून निंबू पाणी शरबत वाटप करण्यात आले व लगेच दहा मिनिटं विश्रांती घेऊन पालखी पुन्हा पंढरपूरच्या मार्गाने निघाली.**

# देवरी ग्रामपंचायतीचे खोट्या सह्यांचे प्रकरण अक्षर तज्ज्ञांकडून तपासणी न करताच केले बंद

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. १० :** ६ जुलै २०२३ रोजी तक्रारकर्ता यांनी गटविकास अधिकारी अकोट यांच्याकडे ग्रामसभेत १० नागरिकांच्या सह्या तपासण्याबाबत प्रकरण पुन्हा दाखल केले. ग.वि.अ. यांनी ग्रामपंचायत देवरी सचिव यांना सह्यांचे नमुने घेऊन अक्षर तज्ज्ञ अमरावती यांच्याकडे प्रकरण दाखल करावे, असे आदेश देण्यात आले होते; परंतु ग्रामपंचायतीने ग.वि .अ. पं.स.अकोट यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत ग्रामपंचायत खोट्या सह्याच्या प्रकरणात खर्च करणार नाही, असा मासिक सभेमध्ये ठराव घेऊन ग.वि.अ. यांच्या आदेशाचे उल्लंघन केले.

ग्रामपंचायत देवरीच्या भोंगळ कारभाराबाबत सन २०२२ पासून तक्रारकर्ता यांनी माहिती घेऊन झालेल्या ग्रामसभांमध्ये जे नागरिक कधीच ग्रामसभेला जात नाही किंवा मयत लोकांची नावे लिहून त्यांच्या नावापुढे सह्या केलेले आहेत. जे निरीक्षक आहेत त्यांच्या सुद्धा सह्या केलेल्या आहेत, असे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न ग्रामपंचायत देवरीच्या ग्रामसभेच्या हजेरी रजिस्टर व रेकॉर्डनुसार आहेत. तक्रारकर्ता यांनी विस्ताराधिकारी बोहरे यांनी प्रत्यक्ष रेकॉर्डची चौकशी करून वस्तुस्थिती हाताळली व मोघमस्वरूपी अहवाल दाखल केला. ६ जुलै २०२३ रोजी तक्रारकर्ता यांनी गटविकास अधिकारी अकोट यांच्याकडे १० नागरिकांच्या सह्या तपासण्याबाबत प्रकरण पुन्हा दाखल केले तेव्हा ग.वि.अ. यांनी ग्रामपंचायत देवरी सचिव यांना सह्यांचे नमुने घेऊन अक्षर तज्ज्ञ अमरावती यांच्याकडे प्रकरण दाखल करावे, असे आदेश देण्यात आले होते; परंतु ग्रामपंचायतीने ग.वि. अ. पं.स.अकोट यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत ग्रामपंचायत खोट्या सह्याच्या प्रकरणात खर्च करणार नाही, असा मासिक सभेमध्ये ठराव घेऊन ग.वि.अ. यांच्या आदेशाचे उल्लंघन केले. जा. क्र. ७ /२७./२०२५ २४ मार्च २०२५ रोजीच्या आदेशान्वये यांप्रकरणी निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम ७ व ४५ नुसार ग्रामपंचायतचे अभिलेख हे सुस्थितीत ठेवणे व त्याची निगा राखणे हे पूर्णतः ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे, त्यानुसार उक्त प्रकरणी ग्रामपंचायत देवरी येथील ग्रामसभेतील हजेरी रजिस्टरवर नागरिकांच्या खोट्या सह्याच्या बाबतीत सह्यांचे नमुने अक्षर तज्ज्ञाकडून पडताळणी करून घ्यावी किंवा आपण स्वतः अभिलेख याची पडताळणी करून खोट्या सह्यांबाबत ताळमेळ घेऊन खात्री करावी व उक्त प्रकरणी नियमानुसार पुढील कारवाई करून प्रकरण निकाली काढावे व तसे अर्जदारास परस्पर आपल्या स्तरावरून कळवावे, असे आदेश निर्गमित केले आहे. तक्रारकर्ता यांनी गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांना विचारणा केली असता. ग्रामपंचायत सरपंच सचिव यांनी कितीही भ्रष्टाचार करावा, आपणास त्याबाबत काही घेणे-देणे नाही. तत्कालीन पं.स.विस्तार अधिकारी यांनी बारा महिन्यांमध्ये झालेल्या ग्रामसभा प्रोसिडिंग व हजेरी रजिस्टर तपासाव्या व शेरा द्यावा, असा ग्रामपंचायत अधिनियम आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये होणारा भ्रष्टाचार करण्यास सचिव, सरपंच यांना मोकळे रान होऊन जाते. वेळीच विस्तार अधिकारी बीडीओ यांनी दक्षता घेतल्यास गैरप्रकार होण्यास आळा बसतो; परंतु आपण जबाबदार अधिकारी काहीच करण्यास तयार नाह, हे आजच्या अहवालावरून स्पष्ट होते. त्यामुळे जि. प. अकोला मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे नागरिकांच्यावतीने दाद मागण्यात येणार आहे.

> ग्रामपंचायत ही स्वायत्त संस्था आहे. त्यांनी कोणत्याही प्रकारची अनियमितता भ्रष्टाचार केल्यास गट वि. अ.हे जबाबदार राहत नाही. किंवा देवरी ग्रामपंचायतच्या खोट्या सह्यांचे नमुने तपासण्याकरिता आम्ही ग्रा.पं.ला आदेशित केलेले आहे. सचिव सरपंच कार्यवाही करण्यास तयार नाहीत
>
> **- मदनसिंग बहुरे ,**
> विस्तार अधिकारी प. स.अकोट.

## मुफ्ती-ए-आझम हजरत गुलाम मुस्तफा यांचे निधन

**अकोला :** अकोला शहराचे सुप्रसिद्ध आलिमे-दीन, समाजाचे मार्गदर्शक आणि मुफ्ती-ए-आझम हजरत गुलाम मुस्तफा यांचे ९ जून रोजी रात्री ११ वाजता दुःखद निधन झाले. ते काही काळ आजारी होते. २७ मे रोजी ब्रेन हॅमरेज झाल्यामुळे त्यांना प्रथम अकोल्यातील केअर हॉस्पिटलमध्ये व नंतर नागपूरच्या एनएसएच क्रिटिकल केअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. तिथे शस्त्रक्रियेनंतर त्यांना अकोल्यात परत आणले गेले आणि आयकॉन हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

त्यांच्या निधनाची बातमी शहरात पसरताच शोककळा पसरली. हजारो चाहत्यांनी, अनुयायांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी, धार्मिक नेत्यांनी आणि नागरिकांनी आयकॉन हॉस्पिटलकडे धाव घेतली. आज १० जून रोजी झोहरच्या नमाजेनंतर दुपारी २ वाजता त्यांची अंत्ययात्रा भाजीबाजार, जुना शहर येथील त्यांच्या राहत्या घरातून निघाली. नमाज-ए-जनाजा मस्जिद इक्बाल हैदरसमोर, त्यांच्या घराजवळ अदा करण्यात आली. या अंत्ययात्रेत अकोला आणि इतर जिल्ह्यांमधून हजारो लोक सहभागी झाले होते.

अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा

१

बुलडाणा, बुधवार ११ जून २०२५ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### मुंबई लोकल दुर्घटनेत जिल्ह्यातील युवक ठार

**दे.राजा :** मुंबईमध्ये झालेल्या भीषण ट्रेन अपघातात बुलढाणा जिल्ह्यातील एका युवकाचाही समावेश आहे. हा युवक मागील सुमारे चार वर्षापासून मुंबई पोलीस दलात कार्यरत होता. त्याच्या अपघाती निधनाची बातमी येऊन धडकताच देऊळगावराजा तालुक्यात शोककळा पसरली. जुमडा गावातील त्याच्या परिवारासाठी हा ९ जून रोजी सकाळी कसारा लोकलमधून प्रवास करणाऱ्या काही प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. लोकलमध्ये एकच गर्दी उसळल्याने तो लोकलच्या दरवाज्यात (फूट बॉर्डवर) लटकून प्रवास करीत होता. अनेक प्रवासी अशाच तऱ्हेने दरवज्यात लटकून प्रवास करीत होते.

### बुध्द विहारातील दानपेटी लंपास

**खामगाव :** तालुक्यातील पिं. राजा येथील शांतीदूत बुध्द विहाराच्या मुख्य दरवाजाला बसविण्यात आलेली लोखंडी दानपेटी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना काल ९ जून २५ रोजी सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी सतिष प्रल्हाद तेलंग यांनी पिं राजा पोस्टेला तक्रार दिली. तक्रारीवरून पोस्टेमध्ये अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल केला,

### युवकाचा खदानमध्ये बुडून मृत्यू

**खामगाव :** खामगाव स्थानिक जिया कॉलनी मधील रहिवासी अरबाज मलिक मो. नदीम (२७) हा युवक ८ जून २५ रोजी मित्रासोबत शेलोडी शिवारात गेला होता. यावेळी शेलोडी शिवारातील खदानीमध्ये अरबाज मलिक मो. नदीम हा पोहण्यासाठी पाण्यात उतरला मात्र त्याला पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्यामुळे पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते. स्थानिक नागरिकांच्या मदतीने अरबाजचा मृतदेह पाण्यातुन बाहेर काढण्यात आला.

### भुसावळ चौकात नेहमी वाहतुकीची कोंडी

**खामगाव :** शहरातील भुसावळ चौक रस्त्यावर कृषि केंद्र व इतर होलसेलची दुकाने असल्यामुळे नेहमी वाहतुकीची वर्दळ असते. त्यामुळे भुसावळ चौकात नेहमी वाहतुकीची कोंडी होत असते. काही मिनिटापर्यंत रस्ता जाम होत आहे. वाहतुक पोलिसाची ड्युटी नसल्यामुळे वाहतुक मोकळी होण्यास वेळ लागत आहे. याकडे पोलिस विभागाने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १०५० - २३०० |
| गहू | २४२५-२४७५ |
| तुर | ४१०० - ६६७५ |
| हरभरा | ४३०० - ५४५० |
| सोयाबीन | ३४००- ४३७५ |
| भुईमुग | ३८०० - ५२७५ |
| उडीद | ४२७५ - ६५५० |
| मक्का | १५०० - २०५५ |
| मूंग | ३००० - ६३०० |
| मलाई चना | ७०००-७२०० |
| बाजरी | १५५०- १५५० |

# मराठा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत योजना पोहोचवा - नरेंद्र अण्णासाहेब पाटील

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष यांनी घेतला आढावा

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.१०**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी महामंडळाच्या योजना व कामकाजाचा आढावा घेतला. महामंडळाच्या योजनांचा लाभ मराठा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावा, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील हे दोन दिवशीय शेगांव जि. बुलढाणा दौऱ्यावर आले होते. दौऱ्यादरम्यान अमरावती विभागाची जिल्हा निहाय आढावा बैठक शेगांव विश्रामगृह येथे पार पडली. यावेळी छत्रपती संभाजी नगर विभागीय समन्वयक प्रवीण आघवन, अमरावती विभाग अमेय परब, छत्रपती संभाजी नगर जिल्हा समन्वयक शुभम खरात, बुलढाणाचे पुरुषोत्तम अंभोरे वैभव मुंढे, सुरज जगताप तसेच अमरावती विभागातील सर्व जिल्हा समन्वयक व अखिल भारतीय मराठा महासंघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्रजी पाटील म्हणाले की, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून राज्यातील एक लाख मराठा युवकांना उद्योजक करण्याचे उद्दिष्ट पूर्ण झालेले असून येणाऱ्या काळात लाखो मराठा युवकांना स्वयंरोजगार मिळवून आत्मनिर्भर बनविण्याचा महामंडळ व राज्य शासन कटिबद्ध आहे.

जिल्हा स्तरावरील अधिकारी, बँकर्स यांच्या सोबत बैठका घेऊन मराठा समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत केला जाईल. तसेच प्रत्येक तालुका निहाय मराठा समाजाची वर्गवारी करणे, बँक प्रलंबित कर्ज प्रकरणे निकाली काढणे, नवीन जास्तीत जास्त उद्योजक तयार करण्याच्या सूचना जिल्हा समन्वयक यांना दिल्या. मराठा समाजातील युवकांनी, नेत्यांनी, पदाधिकारी पुढाकार घेऊन विभागातील सर्व तालुक्यात महामंडळाच्या योजनाचा प्रचार व प्रसार करावा व गरजूना लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# शेतकरी नेते पाटील यांच्या नेतृत्वात रक्तदान आंदोलन

## रक्त पिणाऱ्या व्यवस्थेचा रक्त देवून केला निषेध

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**दे.साकर्शा दि.१०**

बुलढाणा येथे जिल्हाअधिक्षक कृषीअधिकारी यांच्या कार्यालयासमोर आज जिल्हाभरातील शेतकर्यांच्या वतीने संभाजी ब्रिगेड जिल्हाकार्याध्यक्ष शेतकरी नेते पांडुरंग पाटील यांच्या नेतृत्वात रक्तदान आंदोलन ठेवन्यात आले आहे. यामद्ये व्यवस्थेने कायम शेतकरी वर्गाचे रक्त शोषण्याचे काम केले आहे त्यामुळे आता त्यांच्याच दारात न्यायासाठी शेतकरी रक्त देनार आहेत अशा भावना त्यांनी प्रसारमाध्यमांमद्ये व्यक्त केल्या.



यामद्ये प्रामुख्याने आश्वासन देवुनही विसर पडलेली शेतकरी कर्जमाफी,मागील वर्षीचे कृषीमंत्री यांनी मान्य केलेले येलो मोझॅक सहीत सर्वच शेतकर्यांचे पिकविमे तत्काळ जमा करने, एक रुपयात विमा योजना बंद करन्याचा निर्णय मागे घेने व इतर मागण्या प्रामुख्याने मांडन्यात येनार आहेत. यावेळी रक्तदान ऐच्छिक स्वरूपाचे असेल परंतु आपल्या शेतकरी बापाच्या सन्मानार्थ शेतकर्यांच्या पोरांनी आवर्जुन सहभागी होन्याचे आवाहन पांडुरंग पाटील यांच्या वतीने करन्यात आले आहे. आंदोलन जिल्हाकृषीअधिकारी कार्यालय,बस स्टैंड शेजारी, धाड रोड बुलढाणा येथे ठिक १२:०० वा. सुरु होईल असे कळवन्यात आले आहे. विमे व कर्जमाफी मिळवन्याची अंतिम संधी सम जुन जिल्हाभरातील बहुसंख्य शेतकर्यांनी हजर राहन्याचे आवाहन यावेळी करन्यात आले.

# सचिवाने लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप!

## गटविकास अधिकाऱ्यांकडे ग्रामस्थांची तक्रार

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मेहकर दि.१०**

लव्हाळा येथील ग्रामपंचायत सचिव हे लव्हाळा येथे नियमित ग्रामपंचायत ला उपस्थित हजर राहत नाही तसेच त्यांनी पंधरावा वित्त आयोगामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमित्ता करून मनमानीपणे खर्च केला, विकास आराखड्याप्रमाणे तसेच इस्टिमेट प्रमाणे व दर्जेदार कामे केले नाही तसेच साहित्या खरेदीमध्ये सुद्धा निकृष्ट दर्जाचे साहित्य खरेदी केले असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या बाबत मेहकर



गट विकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले की,जीएसटीचे बिल सुद्धा ग्रामपंचायतला उपलब्ध नाहीत त्यामध्येही मोठ्या प्रमाणात आर्थिक भ्रष्टाचार करण्यात आला व नियम डावलून बरेच घरकुल लाभार्थ्यांकडून बेकायदेशीरपणे आर्थिक लाभ करून घरकुलाचा लाभ दिला. एमआर ईजीएसच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमित्ता करून सदर कामे पंचायत समिती स्तरावर सादर करून करण्यात आले. मात्र खरे लाभार्थी डावलून खोट्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. तसेच पात्र लाभार्थ्यांना डावलण्यात आले.

सदर सचिव हे नागरिकांचे कामे करण्यासाठी नियमित ग्रामपंचायतला उपस्थित राहत नसल्याने नागरिकांमधून रोष व्यक्त होत असल्यामुळे क्रांतिकारक शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष गणेश गारोळे व पदाधिकाऱ्यांनी गटविकास अधिकारी मेहकर यांच्याकडे निवेदन देऊन लव्हाळ्यातील अनियमिता व भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्यासाठी समिती नेमावी व सचिव गणेश मस्के यांना तत्काळ निलंबित करून त्यांच्यावर कारवाई कराची अशा स्वरूपाची मागणी केली. येणाऱ्या काळात आक्रमक स्वरूपाचे आंदोलन करू असाही इशारा दिला आहे.

# डोणगाव येथे चुरीच्या नावाखाली रेती वाहतूक

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**डोणगाव दि.१०**

एकीकडे शासनाने रेती हर्रोशी केली नसताना बांधकामासाठी रेती मिळत नाही याचाच फायदा घेत डोणगाव येथे अवैध रेती आणून दहा ते बारा हजार रुपये ब्रास ने वाळू विकली जात आहे. ही वाळू विकण्यासाठी एका बाळू उतरवून ट्रॅक्टर व टिप्पर द्वारे ज्यावर नंबर ही नसतात अशा वाहनाद्वारे खुलेआम आत रेती व वरून चुरीचा थर टाकून वाहतूक केली जाते कारण चुरी म्हटले की पोलीस व महसूल याकडे लक्ष देत नाही पण पोलीस व महसूल विभागाने चूरीच्या वाहनाची रॉयल्टी पावती तपासल्यास हे बिंग फुटू शकते व रेती हात घालून खाली पाहिल्यास रेती वाहतूक उघडकीस येऊ शकते पण पोलीस व महसूल च्या अर्थपुर्ण सहकार्यामुळे डोणगाव येथे खुले आम रात्री अपरात्री व दिवसा चुरीच्या आड अवैध रेती वाहतूक होत आहे याकडे वरीष्ठ अधिकारी यांनी लक्ष देऊन त्वरित कारवाई करणे गरजेचे आहे.

# पंचायत समितीत घरकुलाचे काम मिशन मोडवर

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**सिं.राजा दि. १०**

सिंदखेडराजा पंचायत समितीला प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत दुसऱ्या टप्प्यातील नव्याने ७७३७ एवढे घरकुलाचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून त्यासाठी पंचायत समिती प्रशासन सज्ज झाले असून मंजूर घरकुल लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त करून घेण्यासाठी मिशन मोडवर काम करीत आहे, त्यासाठी आज दिनांक १० जून २०२५ रोजी तालुक्यातील ग्रामपंचायत मध्ये कॅम्प आयोजित करण्यात आले होते.

तसेच या ठिकाणी मोठ्या प्रमाणात घरकुलाची उद्दिष्ट प्राप्त झाले होते. अशा ठिकाणी इतर ग्रामपंचायत अधिकारी यांची सहकार्य करण्यासाठी नेमणूक करण्यात आली, त्याचबरोबर सनियंत्रणासाठी विस्तार अधिकारी दर्जाचे अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. घरकुलाचे प्रस्ताव प्राप्त करण्यासाठी आयोजित आलेल्या कॅम्पमध्ये एका दिवसात ३००० प्रस्ताव तयार करून पंचायत समिती कार्यालयास सादर करण्यात आले, तसेच उर्वरित लाभार्थ्यांचे प्रस्ताव येत्या सात दिवसात सादर करण्याच्या ग्रामपंचायत अधिकारी यांना गटविकास अधिकारी यांनी सूचना दिल्या.



सर्व घरकुल लाभार्थी यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी प्रस्ताव सादर करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयास संपर्क साधावा तसेच घरकुल प्रस्ताव मंजुरीसाठी कुठलीही आर्थिक देवाण-घेवाण करू नये.
अंकुश म्हस्के
गटविकास अधिकारी
पंचायत समिती सिंदखेड राजा

# मातंग समाजाचे प्रश्न अधिवेशनात मांडणार -आ.कायंदे



**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**दे.राजा दि.१०**

अनेक दशकापासून मातंग समाज हा वंचित दुर्बल घटकात जिवन जगत आला आहे. समाजातील विद्यार्थ्यांनी गुणवत्तावर भर देऊन आता उच्च शिक्षणातून संधीचं सोनं केले पाहिजे. यामुळे समाज देखील प्रगतीच्या दिशेने गेल्या शिवाय राहणार नाही. आरक्षण उपवर्गीकरणासह अनेक प्रलंबित प्रश्न मातंग समाजाचे येणाऱ्या पावसाळी अधिवेशनात प्रामुख्याने मांडणार असल्याचे प्रतिपादन सिंदखेड राजा मतदार संघाचे युवा आमदार मनोज कायंदे यांनी देऊळगाव राजा नगरपरिषद हॉल येथे मातंग युथ फेडरेशनच्या वतीने गुणवंत विद्यार्थी पालक सोहळा व नवनिर्वाचित आमदार सत्कार सोहळा व करीयर मार्गदर्शन कार्यक्रमाप्रसंगी केले.

कार्यक्रमाचे ऊद्घाटक आमदार मनोज कायंदे हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष भोकरदन मतदार संघाचे आमदार संतोष दानवे यांची उपस्थिती होती. विशेष मार्गदर्शक डॉ. किशोर आंबेगावकर, प्रमुख अतिथी मातंग युथ फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष ॲड. विलास साबळे,जिल्हा परिषद सदस्य शालीकराम मस्के डॉ.रामप्रसाद शेळके, राष्ट्रवादी युवा नेते संतोष खांडेभराड, उपविभागीय पोलीस अधिकारी मनिषा कदम, दतु पंडीत, माजी नगरसेवक नंदन खेडेकर, राजेश इंगळे , साळवे माजी नगरसेवक अजय शिवरकर, राष्ट्रवादी युवा नेते सुनिल लोखंडे, मातंग युथ फेडरेशनचे मिडीया प्रमुख पत्रकार संतोष जाधव उपस्थित होते.

यावेळी आमदार संतोष पाटील दानवे यांनी अध्यक्षीय भाषणात आपले विचार मांडतांना सांगितले की, मातंग समाजातील विद्यार्थ्यांना यापुढे शिक्षणासाठी कुठलीही अडचण निर्माण होणार नाही यासाठी आम्ही प्रयतशील राहू त्याचबरोबर अभ्यासिका, वाचनालय,दर्जेदार अशा व्यायाम शाळा उपलब्ध करून देणारं असल्याचे आमदार दानवे यांनी ग्वाही दिली. याप्रसंगी पोलीस उपविभागीय अधिकारी मनीषा कदम यांनी देखील सोशल मिडियाचा होणारा वापर मित्र कसे असावेत..? विद्यार्थ्यांना सविस्तर असे मार्गदर्शन केले. शाहू, फुले, आंबेडकर विचार मंच संस्थापक अध्यक्ष यांनी विचार व्यक्त करताना म्हणाले विद्यार्थ्यांनी व्यसना पासून दूर राहून आपल्या आई वडिलांच्या कष्टाला आकार द्यावा असे विचार व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी अश्विन गायकवाड , गजानन खरात, माधव गवळी,ॲड सुरेश खंदारे, राजू पाटोळे,विशाल उखंडे, ऋषीं खंदारे, अतिष आवसरमोल, नितीन खंदारे, श्रीधर भालेराव, मनोहर भालेराव, संजय लोखंडे यांनी परिश्रम घेतले.

# काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा सामूहिक राजीनामा

## माजी आ.सानंदाचे राष्ट्रवादी प्रवेशाचे पडसाद, काँग्रेस खामगाव विधानसभा मतदार संघात बॅकफुटवर

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.१०**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे स्वतःच्या जिल्ह्यातच पक्षाला मोठमोठे हादरे बसत आहेत. प्रथम माजी जिल्हाध्यक्ष विजय अंभोरे त्यानंतर माजी जि.प.सदस्य प्रकाश पाटील त्यानंतर माजी आमदार दिलीप कुमार सानंदा यांनी आपल्या सर्व पदांचा राजीनामा दिला आहे. आणि ते लवकरच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार आहेत. आपला नेता पक्षांतर करतोय म्हणून खामगाव मतदार संघातील काँग्रेसच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.

माजी आ. सानंदा हे दि. १२ जून रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची घड्याळ हातात बांधणार आहेत. त्याच अनुषंगाने कृषी उत्पादन समितीचे संचालक मंगेश इंगळे, संजय झुंझुनवाला, वैशालीताई मुजमुले, आणि सुलोचनाताई वानखडे यांनी आपल्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला. यापूर्वीच शहराध्यक्ष सरस्वती खासणे यांनी सुद्धा शहरअध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे.



खामगाव विधानसभा मतदारसंघात यत्र-तत्र-सर्वत्र काँग्रेस पक्षाचा ध्वज फडकवणारे माजी आमदार दिलीप कुमार सानंदा यांनी पक्षांतराचा निर्णय घेतल्यानंतर कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांमध्ये कमालीची अस्वस्थता निर्माण झाली होती. माजी आमदार दिलीप कुमार सानंदा सुध्दा काँग्रेस पक्षात काही दिवसांपासून अस्वस्थ असल्याचे दिसत होते. त्यांनी अखेर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात पक्षात प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले आहे. त्याच धर्तीवर दिनांक १२ जून रोजी खामगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरपरिषद मैदानावर भव्य संकल्प मेळाव्याच्या माध्यमातू सानंदा हे हातात घड्याळ बांधून घेणार आहेत. त्यांच्यासोबत असंख्य कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. त्याच अनुषंगाने काँग्रेस पदाधिकारी राजीनामाचे सत्र खामगाव विधानसभा मतदारसंघात सुरू झाले. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ काही प्रमाणात डॅमेज कंट्रोल करण्याच्या प्रयत्न करित असल्याचे दिसून येते त्यांनी नुकतेच खामगाव मतदार संघ प्रमुख, खामगाव तालुका अध्यक्ष, खामगाव शहराध्यक्ष या नियुक्त केले आहेत परंतु सानंदा



यांचे राष्ट्रवादी पक्षप्रवेशानंतर काँग्रेस पक्षाला मोठे खिंडार पडला आहे. त्यामुळे आपसूक काँग्रेस पक्ष बॅक फुटवर जाणार असल्याची चर्चा जोरदार रंगत आहे.

खामगाव शहरात संकल्प मेळाव्यासाठी सानंदा यांची जय्यद तयारी सुरू असून माहोल तयार करण्याचा प्रयत्न सानंदांच्या कार्यकर्त्यांकडून सुरू आहे. शहरात स्वागत फलक, शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वातावरण तयार करण्याचे संपूर्ण प्रयत्न सुरू आहेत. शहरात सर्वत्र पक्ष प्रवेशाच्याच चर्चा रंगत आहेत.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
बुधवार, दि. ११ जून २०२५

## थोडक्यात

### शिकवणी वर्गाला गेलेल्या युवतीला नेले पळवून

**धामणगाव रेल्वे :** शिकवणी वर्गाला गेलेली अल्पवयीन युवती वडिलांना एका युवकाच्या दुचाकीवर बसून जाताना दिसली. त्यांनी मुलाला हाक दिली. परंतु, युवकाने दुचाकी तशीच पुढे दामटत तिला पळवून नेले. याबाबत पालकांनी दत्तापूर पोलिसात तक्रार देत युवकाने फुस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त केला. पोलिसांनी प्रतिक देविदास फोलने (२५) याच्याविरुद्ध १३७ (२) कलमान्वये गुन्हा दाखल केला.

### शिंदी येथे क्षुल्लक कारणातून खुर्ची घातली डोक्यात

पथ्रोट : पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या शिंदी येथे क्षुल्लक कारणावरून एकाने दुसऱ्याच्या डोक्यात प्लास्टिक खुर्ची मारून जखमी केले. याबाबत रहेमत खाँ हमीद खाँ पठाण (४२) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी एका जणाविरुद्ध दुखापतीचा गुन्हा दाखल केला.

### काम सोडण्यास नकार दिल्याने केली मारहाण

**खल्लार :** सरकारी दवाखान्यात सफाई कामगार काम कामगार म्हणून करत असलेला काम सोडण्यास गावातीलच तिघांनी रवींद्र अंबादास चवरे (४१, रा. चंद्रपूर) याला काठीने मारहाण करीत जखमी केले. ही घटना खल्लार पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या चंद्रपूर येथे घडली. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अतुल रुपराव बनसोड (४५), रवि रुपराव बनसोड (५२) व प्रतार रुपराव बनसोड (४७) यांच्याविरुद्ध ११८ (१), ११५(२), ३५२, ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल केला.

### वराह पकडण्यासाठी वाद; परस्परविरोधी गुन्हे दाखल

**धामणगाव रेल्वे :** दत्तापूर येथील महात्मा गांधी चौकाम वराह पकडण्यावरून दोघांमध्ये वाद झाला. त्यातून एक दुसऱ्याला शिविगाळ करीत व जीवे मारण्याची धमकी देत मारहाण केली. दोघांनीही परस्परविरोधी तक्रारी दाखल केल्यात. दत्तापूर पोलिसांनी त्या आधारे राजेश गणेश मार्वे (४२) व गोलू बबन राठी (३८) दोघेही रा. जुना धामणगाव यांच्या विरुद्ध ११८ (१), ३५१ (२), ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल केला.

### मोर्शी येथे युवकाला क्षुल्लक कारणावरून मारहाण

**मोर्शी :** बारमध्ये गेलेल्या युवकाला आणण्यासाठी गेलेल्या युवकाला एकाने क्षुल्लक कारणावरून शिविगाळ करीत मारहाण केली. ही घटना शहरातील जयस्तंभ चौकात घडली. याबाबत अमोल सुधाकरराव दवंडे (३३) याने मोशी पोलिसात तक्रार नोंदवली. पोलिसांनी शिवदास सिमलकर (२५) याच्याविरुद्ध ११८(१), ३५१(२/३), ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल केला.

# माजी मंत्री बच्चू कडूंचे आंदोलन पेटले

## चांदूरबाजारमध्ये सरकार विरोधात मुंडण

## अन्नत्याग आंदोलनाची धग; शेतकरी आणि दिव्यांगांचा एल्गार







चांदूर बाजार : तालुक्यातील गावागावातून आलेल्या शेतकरी महिलांनी बच्चू कडूंच्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून चुल बंद ठेवण्याचा निर्णय घेतला.

अजिंक्य भारत
गजानन ढवळे/गजानन कावरे

**चांदूर बाजार, दि. १० : शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते आक्रमक झाले असून प्रहारच्या कार्यकर्त्यांनी पूर्णा मध्यम प्रकल्पाच्या विश्रोळी येथील जलाशयात जलसमाधी आंदोलन सुरू केले आहे, त्यामुळे पोलीस यंत्रणेवरील ताण वाढला आहे.**

**बच्चू कडू यांनी गुरूकुंज मोझरी येथे गेल्या तीन दिवसांपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाच्या समर्थनार्थ कार्यकर्त्यांनी जलाशयात उड्या घेतल्या, असे प्रहारच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. प्रहारचे पंधरा ते वीस कार्यकर्ते पूर्णा धरणाच्या जलाशयात घोषणा देत उभे आहेत. हे आंदोलनाची धग सर्वत्र पसरली असून गांवगावचे शेतकरी आंदोलनाला पाठिंबा देत आहे. आंदोलनाने आता चांगलाच पेट घेतला असून गावगावी चुलबंद आंदोलनाचा एल्गार शेतकरी महिलांनी पुकारला आहे. बुधवारी चांदूर बाजार तालुक्यासह इतरही गावांमध्ये चुलबंद राहणार आहे.**

राज्यातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, शेतमजुरांच्या उत्कर्षाकरिता स्वतंत्र आर्थिक महामंडळ, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या मजुरीत वाढ, शेतकऱ्यांप्रमाणे शेतमजुरांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याला विमा संरक्षण मिळावे, शेतमजुरांचे आर्थिक हित जपण्याकरिता रिता स्वतंत्र मंडळाची उभारणी व्हावी, लागवड ते

**खोळंबलेला पगार एका क्षणात बँकेत जमा**

जनार्दन परसराम राऊत, वनी तालुका चांदूरबाजार जिल्हा अमरावती यांनी आज जलसमाधी आंदोलनात सहभाग घेताच जलसमाधीस्थानिक प्रशासनाने त्यांच्या मागील सहा महिन्याचा खोळंबलेला पगार एका क्षणात बँकेत जमा केला, बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाच्या यशस्वीतीला सुरुवात झाली असल्याची चर्चा यावेळी परिसरात जोर धरू लागली आहे.

कापणीपर्यंतच्या सर्व शेतीकामांचा समावेश महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत करावा. हे शक्य नसल्यास तेलंगणाच्या धर्तीवर एकरी 10 हजार रुपयांची मदत देण्यात यावी.

रासायनिक खतांप्रमाणे सेंद्रिय तसेच मेंढी खतालादेखील अनुदान देण्याची तरतूद करण्यात यावी, दुधातील भेसळ रोखत गाईच्या दुधाला 50 रुपये तर म्हशीसाठी 60 रुपये प्रतिलिटर असा दर निश्चित करावा. कांद्याचे दर स्थिर राहावेत याकरिता 40 रुपये दर होईस्तोवर निर्यात बंदी लागू करू नये, अशा मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. आज आंदोलनाचा तिसरा दिवस आहे.

राज्यातील शेतकरी व दिव्यांग बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी जनतेचा खंदा लढवय्या नेता, माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी कालपासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधीस्थळ, मोझरी येथे बेमुदत अन्नत्याग उपोषणाला प्रारंभ केला आहे. दोन दिवस उलटूनही सरकारने कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्याने राज्य सरकारचा निषेध करण्यासाठी आज मंगळवारी सकाळी ११ वाजता शेकडो शेतकरी व दिव्यांग बांधव चांदर बाजार तहसील

कार्यालयावर मुंडन आंदोलन करणार आहेत. राज्यातील लाखो शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, शेतमजुरांसाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ, मनरेगाच्या मजुरीत वाढ, शेतमजुरांना विमा संरक्षण, सेंद्रिय खतांना अनुदान, तसेच दूध उत्पादकांना योग्य दर या प्रमुख मागण्यांसाठी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधीजवळ दोन दिवसांपासून बेमुदत अन्नत्याग उपोषण सुरू केले आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी सरकारने शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफी आणि सातबारा कोरा

करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, निवडणुका संपून सत्तास्थापनेला अनेक महिने उलटले तरीही शेतकऱ्यांच्या समस्या जशाच्या तशाच आहेत. त्यामुळे शासनाच्या झोपेच्या सोंग विरोधात हा निषेध राहणार असून या आंदोलनामुळे प्रशासनाची झोप उडाली आहे. शेतकरी, शेतमजूर व दिव्यांगांच्या न्याय्य मागण्यांकडे सरकारने गांभीर्याने पाहावे, हीच आमची मागणी आहे. हा लढा केवळ काहीजणांचा नाही, तर सर्वसामान्यांच्या हक्काचा आहे,

### अनेक गटांचे मिळताहेत जाहीर पाठिंबे

शिवसेना ठाकरे गटाने बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. दर्यापूर मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार गजानन लवटे यांनी गुरूकुंज मोझरी येथे पोहचून उपोषणस्थळी बच्चू कडू यांची भेट घेतली. त्यांच्या समवेत संपर्कप्रमुख सुधीर सूर्यवंशी हेही होते. आंदोलनाच्या प्रत्येक पायरीवर बच्चू कडू यांची साथ देण्याचा निर्णय गजानन लवटे यांनी जाहीर केला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत बच्चू कडू यांची भेट घेणार असल्याचे संकेत गजानन लवटे यांनी दिले. तर माजलगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी हि बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला त्यासोबतच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रविकांत तुपकर यांनी हि आपला पाठिंबा जाहीर केला आहे. शिवसेना उबाठा गटाचे आमदार नितीन बाप्पू देशमुख हे उद्याला गुरुकुंज मोझरी मध्ये दाखल होणार आहेत. माजी मंत्री आ. विश्वजीत कदम यांनीही आपला पाठींबा बच्चू कडू यांना दिला आहे. तर धाराशिव लोकसभा मतदार संघाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी अन्नत्याग आंदोलनास पाठिंबा दिला आहे. धाराशिव विधान सभा मतदार संघाचे आ. कैलास पाटील यांनीही बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनास जाहीर पाठिंबा दिला आहे.



जनार्दन परसराम राऊत, वनी तालुका चांदूरबाजार जिल्हा अमरावती यांनी जलसमाधी घेतल्यामुळे लगेच प्रशासनाने त्यांच्या मागील सहा महिन्याचा खोळंबलेला पगार एका क्षणात बँकेत जमा केला. बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाच्या यशस्वीतीला सुरुवात.

### शेतकरी पुत्र म्हणून माझा आंदोलनाला पाठिंबा



राज्यातील महायुती सरकारने सर्वसामान्य जनतेला फसवण्याचे काम केलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीच्या काळात मोठमोठ्या घोषणा केल्या कि आम्ही शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू, मात्र अजूनही शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झाला नाही. उलट उपमुख्यमंत्री असलेल्या अजित पवारांनी एप्रिल अखेर कर्ज भरण्यास सांगितल. म्हणजे तुम्ही नुसत्या घोषणा केल्या, आणि त्या घोषणेवरच मते पदरात पाडून घेतली आणि सत्तेत आलात. पण जर तुम्ही आम्हाला फसवून सत्तेत बसणार असेल तर आम्ही तुम्हाला सुखाने जगून देणार नाही, आणि यासाठी बच्चू कडू आज अन्नत्याग उपोषणाला बसलेले आहेत असं कराळे मास्तरांनी म्हंटल. शेतकऱ्यांना कर्जमाफी झाली पाहिजे, शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव मिळाला पाहिजे, दिव्यांगांना न्याय मिळाला पाहिजे. मात्र दिव्यांगांचे पैसे लाडक्या बहीण योजनेकडे वळवण्याचे काम चालू आहे असा आरोप कराळे मास्तरांनी सरकारवर केला. बच्चू कडू यांचे आंदोलन हे शेतकरी, कष्टकरी, भूमिहीन, शेतमजूर आणि दिव्यांगांसाठी आहे आणि एक शेतकऱ्याचा मुलगा म्हणून माझा बच्चू कडू यांच्या सोबत उभा आहे. जर सरकारने २ दिवसात आमच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत तर मी सुद्धा वर्धा येथे असच आंदोलन करेन आणि सरकारला जाग्यावर आणेन असा इशारा कराळे मास्तरांनी दिला. जोपर्यंत आपण आपले मुद्दे मांडणार नाही तोपर्यंत सरकार काहीही देणार नाही.

# सुनील खराटे यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश

**अमरावती, दि. १० :** शहरातील सामाजिक कार्यकर्ता व स्थानिक राजकारणात सक्रीय असलेले सुनील ब. खराटे यांनी आज अधिकृतपणे ७ प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व ७ कार्याध्यक्ष रविंद्र चव्हान यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. आपल्या निर्णयामागील भूमिका स्पष्ट करताना त्यांनी भारतीय जनता पक्षाचे स्थिर नेतृत्व, विकासाभिमुख धोरणे, आणि ७ राष्ट्रीय विचारसरणीचा उल्लेख केला.

खराटे यांनी स्पष्ट केले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, अमित शाह यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची कार्यक्षमता हीच देशाच्या विकासाची खरी दिशा आहे. मला राष्ट्रहितासाठी व्यापक पातळीवर काम करण्याची इच्छा आहे, आणि ती संधी मला भारतीय जनता पक्षातच मिळू शकते, असे त्यांनी सांगितले. जनतेशी थेट संवादाचा



संकल्प सरकार आणि नागरिक यांच्यातील दरी कमी करणाऱ्या भाजप च्या धोरणामुळे मतदारांशी थेट संवाद साधता येतो, आणि लोकांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर कार्यवाही करता येते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मी भारतीय जनता पक्षात सामील होत असून, माझे कार्य हे नि:स्वार्थ आणि समाजहितासाठीच राहील. अमरावती शहर, महाराष्ट्र राज्य, आणि देशासाठी मी सतत कार्यरत राहील असे सुनील खराटे यांनी स्पष्ट केले.


चांदूर बाजार : येथे आज वटसावित्री निमित्त महिलांनी वटवृक्षाचे पूजन करून वटसावित्रीचा सण साजरा केला. छायाचित्र रोशन वानखडे






## थोडक्यात

### मुलगी झाली म्हणून विवाहितेचा छळ

**अमरावती :** लग्नानंतर दोन महिने चांगली वागणूक दिल्यावर पतीसह सासरच्यांनी आपला रंग दाखवणे सुरू केले. लहान सहान कारणावरून तिला त्रास देणे सुरू केले, तर नणंद कमीत कमी पाच वर्षे तरी बाळ नको म्हणून तिचा छळ करीत होती. दरम्यान मुलगी झाल्याने तिच्या छळात आणखी भर पडली. याबाबत विवाहितेने नागपुरी गेट पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी पती फिरोज खान दिलावर खान (३४) व अन्य एका महिलेविरुद्ध ८५ कलामान्वये गुन्हा दाखल केला.

### वीज चोरी करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

**अमरावती :** घराजवळ असलेल्या लोखंडी खांबावरील महावितरणच्या लघु दाब वाहिनीवर अनाधिकृतपणे आकोडा टाकून वीज चोरी करणाऱ्या दोघांवर बडनेरा पोलिसात भारतीय विद्युत कायद्याच्या १३५ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत वडाळी महावितरण केंद्राचे सहाय्यक अभियंता मुकेश उमाकांत मालेगावकर (४७) यांनी तक्रार नोंदवली.

### रस्त्यावर ऑटो उभ्या करणाऱ्यांवर कारवाई

**अमरावती :** रस्त्यांच्या मध्येच रहदारीला अडथळा निर्माण करीत ऑटो उभ्या करणाऱ्या दोन ऑटो चालकांवर बडनेरा पोलिसांनी कारवाई केली. त्यांच्यावर २८५ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. अयाज खान हबीब खाान (४९) व अब्दुल आदिल अब्दुल जमील (२५) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या ऑटो चालकांची नावे आहेत.

### जाळून युवकाने केली आत्महत्या

**अमरावती :** राहत्या घरी युवकाने स्वत:ला जाळून घेत आत्महत्या केली. ही घटना हाजरा नगर येथे घडली. फिरोज खान बशीर खान (३६) असे मृतकाचे नाव आहे. याबाबत मृतकाचा भाऊ शरीफ खान नशीर खान (३५, रा. हैदरपुरा) याने नागपुरी गेट पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी मर्ग दाखल केला.

### जुन्या भांडणाच्या वादातून युवकाला मारहाण

**अमरावती :** जुन्या भांडणाच्या वादातून चौघांनी नोकराला सोडून देण्यासाठी गेलेल्या युवकाला रस्त्यात गाठून मारहाण केली. शिविगाळ करीत जीवानिशी मारण्याची धमकी देत त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. ही घटना गुलीस्ता नगर येथील पुलाजवळ घडली. याबाबत जखमी अब्दुल अजमल अब्दुल आसीफ (२०) याने नागपुरी गेट पोलिसात तक्रार दिली. तक्रारीच्या आधोर पोलिसांनी शेख सोहेल शेख शफी (२२), रेहान खान (१९), अकील भोपळा (२१) व शेख फईम (२३) सर्व रा. गुलीस्ता नगर यांच्यावर ११५(२), २९६, ३५१(३), ३२४(४), ३(५) कलमांतर्गत गुन्हा दाखल केला.

### निधन वार्ता

### विठ्ठलराव संपतराव पानझाडे यांचे निधन

**दर्यापूर-** दर्यापूर येथील पशु विकास अधिकारी डॉक्टर रणजीत पानझाडे यांचे वडील विठ्ठलराव संपतराव पान झाडे यांचे वृद्ध काळाने दु:खद निधन झाले मृत्यू समय त्यांचे वय ८७ वर्षे होते त्यांचे इच्छेप्रमाणे मृत्यूनंतर त्यांचा पार्थिव हा डॉक्टर पंजाबराव देशमुख हॉस्पिटल ला घेण्यात आला देहदान केल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे त्यांच्या मागे पत्नी मुलं मुले नातू असा फक्त परिवार आहे.



# शासन योजनेत ९ किलो बियाण्यांची दांडी!

## शेतकऱ्यांना ७५ नव्हे, ६६ किलोच सोयाबीन बियाणे वाटप

- मोफत बियाणे योजनेत गोंधळ
- शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :** राज्य शासनाच्या मोफत शंभर टक्के बियाणे वाटप योजनेअंतर्गत शेतकऱ्यांकडून ऑनलाईन अर्ज घेऊन स्विकारले जाते. या शेतकऱ्यांना ७५ किलो सोयाबीन बियाणे मोफत देण्याचे शासनाने निर्देश आहे. परंतु प्रत्यक्षात अमरावती शहरात स्थापन करण्यात आलेल्या दोन वितरण केंद्रांवर केवळ २२ किलोच्या तीन बंग म्हणजे ६६ किलो बियाणेच वितरित केले जात आहे. परिणामी

९ किलो बियाण्याची कमी दिले जात असल्याने शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांना सोयाबिनची प्रमाणित बियाणे शंभर टक्के अनुदानावर देण्यात येते. ३ हजार हेक्टरची मर्यादा याकरिता देण्यात आली असून ३ हजार हेक्टरपर्यंत अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांना एका हेक्टरकरिता ७५ किलो बियाणे देण्याचे शासनाचे निर्देश आहे. याकरिता शेतकऱ्यांना महाडिविटीवरुन ऑनलाइन अर्ज करावा लागतो. जिल्ह्यात या योजनेअंतर्गत अर्ज केले असून याची पहिली यादी प्रसिध्द केली आहे. अमरावती शहरामधील विदर्भ कृषी केंद्र व कृषी आनंद सेवा केंद्रातून ज्या शेतकऱ्यांना यादीत नावे आहेत.

त्यांना मोफत बियाण्यांचे वाटप सूरू आहे. शेतकऱ्यांना ७५ किलो बियाणे मंजुर झाले असताना मात्र प्रत्यक्षात २२ किलोचे तीन पॉकिट असे ६६ किलो बियाणे दिल्या जात आहे.



> शासनाने शंभर टक्के अनुदान बियाण्याकरिता घोषित केले असताना ९ किलो बियाणे कमी दिले जात आहे. मग शासनाकडून ७५ किलो का घोषित केले. ६६ किलो असे जाहिर करावे. ही एक प्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक आहे. शासनाने याची दखल घ्यावी.
>
> **उमेश महिंगे, शेतकरी**

> त्या बियाणे कंपनीचे पॅकिंग हे २२ किलोचेच आहे. त्यामुळे पॉकिट फोडून बियाणे देता येत नाही. त्यामुळे त्यांना ६६ किलो बियाणे दिली जात आहे. परंतु सदर कंपनीला ६६ किलोचेच पैसे शासनाकडून दिले जाते. काही ठिकाणी २२ किलोचे दोन आणि ३० किलोची एक असे ७४ किलो बियाणे दिले जात आहे.
>
> **राहुल सातपुते, जिल्हा कृषी अधिक्षक**

त्यामुळे शेतकऱ्यांना उर्वरित ९ किलो बियाणे खासगी विक्रेत्याकडून वेगळी व्हेरायटीचे खरेदी करावे लागत आहे. कारण १ हेक्टरमध्ये ७५ किलो बियाण्याची शेतकऱ्यांना आवश्यकता असल्याने ९ किलोकरिता त्यांना व्हेरायटी बदलावी लागत आहे. शासनाने योजनेत ७५ किलोचा लाभ जाहीर केला असताना प्रत्यक्षात ६६ किलोवरच समाधान मानावे लागत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना वाढीस लागली आहे.

## बडनेरातील माझा वनवास संपला - आ.संजय खोडके

### आ.संजय खोडके व सौ. सुलभा खोडके यांचा हृदयस्पर्शी सत्कार

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :** आपल्या राजकीय प्रवासाला बडनेरा शहरातून सुरुवात झाली असून जनतेचा विश्वास,साथ व प्रत्येक कार्यात बडनेरावासीयांचे मिळालेले सहकार्य यातूनच आपली राजकीय वाटचाल आजपर्यंत बहरत गेली आहे. अमरावतीच्या जुडवा नगरी असलेल्या बडनेरा शहरासाठी फार काही करायचे होते, परंतु दरम्यानच्या काळात राजकारणातील काही फेरबदलामुळे ते शक्य झाले नाही. गेल्या १५ वर्षाच्या काळात बडनेरा शहराकडे थोडे दुर्लक्ष झाले असेल,मात्र जुन्या सहकाऱ्यांशी असलेला ऋणानुबंध आजही कायम आहे. ज्यांनी आपल्याला मोठे केले त्यांच्यासाठी काही तरी करणे हे आपले कर्तव्यच आहे. आता बडनेरा मधील आपला वनवास संपला असून जुन्या-नव्या सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन पायाभूत विकास व मानवविकास साधण्याचा प्रयत्न आगामी काळात करणार असल्याची ग्वाही महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य आ.संजय खोडके यांनी दिली.




राज्यविधीमंडळाच्या वरिष्ठ सभागृह असलेल्या विधानपरिषदेवर बिनविरोध वर्णी लागल्याबद्दल आ.संजय खोडके व अमरावती मतदार संघातून दुसऱ्यांदा व महाराष्ट्र विधानसभेवर तिसऱ्यांदा निवडून आल्याबद्दल आ.सौ. सुलभाताई खोडके यांचा बडनेरा नगरीला अभूतपूर्व सत्कार करण्यात आला. नवीवस्ती बडनेरातील महावीर भवन येथे झालेल्या या सत्कार सोहळ्या दरम्यान बडनेरावासीयांनी आपल्या दोन्ही लाडक्या नेत्यांवर भरभरून अभिनंदनाचा वर्षाव करीत आपली साथ दर्शविली. याप्रसंगी व्यासपीठावर अशोकजी बाकलीवाल, राधेश्यामजी अग्रवाल, शिवशंकर टाले, अरुण कडू, तैय्यबभाई, किशनचंदसेठ कोटवानी, चंद्रकांत उर्फ चंदुभाऊ पाटील, लांडोरे गुरुजी, भाजपा प्रदेश प्रवक्ते- शिवराय कुलकर्णी, प्रा.डॉ. अलबीना फिरोजखान मनपा माजी सभापती जयश्री मोरे, पापेसिंग ठाकूर, माजी मनपा सदस्य कल्पनाताई भैसे, इशरतबानो मन्नानखान, चंदूमल बिल्दानी, राजेंद्र दारोकार, अयूबभाई, तसेच डॉ. राजेश शिंदे, संजय मुंगळे, सचिन डहाके, सोमेश्वर मोरे आदी उपस्थित होते. आ.संजय खोडके म्हणाले की, राजकारणामध्ये विजय -पराजय चालतच असतात, पराभवाने आपण डगमगलो नाही, तर जनतेची कामे करतच आलो, बडनेऱ्यात काही काळ फारसे सक्रिय नसल्याने कार्यकर्त्यांसोबत ताटातूट झाली. मात्र त्यांनी कधीही आवाज दिला तरी ते धावून येतील याची खात्री होती. म्हणूनच आज बडनेरावासियांचे आपल्या प्रतीचा स्नेह व जिव्हाळा पाहून आपण कृतज्ञ झालो असल्याचे भावोद्गार सुद्धा आ.संजय खोडके यांनी व्यक्त केले.

या सोहळ्याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बडनेरा शहर ,ज्येष्ठ नागरिक संघ बडनेरा , तिरळे कुणबी मराठा समाज बहूउद्देशीय समिती, तिरळे कुणबी समाज महिला भगिनी मंडळ ,नवी वस्ती बडनेरा सुभाष चौक स्थित एकता मंडळ, स्वराज मंडळ, पूज्य सिंधी पंचायत समिती, कुरेशी बिरादरी, व्यापारी एकता संघटना, बजरंग गणेश मंडळ, श्रीराम नवमी शोभायात्रा समिती, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा समिती बडनेरा , केबल असोशिएशन यासह विविध सामाजिक संघटनांच्या वतीने आ.संजय खोडके व आ. सुलभाताई खोडके यांचा हृद्य सत्कार करण्यात आला.

## युवकांनी शिवाजी महाराजांचे विचार आत्मसात करावे-आ. राजेश वानखडे

### मोझरी आय टी आय येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**मोझरी, दि. १० :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोझरी येथे दिनांक 6 जून 2025 ला छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन सोहळा साजरा करण्यात आला .



तिवसा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार मा.श्री राजेश वानखडे यांनी सर्व प्रशिक्षणार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार आत्मसात करून स्वत:ची प्रगती करावी याकरीता युवकांनी शिवाजी महाराजांच्या विचारावर वाटचाल करणे आवश्यक असल्याचे आवाहन त्यांनी केले . त्यांनी संस्थेतील सर्व समस्या सोडवण्याबद्दल आश्वासित केले . प्रमुख मार्गदर्शक श्री शेखरजी भातकुले यांनी प्रशिक्षणार्थ्यांना भारतीय राज्यघटनेमध्ये नमूद कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडण्याचे आवाहन केले व त्याबद्दल मार्गदर्शन सुद्धा केले. प्रमुख पाहुणे माननीय रुपेश राऊत यांनी सुद्धा प्रशिक्षणार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. संस्थेचे प्राचार्य आनंद वाळके यांनी प्रशिक्षणार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श पुढे ठेवून सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी आपले उद्दिष्ट साध्य करावे तसेच सर्वांनी जातीभेदाचे निर्मूलन करून राष्ट्रीय एकात्मता वाढवावी असे आवाहन केले. संस्थेचे गटनिदेशक श्री गावंडे सर यांनी प्रास्ताविक सादर केले तर शिल्प निदेशक श्री मेंढे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गटनिदेशक चौधरी, निदेशक एम. एस. राऊत, महाजन, कथलकर, म्हैसकर, तडस, जाधव, शेलोकार, अढाऊ, पी. आर. राऊत, वणवे, कडू, धोटे, काळबेंडे, आसोडे, बिजवे, निंभोरकर, एस. एस. राऊत, तंबाखे, कु. जावरकर, गोरटे, नागपुरे, दवाडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

## विद्यार्थ्यांनो पुस्तक वाचनाचा छंद जोपासा - प्रकाश शेलापुरकर

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :** पुस्तकांचे सतत वाचन केल्याने ज्ञान अद्ययावत होते आणि माणूस सुजान बनते. पुस्तक जीवन जगण्याची कला शिकवतात. व्यक्तीला सन्मार्गाला लावतात म्हणून विद्यार्थ्यांनो थोर पुरुषांचा आदर्श बाळगून नेहमी पुस्तकांच्या सहवासात राहून पुस्तक वाचनाचा छंद जोपासा असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते प्रकाश शेलापुरकर यांनी केले. जुनी टाकसाळ बुधवार अमरावती येथील सामा कार्यकर्ते संजय खंडारे यांचा पुतण्या चि.चैतन्य नरेंद्र खंडारे याला इयत्ता दहावी मध्ये ८४.४० टक्के गुण मिळाल्याबद्दल तसेच कु.पायल उमेश खंडारे हिला ६१ टक्के गुण मिळाल्याबद्दल, सर्वोदय कॉलनी येथील कु.चंचल सचिन वानरे हिला ७७.४० टक्के गुण मिळाल्याबद्दल राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे अमरावती येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ व संत रविदास महाराज पुस्तिका देऊन दोघांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकाश शेलापुरकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, राजु चव्हाण, बाळकृष्ण गव्हाळे, मारोती पाचखंडे हे होते. यावेळी विद्यार्थ्यांचे आई-वडील व कुटुंबीय तसेच परिसरातील समाजबांधव उपस्थित होते.




## सीईओ संजिता महापात्र यांना 'स्कॉच अवॉर्ड' जाहीर

### मिशन मेळघाट २८ उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीची राष्ट्रीय पातळीवर दखल

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांना या वर्षाचा प्रतिष्ठेचा स्कॉच अवॉर्ड जाहीर झाला आहे. हे पारितोषिक त्यांना मेळघाटमधील कुपोषण, बालमृत्यू व मातामृत्यू रोखण्यासाठी राबविलेल्या 'मिशन मेळघाट २८' या नावीन्यपूर्ण उपक्रमासाठी प्रदान करण्यात आले आहे.



जानेवारी २०२२ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी झाले असून संस्थात्मक प्रसूतीत लक्षणीय वाढ झाली आहे. त्याचा थेट परिणाम म्हणून २०२२ पासून आई व बाळाच्या मृत्यूच्या घटनांमध्ये घट झाली आहे. मिशन मेळघाट २८ या उपक्रमाची नोंद देशभरातून निवडलेल्या 1 हजार प्रकल्पांपैकी एक म्हणून झाली. या प्रकल्पाचे पहिले सादरीकरण २६ मार्च रोजी सीईओ संजिता महापात्र यांनी स्कॉच ज्यूरी सदस्यांसमोर सादर केले. त्यानंतर 'ऑर्डर ऑफ मेरीट' साठीची रेटिंग प्रक्रिया पार पडली. ज्यातून 50 प्रकल्पांची सेमी फायनलसाठी निवड झाली. ६ जून रोजी अंतिम सादरीकरणात देशभरातून निवडलेल्या २० उत्कृष्ट प्रकल्पांमध्ये मिशन मेळघाट २८ ची निवड झाली आणि या उपक्रमासाठी संजिता महापात्र यांना स्कॉच अवॉर्ड जाहीर करण्यात आला. सप्टेंबर 2025 मध्ये नवी दिल्ली येथे अवॉर्ड वितरण होणार आहे.

## बिना नंबरच्या गाड्यांचा सुळसुळाट

**मोर्शी, दि. १० :** मोर्शी शहरात सध्या बगर नंबर प्लेटच्या गाड्या चालविणाऱ्यांचा सुळसुळाट झाला असल्याचे पाहून मोर्शीचे ठाणेदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शहराच्या मेन चौकात नाकाबंदी करून अशा प्रकारच्या वाहतूक करणाऱ्या गाड्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत असल्यामुळे बगर नंबर प्लेटची गाडी चालवणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. मोर्शी शहरासह तालुक्यात कित्येक टू व्हीलर वाहनधारक बगर पासिंग व नंबर प्लेटच्या गाड्यांची वाहतूक करीत असून या गाड्यांनी अपघात घडल्यास त्या वाहनधारकाचा पत्ता सुद्धा लागणार नाही. नुकतेच सिंभोरा रोडवर एका टू व्हीलर वाहनधारकाने महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत झटका देऊन लंपास केल्याची घटना घडली.त्या अनुषंगाने ठाणेदार नितीन देशमुख यांनी कडक पाऊल उचलून बगर नंबर प्लेटच्या वाहनधारकांवर कारवाई सुरू केली आहे.

## डॉ. बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीचे सेवक बना -धम्मचारी विवेकचित्त

**मेळघाट, दि. १० -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ ला आपल्याला धम्म दिक्षा देऊन तथागत भगवान बुद्ध यांच्या धम्म प्रवाहात सामील करून आपला सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक तसेच सर्वांगिन विकास घडवून आणला असला तरी पाहिजे तसा विकास झाला नाही त्यासाठी आपण शिबीर केंद्रात जाऊन सिबिराचे साक्षीदार बनवून धम्मक्रांतीचे सेवक बनून समाजाच्या सोबतच आपला विकास घडवण्याचे आवाहन बिहाली (मेळघाट) येथे तथागत बुध्दाच्या भूमीस्पर्श मुद्रेच्या मूर्तीच्या अनावरण प्रसंगी अचलभूमी प्रशिक्षण केंद्र, बिहाली येथील धम्मचारी विवेक चित्त यांनी केले. ते समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. मूर्तिचे उदघाटन तुळसाबाई ढोके यांच्या हस्ते करण्यात आले, प्रमुख अतिथी म्हणून भाऊसाहेब सरकटे, रेखाताई सरवटकर (गवई ), शिरीष, गवई, सिद्धार्थ सावळे,किसनराव वानखडे ( चिखलदरा ) उपस्थित होते.



नागपूर येथील सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर वाहने यांनी आपल्या वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ बिहाली येथील अचलभूमी प्रशिक्षण केंद्रात ही मूर्ती दान देण्यात आली असता हा अनावरण समारंभ आयोजित केला होता. सर्वप्रथम विधिवत, त्रिशरण, पंचशील घेऊन काही मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला भीमराव ठवरे, रमेश सावळे, विश्वास पाचपाटील, अशोकराव दामले, प्रदीपराव गवई, अशोकराव गवई, विनायकराव उके, दीपक रंगारी, रामदास ठवरे यश रंगारी, सुमित गेडाम, स्वप्नील चौरे, सतीश ढोके, सुखदेव जामनेकर, यश जामनेकर, भारत भन्ते, अतुल धंदर,सीमा जामनेकर, अलका जामनेकर, आम्रपाली ढोके, मंजू ढोके, सीमा बनसोड, शिल्पा सोमकुवर यांनी यशवितेसाठी प्रयत्न केले.याप्रसंगी धम्चारिणी पद्मकल्याणी, आर्यश्री यांनी मनोगतातून तथागत बुध्दाच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन धम्मचारिणी निलोतपला, प्रास्तविक रत्नाकर वाहने यांनी तर आभार प्रदर्शन राजमाता जिजाऊ बहुउद्धेशीय संस्थेचे अध्यक्ष संजय सरवटकर यांनी केले. कार्यक्रमाला असंख्य उपासक तथा उपासिका उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता भोजनदानानी झाली.

# पिंपळखुटा येथून ५४ हजारांचे अनधिकृत बियाणे जप्त

## आरोपीला अटक : कृषी विभागाच्या पथकाची कारवाई

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**वरूड, दि. १० :** तालुक्यातील पिंपळखुटा येथे अनधिकृत कापूस बियाण्यांची जादा दराने विक्री सुरू असल्याची माहिती कृषी विभागाला मिळाली होती. कृषी विभागाच्या पथकाने सापळा रचून ५४ हजार रुपये किमतीचे ४५ पाकिटे जप्त केली आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई गुरुवारी दुपारी ३ वाजताच्या सुमारास करण्यात आली. अजिंक्य धनराज पडोळे (२५) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

**पिंपळखुटा येथील अजिंक्य पडोळे** हे संशयित प्रतिबंधित एचटीबीटी कपाशी बियाण्यांची विक्री करीत असल्याची माहिती कृषी विभागाला मिळाली होती. त्यामुळे कृषी विभागाने पोलिसांच्या मदतीने सापळा रचून धाड टाकली. या झडतीमध्ये संशयित एचटीबीटी बियाण्यांची एकूण ४५ पाकिट आढळून आली. याची किमत ५४ हजार रुपये आहे. पोलीस स्टेशन बेनोडा येथे आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई मोर्शीचे उपविभागीय कृषी अधिकारी उज्वल आगरकर, वरूडचे तालुका कृषी अधिकारी रेहान मुजावर, कृषी अधिकारी राजकुमार सावळे, गजानन ढवळे, मुनेंद्र कुकडे यांच्या पथकाने केली.



घटना-घडामोडी



## वैभव गायकी 'युवा आयडॉल' पुरस्काराने सन्मानित

**आर्णी :** तालुक्यातील पिंपळनेर येथील युवा कार्यकर्ते वैभव गायकी यांना सामाजिक, कृषी व अन्य क्षेत्रांतील कार्याबद्दल 'काळीज माझं' संस्थेतर्फे (छ. संभाजीनगर) 'राज्यस्तरीय युवा आयडॉल' पुरस्काराने गौरविण्यात आले. नाशिक येथे नुकत्याच झालेल्या सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. प्रा. चंद्रकांत वानखेडे यांच्याहस्ते त्यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. वैभव गायकी यांनी 'विकासगंगा सामाजिक संस्था, घाटंजी' व 'रिलायन्स फाउंडेशन'च्या माध्यमातून शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून शेतकरी बळकटीकरणासाठी मोठे काम केले आहे. याचबरोबर, गावपातळीवर सूक्ष्म नियोजन, गाव विकास आराखडा व त्याची अंमलबजावणी, आदिवासी बांधवांना वनहक्क पट्टे मिळवून देणे आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांतही त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. याच कामाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. ते सध्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) टप्पा-२ मध्ये 'जिल्हा सूक्ष्म नियोजन समन्वयक' पदावर कार्यरत असून, त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



## सोनार सेवा महासंघातर्फे गुणवंतांचा सत्कार

**यवतमाळ :** सोनार सेवा महासंघाच्यावतीने यवतमाळ येथील हर्षे मंगलम लॉनमध्ये ४ जून रोजी गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये १०वी व १२वीत प्रावीण्य मिळविलेल्या तसेच उच्चशिक्षण घेणाऱ्या समाजातील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्याहस्ते स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून इंडियन फॉरेस्ट सर्विसेसमध्ये निवड झालेले रामेत ढगे, तसेच प्रमुख मार्गदर्शक संजय राऊत, आशिष चमेडिया, मेघा भास्करवार यांची मुख्य, प्रेरणादायी उपस्थिती होती. सोनार सेवा महासंघाच्या विदर्भ संघटिका सीमा बिन्नोड, तालुका पदाधिकारी रंजना गोगटे, तालुकाध्यक्ष प्रशांत रोकडे आणि तालुका महासचिव उमेश ढोमणे हेही व्यासपीठावर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लक्ष्मीकांत लोळगे यांनी केले, तर अतिथींचा अभ्यासपूर्ण परिचय ॲड. प्रवीण हर्षे यांनी करून दिला. सोनल बिन्नोड यांनी नेटके संचालन केले व उदय सज्जनवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संत शिरोमणी नरहरी सोनार महाराज ट्रस्ट, सोनार सेवा महासंघ जिल्हा व तालुका पदाधिकारी आणि सुवर्णकार कारागीर संघटनेनेही विशेष, अथक प्रयत्न केले.

## जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी प्लेट सक्तीची

**यवतमाळ :** जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बसविणे शासनाने आता बंधनकारक केले आहे. या नियमाचे पालन न करणाऱ्या वाहनांना १६ जूनपासून उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) अनेक महत्वाच्या सुविधा थांबविण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे की, १६ जूनपासून आरटीओमध्ये कामकाजासाठी येणाऱ्या जुन्या वाहनांना एचएसआरपी बसविली असल्याची किंवा त्यासाठी पूर्वनियोजित दिनांक व वेळ घेतली असल्याची खातरजमा केली जाईल. ही अट पूर्ण न केल्यास, वाहनाचे हस्तांतरण, नोंदणी प्रमाणपत्रात पत्ता बदल करणे, वित्तदात्याचा बोजा चढविणे किंवा उतरविणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र जारी करणे, ना-हरकत प्रमाणपत्र आणि वाहनांमध्ये बदल करणे इत्यादी महत्वपूर्ण वाहनविषयक कामकाज केले जाणार नाही. तथापि, परिवहन विभागातील योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस) व परवाना, तसेच परिवहनेत्तर विभागातील नोंदणी नूतनीकरण कामकाज मात्र सुरळीतपणे सुरू राहील. त्यामुळे सर्व संबंधित वाहनधारकांनी तातडीने कार्यवाही करून गैरसोय टाळावी, असे कळकळीचे आवाहन करण्यात आले आहे.

# परीक्षा नव्हे, जणू स्वाध्याय लेखन!

## जवळा येथील मुक्त विद्यापीठाच्या परीक्षेत ५०हून अधिक कॉपीबहाद्दर विद्यार्थी निलंबित!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ सचिन शिंदे



**आर्णी, दि.१०:** तालुक्यातील जवळा येथील परीक्षा केंद्रावर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या परीक्षेत, नाशिकच्या पथकाने छापा टाकून ५०हून अधिक विद्यार्थ्यांना निलंबित केले. तत्पूर्वी दारव्हा येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयातही असाच प्रकार घडल्याची माहिती आहे. 'डोनेशन' घेऊन पास करण्याच्या हमीचा अजब धंदा उघडकीस आल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठांतर्गत सुरू असलेल्या पदवी आणि पदव्युत्तर परीक्षांमध्ये, तालुक्यातील जवळा येथील स्व. भारत सिंग ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर मोठ्या प्रमाणावर सामूहिक कॉपी सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. नाशिक येथील विद्यापीठाच्या मुख्य भरारी पथकाने ४ आणि ५ जून रोजी सलग दोन दिवस या केंद्रावर छापा टाकून, ५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना कॉपी करताना रंगेहाथ पकडून निलंबित केले. या कारवाईमुळे तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात चाललेल्या गैरप्रकाराचे बिंग फुटले आहे. नाशिक येथील मुक्त विद्यापीठ मंडळाला या महाविद्यालयात परीक्षांदरम्यान सर्रास कॉपी होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्याआधारे, ८ ते १० अधिकाऱ्यांच्या पथकाने दोन वाहनांतून येऊन, वेगवेगळ्या परीक्षा दालनांमध्ये अचानक छापा टाकला. यावेळी परीक्षार्थी विद्यार्थी चक्क मोबाईल, गाइड, नोटबुक आणि संबंधित विषयाची पुस्तके समोर ठेवून उत्तरे लिहीत असल्याचे आढळले. हे दृश्य पाहून, 'विद्यार्थी परीक्षा देत नसून, जणू काही घरी बसून स्वाध्याय लिहीत आहेत', अशी संतप्त प्रतिक्रिया एका अधिकाऱ्याने दिली. चौकशीअंती सर्व कॉपीबहाद्दर विद्यार्थ्यांना तत्काळ निलंबित करण्यात आले. हा प्रकार या महाविद्यालयात नियमितपणे चालत असून, येथे विद्यार्थ्यांना हजारो रुपये 'डोनेशन'घेऊन उत्तीर्ण करण्याची हमी दिली जाते, असा गंभीर आरोप पालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे. याच कारणामुळेया महाविद्यालयात बी.ए., बी.कॉम. सारख्या अभ्यासक्रमांसाठी १७०० ते १८०० विद्यार्थी प्रवेशित असल्याचीही चर्चा आहे. एकीकडे शासन शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रयत्नशील असताना, दुसरीकडे अनेक खासगी संस्था पालकांचे आर्थिक शोषण करून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळत आहेत आणि शिक्षण विभाग यावर गप्प का, असा सवाल उपस्थित होत आहे.

### पालकांचे शोषण, शिक्षण विभाग गप्प?

**तालुक्यातील अनेक नामांकित खासगी शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थ्यांना नवीन प्रवेशासाठी पालकांकडून हजारो रुपयांचे अतिरिक्त शुल्क आकारून त्यांचे आर्थिक शोषण केले जात आहे. हजारो रुपये देऊनही संबंधित संस्थेकडून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळण्याचा प्रकार खुलेआम शिक्षण विभाग करीत आहे.**

# टाकळीत वटसावित्री पौर्णिमा साजरी

## श्रद्धा, परंपरा आणि नात्यांचा संगम; सावित्री-सत्यवानाचे स्मरण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**टाकळी (इ), दि.१०:** टाकळी गावात वटसावित्री पौर्णिमा मोठ्या श्रद्धेने, भक्तिभावाने आणि पारंपरिक उत्साहात साजरी करण्यात आली. पारंपरिक वेशभूषा परिधान करून, विवाहित महिलांनी वडाच्या झाडाला सात प्रदक्षिणा घालत आणि धागा गुंडाळत, पतीनिष्ठेचे प्रतीक असलेल्या सावित्री आणि सत्यवानाच्या अजर-अमर प्रेमाचे स्मरण केले.

सकाळीच महिलांनी स्नानादी विधी आटोपून सणासाठी आवश्यक साहित्याची तयारी केली व वडाच्या झाडाखाली पारंपरिक पूजन विधी अत्यंत मनोभावे पार पाडला. महिलांनी एकमेकींना 'सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद देत कपाळावर अक्षता लावल्या. या सणाने आणि सामूहिक पूजनाच्या आयोजनाने गावात भक्तिपूर्ण, मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. काही महिलांनी पारंपरिक ओव्या म्हणत कौटुंबिक एकतेच्या आणि भारतीय संस्कारांच्या मूल्यांची मनोहरी जपणूक केली. या सोहळ्यात वृद्ध माता-भगिनींपासून ते नवविवाहित तरुणींपर्यंत सर्वांचा उत्स्फूर्त सहभाग लक्षणीय ठरला. वटपौर्णिमा म्हणजे केवळ पूजन नसून, श्रद्धा आणि नात्यांची वीण घट्ट करणारी एक अमर कहाणी आहे, हेच यातून पुन्हा अधोरेखित झाले.

# शेतकऱ्यांनो, पेरणीची घाई करू नका!

## शेतीमित्र अशोक वानखेडे : अन्यथा दुबार पेरणीचे संकट

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. १० :** मे महिन्यात आणि रोहिणी नक्षत्रात झालेल्या चांगल्या पावसामुळे अनेक शेतकऱ्यांनी पेरणीची तयारी सुरू केली आहे, तर काहीनी पेरणीला सुरुवातही केली. मात्र, हा पाऊस भरवशाचा नसल्याने, शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा सल्ला भाऊसाहेब माने कृषी प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा शेतीमित्र अशोक वानखेडे यांनी दिला आहे.

वानखेडे यांनी म्हटले आहे की, केवळ पावसाच्या अंदाजावर अवलंबून शेती यशस्वी होत नाही. शेतकऱ्यांनी आपल्या अनुभवावर निष्ठा ठेवूनच खरीप हंगामाचे नियोजन करावे. सध्या सर्वच भागांत पाण्याची पातळी खालावलेली आहे आणि खत-बियाण्यांच्या भावांनी शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे.



अशा परिस्थितीत, जमिनीत पुरेसा ओलावा झाल्याशिवाय आणि किमान ७० ते १०० मिलिमीटर पाऊस पडल्याशिवाय पेरणीचा विचार करू नये. अभ्यासानुसार, जून किंवा जुलै महिन्यात पावसाने खंड दिल्यास दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते. मागील काही वर्षांचा अनुभव पाहता, जूनच्या पहिल्या आठवड्यानंतरच्या पावसावरच पेरणी यशस्वी झाली आहे. त्यामुळे, पाण्याची खात्रीशीर उपलब्धता नसल्यास पेरणीची घाई करू नये. ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची सोय आहे, त्यांनी हळद, तूर यांसारख्या पिकांची पेरणी करण्यास हरकत नाही. लवकर पेरणी करून पाऊस लांबल्यास पिकांवर कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढतो. तसेच, कमी कालावधीत येणारी संशोधित बियाणे बाजारात उपलब्ध असल्याने आपणहून संकट ओढवून घेऊ नये. यूट्यूबवर काही पिकांबाबत दिशाभूल करणारा प्रसार होत असून, शेतकऱ्यांनी विद्यापीठ शास्त्रज्ञ किंवा कृषी विभागाचा सल्ला घेतल्याशिवाय बियाणे खरेदी करू नये, असे आवाहनही वानखेडे यांनी केले.

# आगामी निवडणुका भाजपा पूर्ण ताकदीने लढणार

## युवा नेते राहुल सोयाम यांचा इशारा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. १० :** आर्णीतील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भाजप पूर्ण ताकदीने लढणार असून, शहराला 'भाजपमय' करणार असल्याचा इशारा पक्षाचे युवा व आदिवासी नेते राहुल सोयाम यांनी दिला आहे. आजवर एकही नगरसेवक निवडून आणता न आलेल्या आर्णी शहरात, यावेळी विजय मिळवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.



राहुल सोयाम हे आर्णी तालुक्यातील एक सुपरिचित, अभ्यासू नेते असून, त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून आपल्या राजकीय कार्याला प्रारंभ केला होता. यापूर्वी त्यांनी भाजपचे जिल्हा सचिव म्हणूनही प्रभावीपणे जबाबदारी सांभाळली आहे. त्यांच्याकडे सध्या उमेदवारीसाठी इच्छुकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, अनेक सामाजिक कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने युवा वर्ग त्यांच्या संपर्कात आहे. 'या निवडणुकीत निश्चितच महत्त्वाची भूमिका बजावून, भाजपच्या विजयाचा रथ पुढे नेण्यासाठी मी पूर्णपणे प्रयत्नशील राहीन,' असे आत्मविश्वासपूर्ण वक्तव्य राहुल सोयाम यांनी केले आहे. त्यांनी या निवडणुकीत युवकांना मोठ्या प्रमाणात संधी देण्याचेही ठरवले असून, या माध्यमातून शहराच्या सर्वांगीण विकासाला एक नवी दिशा देण्याचा त्यांचा प्रामाणिक मानस आहे.

# राळेगावात स्मार्ट प्रीपेड मीटरला शिवसेनेचा विरोध

## मीटर बसवण्याची कार्यवाही न थांबविल्यास आंदोलन, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**राळेगाव, दि. १० :** महावितरण कंपनीकडून राळेगाव शहरात सक्तीने बसविण्यात येत असलेल्या स्मार्ट प्रीपेड मीटरला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने तीव्र विरोध दर्शवला आहे. ही कार्यवाही विनाविलंब थांबवावी, या मागणीसाठी पक्षाने उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्याशी चर्चा करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले असून, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शिवसेना (उबाठा) कार्यकर्ते शंकर गायधने व सुनील क्षीरसागर यांच्या प्रयत्नातून हे निवेदन देण्यात आले. निवेदनानुसार, कंत्राटदाराचे कामगार 'आता मीटर बसवले नाही, तर तुम्हाला २०,००० रुपये खर्च येईल,' अशा भूलथापा देऊन सक्तीने मीटर बसवत आहेत. महावितरणने ग्राहकांना विश्वासात न घेता किंवा मीटरबाबत तांत्रिक माहिती न देताच ही कार्यवाही सुरू केल्याचा आरोप आहे. भविष्यात हे मीटर चार्जिंग (प्रीपेड) पद्धतीने चालणार असल्याने रोजमजुरी करणारे, छोटे व्यावसायिक व कमी उत्पन्न गटांतील कुटुंबांना मोठा त्रास सहन करावा लागेल. सध्या वीजबिल भरण्यासाठी पंधरा दिवसांची सवड मिळते, मात्र प्रीपेड मीटरमुळे रात्री-अपरात्री चार्जिंग संपल्यास गोरगरिबांना वीज मिळवणे कठीण होईल, अशी भीती व्यक्त होत आहे. वीज वितरण कायदा २००३, कलम ४७(५) नुसार कोणते मीटर वापरायचे याचा हक्क ग्राहकांना आहे. तसेच, नागपुरात झालेल्या आंदोलनावेळी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे मीटर सक्तीने बसवले जाणार नाहीत, असे आश्वासन दिले होते, याचीही आठवण करून देण्यात आली. निवेदन देताना उपजिल्हाप्रमुख विनोद काकडे, तालुकाप्रमुख विजय पाटील, उपतालुकाप्रमुख प्रशांत वारेकर, महिला शहर संघटिका पार्बता मुखरे, उपशहरप्रमुख सुनील सावरकर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# 'संकल्प से सिद्धी'कार्यक्रमात विजेत्यांचा सन्मान!

## भाजपचा उपक्रम: निबंध स्पर्धेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या कार्याला उजाळा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१०:** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंतीनिमित्त, भाजपने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. 'संकल्प से सिद्धी'कार्यक्रमात मंत्री अशोक उईके आणि जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चव्हाण यांनी पारितोषिके देत, अहिल्यादेवींच्या कार्याला अभिवादन केले.



भारतीय जनता पक्षाच्या यवतमाळ जिल्हा शाखेच्या वतीने, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त आयोजित भव्य जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा नुकताच पार पडला. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान पदाच्या यशस्वी अकरा वर्षांच्या पूर्ततेनिमित्त आयोजित 'संकल्प से सिद्धी' या विशेष कार्यक्रमात घेण्यात आला, ज्यामुळे या सोहळ्याला एक विशेष महत्त्व प्राप्त झाले. जिल्ह्याचे नेते तथा माजी मंत्री मदन येरावार आणि भाजप जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चव्हाण यांच्या मार्गदर्शनात 'अहिल्यादेवी यांचे आत्मचरित्र' या विषयावर ही निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला संपूर्ण जिल्ह्यातून स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाला भाजपचे अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते. याप्रसंगी राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चव्हाण, माजी आमदार संजय बोदकुरवार, माजी जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोर्डे, राजू पडगीलवार, रेखा कोठेकर, निर्मला विणकरे, श्याम जयस्वाल, शंतनू शेटे, विजय कोटेचा, रोहित राठोड, धीरज शर्मा, दिनकर पावडे आणि विजय राजूरकर यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

> **'निबंध स्पर्धेच्या निमित्ताने अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरणादायी कार्याला उजाळा देण्याचा प्रयत्न भाजपने केला आहे. अहिल्यादेवी या केवळ एक राणीच नव्हत्या, तर एक न्यायप्रिय शासक, धर्मप्रेमी, प्रजावत्सल माता आणि युगांनुयुगे आदर्श ठरणारी एक आदर्श स्त्री होत्या.'**
>
> **-शैला मिर्झापूरे,**
> **शहराध्यक्ष, भाजप महिला आघाडी, यवतमाळ.**

### तीन गटांतील नऊ गुणवंत

**स्पर्धेतील विजेते: १०-१६ वयोगट : स्वराली गजानन मळशाम, अक्षरा प्रदीप कांबळे, यथार्थ प्रवीण हूड. १७-२५ वयोगट: तनुष्का शरद मळशाम, कीर्ती गजानन सलाम, श्रेया शिंदे. खुला गट : मुक्तीचा वाटा खेडकर, मंगला भोयर, सुशील विजय माळवी.**

# 'मुक्तरंग'तर्फे सहस्त्र बीज वितरण

## ज्ञानेश्वर सोनटक्के यांचा उपक्रम; जलजागृतीचाही संदेश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**नेर (परसोपंत), दि. १० :** जागतिक पर्यावरण दिनाचे (५ जून) औचित्य साधून, नेर येथील मुक्तरंग शिक्षण कला अकादमीने सिसम, चिंच, बोर, सिताफळ, कडूलिंब अशा विविध प्रजातींच्या वृक्षांच्या बियांचे पाकिटे तयार करून शहरात वितरण करण्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवला. संयोजक ज्ञानेश्वर सोनटक्के यांच्या या संकल्पनेसोबतच 'जल हेच जीवन' हा संदेश देत पाणी बचतीचीही जनजागृती करण्यात आली.

औद्योगिकरणामुळे पर्यावरणाची झालेली हानी आणि विस्कळीत झालेले नैसर्गिक ऋतूचक्र पूर्ववत करण्यासाठी 'झाडे लावा, झाडे जगवा' हाच एकमेव प्रभावी उपाय असल्याचे मत सोनटक्के यांनी व्यक्त केले. ते गेल्या २५ वर्षांपासून अविरतपणे पर्यावरण जागृतीचे महत्त्वपूर्ण, पवित्र कार्य करत आहेत. शहरातील विविध कार्यालये, डॉक्टर व व्यापारी असोसिएशन, ऑटो युनियन, प्रमुख चौक, बस स्थानक परिसर येथे हजारो नागरिक व विद्यार्थ्यांना बीज वाटप झाले. कार्यक्रमाची सांगता सहयोग फाउंडेशन, चॅरिटेबल ट्रस्ट महात्मा फुले समता स्मारक येथे झाली. यावेळी विलास देशमुख, विनोद गोबरे, राहुल मिसळे, संदीप मिसळे, शुभम तुरणकर यांच्यासह विद्यार्थी आणि नेर येथील नाट्य कलावंत मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित होते.

## थोडक्यात

### लॉकरमधील रोख लंपास

**यवतमाळ :** अज्ञात चोरट्यानी घराच्या दरवाज्याचे कूलूप कोंडा तोडुन घरात प्रवेश करून बेडरूममधील लोखंडी कपाटाचे हॅन्डल वाकवुन लॉकरमधील नगदी ३० ते ३२ हजार रूपये चोरून नेले. ही घटना ९ जुन रोजी घडली. याप्रकरणी प्रवीण अरूणराव पाटील (३६) रा. मिर्झा व्हॉरींग सेंटर जागृत नाग मंदीर भारत नगर यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

### जुन्या भांडणावरून चाकूने हल्ला

**यवतमाळ :** जुन्या भांडणावरून वाद केल्याची घटना घडली. याप्रकरणी संगणमत करून फिर्यादी व फिर्यादीचा मित्र जखमी नामे राहुल असे यांच्यासोबत दोन दिवसांआधी झालेल्या भांडणाच्या कारणावरून वाद करून चाकुने मारहाण करून जखमी केले. याप्रकरणी चंद्रकांत देवानंद राऊत यांच्या तक्रारीवरून प्रथमेश भागवत व इतर एका विरूध्द गुन्हा नोंद केला.

### अपघातात इसम जखमी

**कळंब :** अपघातात इसम जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी समीर रामेश्वर देवनाथे (१७) हा त्याचा मित्राची मोटार सायकल वाहन क्र. एम.एच. ३२ एपी १४८० ने बहीणीला भेटण्याकरीता जोडमोहा येथे जात असतांना बेलोरो पिकअप वाहन क्र. एम.एच. २९ बीई २२१५ च्या चालकाने वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन वाहनास धडक दिल्याने फिर्यादीचा नातु गंभिर जखमी झाला. याप्रकरणी सुनंदाबाई आनंदराव जगनाडे यांच्या तक्रारीवरून बेलोरो पिकअप वाहन क्र. एम.एच. २९ बीई २२१५ च्या चालकाविरूध्द गुन्हा नोंद केला.

### अपघातात इसम ठार

**दिग्रस :** अपघातात इसम ठार झाल्याची घटना घडली. याप्रकरणी गजानन पखमोडे (३५) हे फिर्यादीसोबत वाद करून दुचाकी क्र. एम.एच. ३७ एएफ ३६५६ घेवून घरून निघुन गेले असता कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने त्याच्या दुचाकीला धडक दिल्याने अपघात होवून खाली पडल्यामुळे गंभिर जखमी होवून ते मरण पावले. याप्रकरणी ग.भा. जयश्री अमोल पखमोडे यांच्या तक्रारीवरून अज्ञात वाहन चालकाविरूध्द गुन्हा नोंद केला.

## निधन

### रामराव बनसोड

**यवतमाळ :** येथील मालानी



नगरात वास्तव्यास असलेले रामराव देवबाजी बनसोड (वय ८८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. घाटंजी तालुक्यातील माणूसधारी हे त्यांचे मूळ गाव होते. समाजात ते 'बनसोड गुरुजी' या नावाने परिचित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, भाऊ व नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा बुधवार (दि. ११) जून २०२५ रोजी सकाळी साडेदहा वाजता मालानी नगरातील त्यांच्या निवासस्थानाहून निघेल, अशी माहिती कुटुंबीयांनी दिली.

# जिल्ह्यात सहा महिन्यांत ३२ खून

## गुन्हे आढावा बैठकीत 'एसपीं'नी केली अधिकाऱ्यांची कानउघाडणी; गुन्हेगारीचा बदलता ट्रेंड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१०: यवतमाळ शहर आणि ग्रामीण भागात वाढत्या गुन्हेगारीने आपला मार्ग बदलला असून, जानेवारी ते जून २०२५ या कालावधीत तब्बल ३२ खुनांची नोंद झाली आहे. ही गंभीर बाब लक्षात घेऊन, पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी जिल्ह्यातील पोलिस अधिकाऱ्यांना अधिक कार्यक्षम राहून गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्याचे सक्त आदेश दिले आहेत. त्यांनी गुन्हेगारीचा बदलता ट्रेंड यावरही मार्गदर्शन केले.**

### शहरासह ग्रामीण भागात गस्त वाढवा



**शहरासह ग्रामीण पोलिसांनी गस्त वाढवणे आणि किरकोळ कारणांवरून होणाऱ्या खुनांसंदर्भात तक्रारदार तसेच आरोपींना तातडीने पोलिस ठाण्यात आणून कारवाई करणे आवश्यक असल्याचे मत नुकत्याच झालेल्या गुन्हे आढावा बैठकीत कुमार चिंता यांनी व्यक्त केले. या बैठकीत वाढत्या चोऱ्या-घरफोड्या आणि डिटेक्शनचे न वाढणारे प्रमाण याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. दारू, जुगार आणि अवैध प्रवासी वाहतूक बंद करण्याचे निर्देशही एसपींनी पुन्हा एकदा या बैठकीत दिले.**

जिल्हाभरातील उपविभागीय पोलिस अधिकारी आणि ठाणेदारांच्या मुख्यालयात पार पडलेल्या महत्त्वाच्या क्राईम विषयक आढावा बैठकीत ते बोलत होते. किरकोळ कारणांवरून होणारे खून रोखण्यासाठी पोलिसांनी गस्त वाढवावी आणि वाद झाल्यास दोन्ही पक्षांना तातडीने पोलिस ठाण्यात आणून कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी दिले. आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर संवेदनशील ठिकाणी विशेष खबरदारी घेण्यासही सांगण्यात आले. जातीय दंगली, हाणामारी अशा प्रकरणांमध्ये रेकॉर्डवर असलेल्या आणि समाजासाठी त्रासदायक ठरणाऱ्या गुंडांची हिस्ट्रीशीट तपासून त्यांच्या तडीपारीचे प्रस्ताव पाठवण्याचे व प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले. बैठकीच्या दुसऱ्या सत्रात, पाहिजे-फरारी आरोपींची वाढती संख्या, समन्स-वॉरंटची अंमलबजावणी आणि खटल्यांमध्ये शिक्षेचे कमी प्रमाण यावर एसपींनी आढावा घेतला. दोषारोपपत्रात त्रुटी राहणार नाहीत, याची खबरदारी घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. वाढत्या चोऱ्या-घरफोड्या आणि कमी असलेले डिटेक्शनचे प्रमाण यावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. जिल्ह्यातील दारू, जुगार अड्डे आणि अवैध प्रवासी वाहतूक पूर्णपणे बंद करण्याचे निर्देशही एसपी कुमार चिंता यांनी पुन्हा एकदा दिले. या कठोर भूमिकेमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा बसण्याची अपेक्षा आहे. जिल्ह्यात क्राईम रेट वाढला. पूर्वी पेक्षा आता जिल्ह्यातील क्राईम रेट वाढला आहे. प्रत्येक पोलिस स्टेशन दप्तरी, खून, प्राणघातक हल्ले सोबतच घरफोडीचे गुन्हे वाढले आहेत. विशेष करून यवतमाळ शहरात या गुन्ह्याचा वाढता आलेख आहे. प्रत्येक गुन्हे आढावा बैठकीत हाच विषय चर्चिला जातो. मात्र, त्यावर चिंतन केले जात नाही. अवैध व्यवसाय समूळ उच्चाटनाचा केवळ कागदोपत्रीच आलेख आहे. एकट्या यवतमाळ शहरात २० ठिकाणी भिंगरी क्लब सुरू आहे. तर यवतमाळ शहरात चार ठिकाणी जुगार चालतो. मात्र, याकडे परस्पर दुर्लक्ष केला जात आहे. पिंपळगाव सारख्या ठिकाणी दोन मटका जुगार तसेच भिंगरी क्लब आहे. त्यामुळे पिंपळगावातील युवक या भिंगरी क्लबच्या आहारी गेले आहे. अवैध धंदे हेच गुन्हेगारीचे प्रमुख कारण आहे.

# वणीतील कुख्यात गुन्हेगार जमीर खान स्थानबद्ध

## एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ,दि.१०:** वणी पोलिस ठाणे हद्दीतील कुख्यात गुन्हेगार जमीर ऊफ जम्मू खान मेहबूब खान (रा. मोमीनपुरा, वणी) याला एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबद्ध करण्याची मोठी कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा दंडाधिकारी, यवतमाळ यांनी ९ जून रोजी स्थानबद्धतेचे आदेश पारित केल्यानंतर, वणी पोलिसांनी तत्काळ आरोपीला अटक करून त्याची रवानगी केली.

जमीर खान याच्या विध्वंसक कृत्यांना आळा घालण्यासाठी, पोलिस निरीक्षक, वणी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्ये विषयक गुन्हेगार व वाळू तस्कर यांच्या कृत्यांना आळा घालण्याबाबतच्या अधिनियमांतर्गत (एमपीडीए, १९८१) स्थानबद्धतेचा प्रस्ताव सादर केला होता. जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या आदेशानंतर, वणी पोलिसांनी जमीरला शोधून ताब्यात घेतले व त्याची भंडारा जिल्हा कारागृहात रवानगी केली. ही महत्त्वपूर्ण कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलिस अधिकारी (वणी) गणेश केंद्रे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक गोपाल उंबरकर व पोलिस उपनिरीक्षक धीरज गुल्हाणे यांनी यशस्वी केली. भविष्यातही शांतता भंग करणाऱ्या समाजकंटक, गुन्हेगारांवर एमपीडीएअंतर्गत कठोर कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## CAPTION एक बंध सात जन्माचे...



**यवतमाळ : जिल्ह्यात वटसावित्री पौर्णिमा मोठ्या श्रद्धेने, भक्तिभावाने आणि पारंपरिक उत्साहात साजरी करण्यात आली. विवाहित महिलांनी वडाच्या झाडाला सात प्रदक्षिणा घालत आणि धागा गुंडाळत, पतीनिष्ठेचे प्रतीक असलेल्या सावित्री आणि सत्यवानाच्या अजर-अमर प्रेमाचे स्मरण केले. पतीच्या आरोग्याची आणि खुशहालीची प्रार्थना केली. भक्तिभावाने वडाचे पूजन करताना महिला भगिनी.** (छायाचित्र : तुषार गावंडे)

# सावळी सदोबा येथे डेंग्यूचा शिरकाव

## आरोग्य यंत्रणा सतर्क; कंटेनर सर्वेक्षण, फवारणीसह प्रतिबंधात्मक उपाययोजना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**सावळी (सदोबा), दि.१०:** आर्णी तालुक्यातील सावळी-सदोबा येथे डेंग्यूचे संशयित रुग्ण आढळल्याने खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर, स्थानिक आरोग्य यंत्रणेने तातडीने दखल घेत डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी कंटेनर सर्वेक्षण, फवारणी यांसारख्या विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे.

आरोग्य विभागाने 'घरोघरी तपासणी, स्वच्छतेचा आग्रह आणि प्रतिबंधात्मक फवारणी' या त्रिसूत्रीवर आता विशेष भर दिला आहे. पथकाने घरोघरी कंटेनर सर्वेक्षण करून पाण्याची साठवण तपासली व डासांच्या अळ्या नष्ट करण्यासाठी टेमीफॉस फवारणी केली. संशयित रुग्णांचे रक्तनमुने घेऊन तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले आहेत. 'डेंग्यू रोखण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत गरजेचा आहे,' असे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रणव गावंडे यांनी केले. या मोहिमेत आरोग्य सहायक राम राठोड, वैज्ञानिक अधिकारी अश्विनी वानखेडे, आरोग्य सेविका संध्या कोवे, आशा वर्कर्स प्रांज्योती उमरे, आरती पेदेवे, अर्चना सिंगेनवार, अफीजाबी यांनी महत्त्वपूर्ण सहभाग घेतला. आरोग्य विभाग लवकरच पुन्हा सर्वेक्षण करून परिस्थितीचा सविस्तर आढावा घेणार आहे.

# आर्णी तालुक्यात वादळी वाऱ्यासह पावसाचे तांडव



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. १० :** शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात नुकत्याच झालेल्या जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाने मोठे नुकसान केले आहे. अनेक घरांवरील टिने उडून गेली, तर अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने मोठे नुकसान झाले.

अरविंदनगर येथील राजू सिंग चव्हाण यांच्या घरावरील टिने पूर्णपणे उडून गेल्याने त्यांच्या कुटुंबाचे मोठे नुकसान झाले. माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते राजू मते यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून चव्हाण कुटुंबाला आधार दिला. तसेच इतरांच्या मदतीने तात्पुरत्या निवाऱ्याची सोय केली. तहसील कार्यालय व पंचायत समितीच्या आवारातही झाडे कोसळून अनेक वाहनांचे नुकसान झाले आहे. प्रशासनाकडून पंचनामे सुरू करण्याची मागणी होत आहे.

# ग्रँड मराठा फाउंडेशनचे संस्थापक रोहित शेलोटकर आज पांढरकवड्यात

## नवीन प्रकल्पांचे लोकार्पण, सामाजिक कार्याचा घेणार आढावा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि.१०:** गेली दोन दशके विदर्भातील, विशेषतः शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांसाठी, कोट्यवधी रुपयांच्या सामाजिक योजना राबविणारे 'ग्रँड मराठा फाउंडेशन'चे संस्थापक, 'युके'स्थित उद्योजक रोहित शेलोटकर आज, बुधवारी (दि. ११) पांढरकवडा येथे येत आहेत. ते त्यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेऊन काही नवीन प्रकल्पांचे लोकार्पण करणार असल्याची माहिती शेतकरी नेते किशोर तिवारी यांनी दिली.



मूळचे महाराष्ट्रातील कोकणवासी असलेले रोहित शेलोटकर हे सध्या युनायटेड किंगडममध्ये एक यशस्वी उद्योजक व जागतिक विचारवंत म्हणून कार्यरत आहेत. मात्र, आपली मातृभूमी आणि येथील लोकांप्रति असलेल्या बांधिलकीतून त्यांनी २०१३ साली 'ग्रँड मराठा फाउंडेशन'ची स्थापना केली. या माध्यमातून त्यांनी विदर्भ आणि मराठवाड्यातील कृषी संकट, शेतकरी आत्महत्या आणि सामाजिक-शैक्षणिक समस्यांवर लक्ष केंद्रित केले. गेल्या वीस वर्षांत, फाउंडेशनने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना बियाणे, शेतकरी विधवांच्या मुलींच्या लग्नासाठी व पाल्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत, बिनव्याजी पीककर्ज, शेतात बंधारे, विहिरी व वीजपंप देणे, आदिवासींना खावटी वाटप करणे यांसारखी महत्त्वपूर्ण कामे केली आहेत. कोरोना महामारीतही पांढरकवडा परिसरात सहा महिने अन्नधान्य किट वाटप आणि स्थलांतरित प्रवाशांना अन्न व वाहतूक मदत पुरवली होती. आपल्या या दौऱ्यात, रोहित शेलोटकर नवीन अभ्यासिका, संगणक कौशल्य विकास केंद्र, मारेगाव व वसंतनगर येथील जलशुद्धीकरण यंत्र तसेच नाला खोलीकरण आणि चेक डॅम कामांचे लोकार्पण करणार आहेत. शिक्षण, स्वच्छता, महिला सबलीकरण आणि जल व्यवस्थापनातूनच खरा बदल शक्य आहे, या विचाराने ते कार्यरत आहेत.

# वणीत एमडी ड्रग्ज जप्त

## दोघे गजाआड; पोलिसांची मोठी कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**वणी, दि.१०:** वणी शहर पोलिसांनी ९ जून रोजी केलेल्या एका मोठ्यात कारवाईत, एमडी (मेफेड्रोन) या अमली पदार्थाचा मोठा साठा जप्त केला आहे. कुख्यात जमीन व्यवहार करणारा कुणाल मधुकर वानखेडे आणि त्याचा साथीदार भागवत भिकनजी वानखेडे (रा. मनिषपुरा) या दोघांना अटक करण्यात आली असून, वणीतील अमली पदार्थ विरोधी मोहिमेला मोठे यश मिळाले आहे.

पोलिस उपनिरीक्षक (गुप्त शाखा) यांना, आरोपी अमली पदार्थ विकत असल्याच्या संशयाची गुप्त माहिती मिळाली होती. जिल्हाधिकारी कार्यालयाकडूनही माहितीची खातरजमा झाल्यानंतर, पोलिसांनी ९ जूनला सकाळी कुणाल वानखेडे व भागवत वानखेडे यांच्या घरांवर एकाचवेळी छापे टाकले. या धाडीत मोठ्या प्रमाणात एमडी साठा आढळल्याने, पोलिसांनी तत्काळ दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायदा, १९८५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस अधिक तपास करत आहेत. ही यशस्वी कारवाई पोलिस अधीक्षक (यवतमाळ), पोलिस उपअधीक्षक (वणी), पोलिस निरीक्षक (वणी), गुप्त शाखा व इतर कर्मचाऱ्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेतून पार पडली.

# पिंपळखुटी चेकपोस्टवरील भ्रष्टाचारामुळे गुन्हेगारीत वाढ?

## वंचित बहुजन आघाडीचा आरोप; आरटीओ कार्यालयावर धडक, कारवाईची मागणी!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.१०:** यवतमाळ जिल्ह्यातील पिंपळखुटी चेक पोस्टवरील भ्रष्टाचारामुळे जिल्ह्यात गुन्हेगारी वाढत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. 'आम्ही स्व:खर्चाने सीसीटिव्ही लावतो, आम्हाला परवानगी द्या,' अशी मागणी कली. येथील भ्रष्टाचाराला प्रशासनच दोषी असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

महाराष्ट्र व आंध्र प्रदेश सीमेवर असलेल्या पिंपळखुटी चेकपोस्टवर वाहतूक विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून सर्रास भ्रष्टाचार सुरू असल्याचा गंभीर आरोप करत, वंचित बहुजन आघाडीच्या यवतमाळ जिल्हा शाखेने आज, मंगळवार, १० जून रोजी उपप्रादेशिक परिवहन विभागाला (आरटीओ) निवेदन सादर केले. जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळाने, या भ्रष्ट कारभारामुळे जिल्ह्यात गुन्हेगारी वाढत असून, याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा ठपका ठेवला आहे. निवेदनानुसार, चेकपोस्टवरील कर्मचारी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या कक्षेबाहेर वाहने थांबवून चालकांकडून लाच घेतात. या मोबदल्यात, जिल्ह्यात शस्त्रे, बनावट मद्य, अमली पदार्थ, बोगस बियाणे, खते-कीटकनाशके, वाळू आणि गोवंशांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या वाहनांना मोकळा प्रवेश दिला जातो, असा स्पष्ट आरोप वंचितने केला आहे. माध्यमांमध्ये यासंदर्भात अनेक बातम्या प्रकाशित होऊनही कोणतीही कारवाई न झाल्याबद्दल त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. या भ्रष्ट कारभारात उपप्रादेशिक परिवहन विभागच जबाबदार असल्याची चर्चा जनतेत असून, यामुळे प्रशासनावरील विश्वास डळमळीत होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. यावर एक अनोखा तोडगा सुचवत, वंचित बहुजन आघाडीने एक धाडसी पाऊल उचलले आहे. राज्य शासनाच्या आर्थिक स्थितीचा दाखला देत त्यांनी या चेकपोस्ट परिसरात पारदर्शकता आणण्यासाठी स्व:खर्चाने १० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमासाठी त्यांनी विभागाकडे रीतसर परवानगी मागितली आहे. 'जर ही परवानगी नाकारली गेली, तर प्रशासनच भ्रष्टाचाराला पाठीशी घालत आहे, असा स्पष्ट अर्थ आम्ही घेऊ,' असा निर्वाणीचा इशाराही त्यांनी दिला. यावेळी डॉ. नीरज वाघमारे, गजानन कोकाटे, उत्तम पाटील, गजानन सावळे, संतोष राऊत, अरविंद दिवे, विलास वाघमारे, नीलेश मनवर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### बोगस बियाणे जिल्ह्यात कुणाच्या आशीर्वादाने

**पिंपळखुटी चेकपोस्टवर कर्मचारी सीसीटीव्हीच्या बाहेर गाड्या अडवून लाच घेतात. याबदल्यात, शस्त्रे, बनावट दारू, अमली पदार्थ, बोगस बियाणे, वाळू आणि गोवंश यांची अवैध वाहतूक करणाऱ्या गाड्यांना जिल्ह्यात सहज प्रवेश मिळतो. सध्या खरीप हंगाम सुरू असून बोगस बियाणे व खते सुद्धा जिल्ह्यात येत आहे, याला कुणाचा आशीर्वाद आहे, असा प्रश्नही 'वंचित'ने विचारला आहे. या कारणाने अवैध धंदे वाढल्याने जिल्ह्यात गुन्हेगारी वाढली असल्याचा दावा करण्यात आला आहे.**

# उमरखेड येथे चैन स्नॅचिंगचा प्रयत्न

**उमरखेड, दि. १० :** येथील पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या देव कॉम्प्लेक्ससमोर मंगळवारी (दि. १०) सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास ॲक्टिवावर जात असलेल्या एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकाविण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. महिलेने मंगळसूत्र घट्ट पकडल्याने चोरट्यांचा डाव फसला. मात्र, या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. सेवादास कॉलनी येथील रहिवासी विना अशोक चक्करवार या मुलीसोबत ॲक्टिवावरून जात असताना, एम.एच. २६ सीके ८७०९ क्रमांकाच्या दुचाकीवरून आलेल्या तीन अनोळखी इसमांनी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकाविण्याचा प्रयत्न केला. विना चक्करवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे वाहन क्रमांक मिळविला असून, अनोळखी चोरट्यांचा शोध सुरू आहे.